म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा० वा०
दा. क्र. ५६३३

# सूर्योदय

(संक्षिप्त)

IRBK-0105633
IRBK-0105633
१६५९

आर्यभूषण मुद्रणालय

श्री ... संग्रहालय, ठाणें.

# सूर्योदय

( संक्षिप्त आवृत्ति )

संपादक :

**नरहर गणेश दामले, एम्. ए.,**

प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज, पुणें

4633

ठाणा

IRBK-0105633

IRBK-0105633

किंमत चवदा आणे

पहिली आवृत्ति — १९२७ ... ४०००
दुसरी आवृत्ति — १९२९ ... २०००
तिसरी आवृत्ति — १९३५ ... २०००
पुनर्मुद्रण — १९३९ ... २०००
„ — १९४४ ... ३०००
„ — १९४९ ... ३०००
„ — १९५६ ... ३०००

मुद्रक व प्रकाशक :
**केशव गणेश शारंगपाणी,**
आर्यभूषण मुद्रणालय, ९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

## दोन शब्द

मराठी भाषेंतील पहिल्या प्रतीचे कादंबरीकार म्हणून कै. **हरिभाऊ आपटे** यांचें नांव अखिल महाराष्ट्रांत सर्वविश्रुत आहे. त्यांनीं एकाहून एक सरस व मनोवेधक अशा अनेक ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचा समाजसुधारणेच्या दृष्टीनें वाचकांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला आहे व त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनीं महाराष्ट्राच्या पूर्वकालीन उज्ज्वल अशा इतिहासांतील कांहीं प्रसंगांवर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. सामाजिक कादंबऱ्यांप्रमाणें **हरिभाऊंनीं** ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून महाराष्ट्रावर फार मोठे उपकार केले आहेत. या कादंबऱ्यांमध्यें महाराष्ट्राच्या इतिहासांतील कांहीं प्रमुख व्यक्ति व कांहीं महत्त्वाचे प्रसंग यांचीं फारच आल्हाददायक व स्फूर्तिजनक अशीं शब्दचित्रें हरिभाऊंनीं रेखाटलीं आहेत. या ऐतिहासिक कादंबऱ्यांपैकीं 'सूर्योदय' ही एक कादंबरी आहे. शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यसूर्याचा उषःकाल सुलतानगडावर झाला व उदय प्रतापगडावर झाला. प्रस्तुत कादंबरींत या स्वराज्य-सूर्योदयाचें हृदयंगम शब्दचित्र पाहावयास सांपडतें.

स्वराज्य-सूर्योदयाचें हें शब्दचित्र महाराष्ट्रांतील सर्व लहानथोर स्त्री-पुरुषांनीं अवश्य पाहिलें पाहिजे. **हरिभाऊंची** मूळ कादंबरी डेमी अष्टपत्री आकाराची ३५६ पानांची आहे व त्यामुळें एवढें मोठें पुस्तक विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत ठेवणें शक्य नाहीं. तथापि अशा तऱ्हेचीं स्फूर्तिदायक पुस्तकें विद्यार्थ्यांचे हातीं पडणें अवश्य आहे व त्यांचें मनन व अध्ययन त्यांचेकडून उत्तम तऱ्हेनें झालें पाहिजे. लहान वयांतसुद्धां या ऐतिहासिक कथा मुलांच्या नजरेसमोर येणें त्यांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीनें इष्ट आहे. तेव्हां हीं मूळ पुस्तकें नाहींत तरी त्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या विद्यार्थ्यांच्या हातीं पडणें अवश्य आहे. इंग्रजी सातव्या इयत्तेचा अभ्यास पुरा करणाऱ्या विद्यार्थ्यांस इतिहासाची थोडीबहुत माहिती झाली असल्यानें त्यांस ऐतिहासिक कथांचें स्वारस्य समजणें शक्य आहे. मोठ्या कादंबऱ्या वाचून त्यांचें अध्ययन करण्याची विद्यार्थ्यांना सवड होत नसल्यामुळें त्यांच्याकरतां अशा कादंबऱ्यांच्या—प्रस्तुतसारख्या—संक्षिप्त आवृत्ति तयार केल्यास त्यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत करण्यास हरकत नाहीं व यंदा तशी व्यवस्था स्कूल लीव्हिंग बोर्डानें केली ही अभिनंदनीय गोष्ट आहे. 'सूर्योदया' ची प्रस्तुतची संक्षिप्त आवृत्ति प्रो. न. ग. दामले, फर्ग्युसन कॉलेज, पुणें, यांचेकडून तयार करून घेऊन आज ती आम्ही प्रसिद्ध करीत आहों. **हरिभाऊंच्या** ऐतिहासिक कादंबऱ्यांतील 'सूर्योदय' ह्या कादंबरीचें प्रस्तुतचें संक्षिप्त स्वरूप चालू सालीं विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत

समाविष्ट केलें गेलें आहे. **हरिभाऊ** यांचे ‘ गड आला पण सिंह गेला ! ’ हें पुस्तक पूर्वी मॅट्रिक्युलेशन परीक्षेस नेमण्यांत आलें होतें. परंतु तितकें आटोपशीर दुसरें पुस्तक नसल्यानें मध्यंतरीं त्या तऱ्हेचें पुस्तक परीक्षेस ठेवण्यांत आलें नव्हतें असें दिसतें. अशा तऱ्हेचीं पुस्तकें प्रथम तयार करून मग स्कूल बोर्डाकडे सदर पुस्तकें अभ्यासक्रमांत ठेवावीं अशी विनंती करावी असें वाटल्यावरून सूर्योदयाची संक्षिप्त आवृत्ति प्रो. दामले यांस तयार करण्याबद्दल विनंती केली. प्रो. दामले यांनीं सूर्योदय या मूळ कादंबरींतील स्वारस्याचा भंग न होऊं देतां व हरिभाऊंच्या भाषासौष्ठवाचा विशेष कायम ठेवून, ही तिची संक्षिप्त आवृत्ति तयार केली आहे. ही संक्षिप्त आवृत्ति तयार झाल्यावर तिचा चालू सालीं अभ्यासक्रमांत समावेश करण्याची संधि द्यावी अशी स्कूल लीव्हिंग बोर्डास विनंती केल्यावर त्यांनीं सदर पुस्तक सन १९२८ च्या अभ्यासक्रमांत सामील केलें.

या पुस्तकांत **कै. हरिभाऊ आपटे** यांनीं या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीस जोडलेली प्रस्तावना देणें अवश्य वाटल्यावरून ती याखालीं दिली आहे—

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

“ छत्रपति शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यसूर्याचा उषःकाल सुलतानगडावर झाला. पुढें उदय होण्याच्या सुमारास विजापुराहून आलेल्या एका प्रचंड मेघानें त्यांत विघ्न आणलें; परंतु तें विघ्नहि दूर सारून प्रतापगडावर स्वराज्यसूर्याचा उदय झाला. या सूर्योदयाचें शब्दचित्र आज वाचकांस अर्पण करीत आहें. हा इतिहास नव्हे, ही कथा आहे. ऐतिहासिक सत्य नव्हे, ऐतिहासिक सत्याभास आहे. या दृष्टीनें याचें निरीक्षण व्हावें, एवढीच नम्र विनंती आहे. ”

*१५।११।१९१७* — *ह. ना. आपटे*

यापुढें **हरिभाऊ** यांच्या बाकीच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या लायक संपादकांकडून तयार करवून आम्ही अवश्य प्रसिद्ध करूं. कारण **हरिभाऊ** यांच्या सर्व ग्रंथांचा हक्क आर्यभूषण छापखान्याकडे आला असल्यानें असें आश्वासन देण्यास आम्हांस कोणतीच हरकत वाटत नाहीं; अशा संक्षिप्त आवृत्त्या तयार झाल्यावर त्यांचाहि प्रस्तुतच्या पुस्तकाप्रमाणें हायस्कूलच्या अभ्यासक्रमांत समावेश होईल अशी आम्हांस उमेद आहे.

ता. १७।४।२७<br>आर्यभूषण मुद्रणालय, पुणें

**प्रकाशक**

## दुसरी आवृत्ति

कै. **हरिभाऊ आपटे** यांच्या लेखनसौंदर्याबद्दल विशेष कोणीं प्रशंसापर लिहिलें पाहिजे असें नाहीं. त्यांनीं आपल्या प्रासादिक लेखणीस ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून महाराष्ट्राची सेवा करण्याची उत्तम संधि दिली व पुढें तिचा उपयोग महाराष्ट्रीय वाचकांच्या मनांत सदर पुस्तकांच्या वाचनानें स्फूर्ति उत्पन्न होण्याकडे होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. विद्यार्थिदशेंत मुलांमुलींच्या मनावर या कादंबऱ्यांतून रेखाटलेल्या भावनांचा परिणाम व्हावा व त्यांच्या प्रौढदशेंत ह्या भावनांचा विकास व्हावा अशी इच्छा शिक्षणाधिकाऱ्यांची असल्यानें त्यांनीं कै. **हरिभाऊ** यांची 'गड आला पण सिंह गेला!' ही ऐतिहासिक गोष्ट वाचनपुस्तक म्हणून अभ्यासक्रमांत समाविष्ट केली आहे व विद्यार्थ्यांना मोठ्या पुस्तकांतील कथानक अवघड जात असल्यानें कै. **हरिभाऊ** यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या तयार करविल्यास त्यांचा उपयोग वाचनपुस्तकें या नात्यानें शिक्षणसंस्थांतून होईल अशी तजवीज करण्यांत येईल असें आश्वासनहि देण्यांत आलें आहे. सदर सूचनेबरहुकूम सूर्योदय या कादंबरीची संक्षिप्त आवृत्ति तयार करण्याचा उपक्रम केला व सदरहु पुस्तक तयार झाल्यावर तें सन १९२८ सालीं स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेटच्या परीक्षेस युनिव्हर्सिटी बोर्डाकडून नेमण्यांतहि आलें. या पुस्तकाची उपयुक्तता अधिकाऱ्यांस व विद्यार्थ्यांच्या पालकांस पुढें दिसून आली, म्हणूनच आज आम्ही सदर पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करीत आहों. हें पुस्तक शिक्षणसंस्थांच्या चालकांना अभ्यासक्रमांतील पुस्तकाशिवाय स्वतंत्र वाचनपुस्तक म्हणून त्याची शिफारस विद्यार्थ्यांस करण्यास प्रत्यवाय वाटणार नाहीं, अशी आमची कल्पना आहे. कै. हरिभाऊंच्या **केवळ स्वराज्यासाठीं?** या कादंबरीचीहि संक्षिप्त आवृत्ति तयार करून बालवाचकांना यापूर्वीच सादर केलेली आहे. अशा पुस्तकांस जसा आश्रय मिळेल, त्याप्रमाणे कै. **हरिभाऊ** यांच्या अन्य ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या महाराष्ट्रांतील सर्वमान्य लेखकांकडून तयार करवून प्रसिद्ध करण्यास आम्हांस उत्साह वाटणार आहे. कै. **हरिभाऊ आपटे** यांच्या सर्व पुस्तकांची मालकी त्यांच्या मृत्युपत्राप्रमाणें सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या आर्यभूषण छापखान्याकडे आलेली असल्यानें वरीलसारखा प्रयोग करून पाहण्यास सदर छापखान्याच्या चालकांच्या मार्गांत कोणतीच अडचण राहिलेली नाहीं. शिक्षणसंस्थांचे चालक व विश्वविद्यालयाचे अधिकारी यांनीं या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा योग्य पुरस्कार करावा अशी त्यांना विनंती आहे.

१५ नोव्हेंबर १९२९

---

## तिसरी आवृत्ति

कै. **हरिभाऊ आपटे** यांच्या कादंबऱ्या हल्लीं प्रिय झालेल्या वाङ्मयाच्या कालीं पूर्वीप्रमाणें वाचकांच्या हातीं असलेल्या दिसत नाहींत, ही गोष्ट दृष्टीआड करून चालावयाची नाहीं; परंतु **हरिभाऊंच्या** ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांमध्यें ज्या तऱ्हेचें उच्च व उज्ज्वल ध्येय वाचकांच्या पुढें ठेवलेलें आहे, तसलें ध्येय आज प्रसिद्ध होणाऱ्या विविध तऱ्हेच्या वाङ्मयांतील फारच थोडया पुस्तकांत पाहावयास मिळत आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्या मोठया असून त्या आमूलाग्र वाचून त्यांतील लिखाणाचें मनन करण्याची भावना वाचकांमध्यें दिवसेंदिवस कमी दिसत असल्यामुळें या कादंबऱ्यांची संक्षिप्त आवृत्ति तयार करून ती वाचकांना उपलब्ध करून देणें इष्ट व आवश्यक झालेलें आहे. अशा तऱ्हेची संक्षिप्त आवृत्ति तयार झाल्यास ती विद्यार्थ्यांनाहि उपयुक्त होते असा अनुभव आलेला आहे. 'सूर्योदय' या कादंबरीच्या संक्षिप्त आवृत्तीचें हें तिसरें पुनर्मुद्रण आहे, यावरून हा संक्षिप्त आवृत्त्या प्रसिद्ध करण्याचा प्रयोग वाढत्या प्रमाणांत हातीं घ्यावा असें सहाजिकपणें वाटावयास लागलें आहे. बृहन्महाराष्ट्रांतील विश्वविद्यालयांमध्यें मराठी भाषेच्या अध्ययनाचा वाढता विस्तार जो होत आहे, त्याचा विचार केला तर **हरिभाऊ** यांच्या कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या हायस्कुलांतील शिक्षणक्रमांत वाचनपुस्तकें या नात्यानें जास्त प्रमाणांत नेमल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या जागीं त्यांचा विशेष उपयोग होणार आहे. 'सूर्योदय' या कादंबरीस वाढती मागणी असल्यानें ही तिसरी आवृत्ति छापून प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या आवृत्तीसहि बृहन्महाराष्ट्रांतील वाचक व शिक्षणसंस्थांचे अधिकारी यांचेकडून योग्य प्रकारें आश्रय मिळेल अशी खात्री वाटत आहे.

१४ ऑगस्ट १९३५;
नारळी पौर्णिमा, १८५७.

## हरि नारायण आपटे



जन्म
दिनांक ८ मार्च १८६४ ]

मृत्यु
[ दिनांक ३ मार्च १९१९

# हरि नारायण आपटे
## यांचें
# अल्प चरित्र

दृष्टीसमोर असलेल्या माणसाचें अंतरंग शोधणारी, ओष्ठ संभाषणासाठीं आतुर, मुखावर स्मिताची छटा, उंच आणि विस्तीर्ण भालप्रदेश, वाटोळा चेहरा, आणि साधारण स्थूल–फार उंच नव्हे व ठेंगूहि नव्हे–अशी शरीरयष्टि, अशी कै. **हरि नारायण आपटे** यांची बाह्यरूपाकृति होती. प्रिय कन्येचा वियोग झाला त्या दिवसापासून त्यांच्या चर्येवरील स्मिताची छटा मावळली, आणि त्या ठिकाणीं विरक्तीनें पसरलेली गंभीरपणाची छाया दृग्गोचर होऊं लागली. जरा जोरानें त्यांच्या देहावर आपला पगडा बसवूं लागली, आणि पन्नाशीच्या घरांत पोंचण्यापूर्वींच ते पंचावन्न साठ वर्षांच्या वयाचे वृद्ध दिसूं लागले. यानंतर सातच वर्षें त्यांनीं इहलोकांत वास्तव्य केलें. १८६४ सालच्या मार्च महिन्याच्या आठव्या तारखेस त्यांच्या इहलोकवासास प्रारंभ झाला आणि तो १९१९ सालच्या मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस संपला. एकंदर पंचावन्न वर्षांत पांच दिवस कमी इतका काळ ते आमच्यामध्यें राहिले, आणि एवढ्या अर्धशतावधीच्या आयुष्यात महाराष्ट्र–शारदेच्या भक्तमंडळींत फार मोठ्या मानाचें, फार मोठ्या कीर्तीचें व चिरस्मरणीय स्थान मिळवून ते गेले.

नारायण चिमणाजी ऊर्फ नानासाहेब आपटे यांचे **हरि नारायण आपटे** हे ज्येष्ठ पुत्र. बारशाच्या दिवशीं या मुलाचें नांव बाळकृष्ण असें ठेविलें होतें, पण कुटुंबांत दुसरा बाळकृष्ण आहे, असें आढळल्यावर तें नांव बदलून हरि हें दुसरें नांव ठेवण्यांत आलें. हरिभाऊंना मातृसुख फारसें लाधलें नाहीं. ते चार वर्षांचे असतांना त्यांची मातुःश्री इहलोक सोडून गेली. मातेच्या वियोगानंतर हरिभाऊंचें लालनपालन त्यांच्या चुलताचुलतीकडून–महादेव चिमणाजी आपटे व त्यांच्या पत्नी सौ. पार्वतीबाई यांजकडून–होऊं लागलें व या काका–काकींचा हरिभाऊंस फार लळा लागला. हरिभाऊ जरा मोठे होतात न होतात तोंच काकींच्या मायेचें छत्रहि काळानें हिरावून नेलें. नानासाहेबांच्या मावशी–चिमामावशी–ह्यांनीं हरिभाऊंना काकींच्या मागून वाढविलें. हरिभाऊंचे वडील नानासाहेब हे सरकारी नोकर असून त्यांचे आचारविचार पक्क्या कर्मठ ब्राह्मणासारखे. चुलते महादेव चिमणाजी—हे पुढें नामांकित वकील झाले—यांचे आचारविचार पूर्णपणें सुधारक

पंथाचे. हरिभाऊंचें बालपण यांच्याच सान्निध्यांत गेलें व या मातृविहीन मुलाचें कोडकौतुक त्यांनींच पुरविलें.

श्रीगणेशा शिकण्याचा आरंभ हरिभाऊंनीं मुंबईत केला, पण नानासाहेबांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यास नेल्यावर हरिभाऊंस घेऊन ते पुण्यास गेले, व तेथील हायस्कुलांत त्यांनीं त्यांना घातलें. या वेळीं हरिभाऊंचें वय चौदा वर्षांचें होतें. पुण्यांत त्यांना घरीं संस्कृत शिकविण्यासाठीं शास्त्री ठेवण्यांत आला होता व त्याच्या जवळ हरिभाऊंनीं काव्यनाटकादिकांचा बराच अभ्यास केला. हरिभाऊ पुण्यास आल्यानंतर दोन वर्षांनीं न्यू इंग्लिश स्कूल ही नवीन शाळा निघाली व हरिभाऊ हायस्कूल सोडून या शाळेंत गेले, व याच शाळेंतून ते मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठीं ते डेक्कन कॉलेजांत गेले. न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं फर्ग्युसन कॉलेज काढतांच डेक्कनमधून ते फर्ग्युसनमध्यें आले. या कॉलेजांत एक वर्ष घालवून पुन्हा ते डेक्कनमध्यें गेले. या दोन्ही कॉलेजांत मिळून सरासरी पांच वर्षें त्यांनीं काढलीं. हरिभाऊंचा ओढा व आसक्ति एका विषयाकडे; हरिभाऊंचा आणि गणिताचा तर छत्तिसाचा आंकडा! यामुळें हरिभाऊंची कॉलेजच्या परीक्षेंत प्रगति होऊं शकली नाहीं आणि अर्थात् युनिव्हर्सिटीला आपली एखादी पदवी त्यांना अर्पण करतां आली नाहीं. पण त्यांच्या अंगच्या रसज्ञता व मर्मज्ञता या गुणांचें तेज शाळा व कॉलेज या दोन्ही ठिकाणच्या गुणज्ञ गुरुजनांच्या नजरेस आलें व त्यामुळें हरिभाऊ त्यांच्या सकौतुक आदरास व प्रेमास पात्र झाले. त्यांना वाचनाचा छंद फार होता व त्या पायीं हजारों रुपये त्यांनीं वेंचले. आपली वाचनाची तृष्णा तृप्त करण्यासाठीं ते फ्रेंच व जर्मन भाषा शिकले. केक हजार ग्रंथ त्यांनीं सर्व भाषांतील मिळून वाचले आणि वाङ्मयप्रासादाच्या प्रत्येक दालनांत त्यांनीं प्रवेश केला.

हरिभाऊंचें जीवितकार्य त्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या हेंच आहे. ह्या कादंबऱ्या त्यांनीं जनमनोरंजनार्थ लिहिल्या नाहींत. त्या पतितांच्या उद्धारासाठीं, दीनांच्या दुःखविमोचनासाठीं, मार्गभ्रष्टांना सन्मार्गदर्शनासाठीं, हताश झालेल्या हृदयांत नवचैतन्य उत्पन्न करण्यासाठीं, समाजशुद्धीसाठीं, राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्यासाठीं, त्यांनीं लिहिल्या.

'आजकालच्या गोष्टी–मधली स्थिति' ही त्यांची पहिली कादंबरी हरिभाऊंनीं कॉलेजांत असतांना लिहिली, व पुणेंवैभव ह्या अस्तंगत साप्ताहिक पत्रांत ती

१८८५ सालीं प्रसिद्ध झाली. ह्या कादंबरीचीं पहिलीं दोन प्रकरणें प्रसिद्ध होतांच केवळ पुण्यांतच नव्हे, तर सगळ्या महाराष्ट्रांतील वाचकवर्गांत मोठी खळबळ उडून गेली. या कादंबरीनंतर हरिभाऊंची आजकालच्या गोष्टींतली दुसरी गोष्ट 'गणपतराव' ही कानिटकर मंडळीच्या मनोरंजन मासिक पुस्तकांत प्रसिद्ध होऊं लागली. तेव्हां या लिखाणाची इतकी गोडी लागली कीं पुढील प्रकरण केव्हां प्रसिद्ध होईल व केव्हां तें आपण वाचूं इतका चटका लोकांना लागला; यावरून या उदयोन्मुख कादंबरीकाराच्या लेखणींत वाचकांच्या मनांत खळबळ उडवून देण्याचें कसें सामर्थ्य होतें याची साक्ष पटते. या मनोरंजन मासिकांत हरिभाऊंनीं गणपतराव व चाणाक्षपणाचा कळस या दोन कादंबऱ्या; श्रुतकीर्तिचरित्र व जयध्वज हीं दोन नाटकें; मारून मुटकून वैद्यबुवा, पळपुट्या वैद्य इत्यादि मोलियरच्या आधारें लिहिलेलीं प्रहसनें, कांहीं लहानसहान गोष्टी, निबंध व कविता लिहिल्या.

लोकशिक्षणाचें, बहुजनसमाजांत विचारजागृति करण्याचें कार्य विस्तृत प्रमाणावर करण्यासाठीं सन १८९० सालच्या आक्टोबरांत हरिभाऊंनीं 'करमणूक' पत्र काढलें. यावेळीं जुन्यानव्याचा झगडा जोरानें चाललेला होता. सुधारकांच्या मतांचा उच्चारहि बहुजनसमाजास अभद्र वाणीसारखा वाटे, इतकी त्यांविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति होती. ही अप्रीति नाहींशी करून इष्ट सुधारणांना लोकमत अनुकूल करण्याचें कार्य हरिभाऊंनीं करमणुकीच्या द्वारें अत्यंत यशस्वीपणें केलें.

करमणूक पत्र त्यांनीं अठ्ठावीस वर्षें चालविलें आणि स्वभाषेची आणि स्वदेशाची सेवा त्यांनीं या पत्राच्या द्वारें प्रामुख्यानें केली. पुणें–वैभवांत प्रसिद्ध झालेली मधली स्थिति व त्यानंतर मनोरंजनांत लिहिलेल्या गणपतराव (ही अपुरीच राहिली) व चाणाक्षपणाचा कळस ह्या कादंबऱ्यांखेरीज बाकी आपल्या सर्व कादंबऱ्या त्यांनीं करमणुकींतूनच प्रसिद्ध केल्या. ह्या कादंबऱ्याशिवाय शेंकडों मोठ्या व छोट्या गोष्टी, लहान लहान निबंध, छोटीं चरित्रें, निवडक माहिती, कविता, चुटके, वगैरे किती तरी मजकूर त्यांनीं लिहिला. प्रचलित राजकारण, सामाजिक, धार्मिक इत्यादि प्रश्नांवर वर्तमानपत्रांतून होणारे वादविवाद यांपासून आपल्या करमणुकीस अलिप्त ठेवावयाचें असें जें धोरण त्यांनीं प्रारंभींच ठरविलें, तेंच अखेरपर्यंत मोठ्या दक्षतेनें त्यांनीं कायम राखलें. आपलीं राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि बाबतींतील मतें त्यांनीं आपल्या

कादंबऱ्यांतील पात्रांच्या मुखांतून वदविलीं आणि तींहि मोठ्या खुबीनें व चटकदार रीतीनें; पण इतर वर्तमानपत्रांसारखी या विषयांची चर्चा त्यांनीं करमणुकींतून कधींहि केली नाहीं. या प्रश्नांची विशेष चर्चा करण्याची, विशेषतः सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्याची, त्यांना जेव्हां आवश्यकता वाटली, त्यावेळीं त्यांनीं सुधारकाचें पुनरुज्जीवन केलें.

हरिभाऊंनीं करमणुकींतून एकंदर १८ मोठ्या कादंबऱ्या लिहिल्या; त्यांपैकीं ८ सामाजिक असून १० ऐतिहासिक आहेत. 'चाणाक्षपणाचा कळस' सारखी केवळ मनोरंजक कादंबरी त्यांनीं पुढें लिहिली नाहीं. ह्याशिवाय 'गड आला पण सिंह गेला!' ही कादंबरीवजा मोठी गोष्ट त्यांनीं लिहिली; कादंबऱ्यांपैकीं म्हैसूरचा वाघ, सूर्यग्रहण व कालकूट ह्या कादंबऱ्या अपूर्ण आहेत. त्यांच्या करमणुकीवर व त्यांच्या कांहीं कादंबऱ्यांवर त्या वेळीं येऊं पाहणारें गंडांतर त्यांच्या एका हितचिंतकाच्या व थोर मित्राच्या खटपटीमुळें टळलें म्हणून बरें, नाहींपेक्षां त्यांच्या कांहीं उत्कृष्ट कादंबऱ्यांस कायमचा—निदान कांहीं काळ तरी—महाराष्ट्र मुकला असता. मी व यशवंतराव खरे या कादंबऱ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना त्यांचीं शेवटलीं प्रकरणें आज त्या पुस्तकांत आहेत त्याहून निराळ्या तऱ्हेनें लिहिण्याचें त्यांच्या मनांत होतें. पण सदर गंडांतराच्या वावटळीमुळें तो विचार त्यांना सोडून देणें भाग पडलें. वज्राघात ही त्यांनीं संपूर्ण लिहिलेली शेवटची कादंबरी होय. त्यांनीं वज्राघात लिहिण्यास आरंभ केला, त्या वर्षीं त्यांच्या आवडत्या मुलीच्या मृत्यूनें त्यांच्या हृदयावर वज्राघात झाला. करमणुकीचे तेव्हांचे चालक गोविंदराव डुकले त्याच वर्षीं दिवंगत होऊन बाबाजी सखाराम कंपनीवर वज्राघात झाला व हरिभाऊंच्या कादंबरीलेखनावरहि वज्राघातच झाला. यानंतर त्यांनीं करमणुकींत नवीन कादंबरी लिहिली नाहीं. पुणें-वैभव, कानिटकर मंडळीचें मनोरंजन व स्वतःची करमणूक यांशिवाय त्यांची कादंबरी अन्यत्र कोठेंहि प्रसिद्ध झाली नाहीं. 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या त्यांनीं दुष्काळावर लिहिलेल्या मोठ्या गोष्टीचें त्यांनींच इंग्रजींत केलेलें भाषांतर मात्र 'रामजी' या नांवानें विलायतेंतील प्रख्यात मेसर्स फिशर अनविन कंपनीनें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें.

मनोरंजनांत प्रसिद्ध केलेल्या नाटकांशिवाय संत सखूबाई व सती पिंगला हीं दोन नवीन नाटकें त्यांनीं लिहिलीं. निरनिराळ्या विद्वज्जनसभांपुढें वाङ्मयावर सुंदर

भाषणें केलीं व निबंध वाचले. विद्यार्थिदर्शेंतहि त्यांनीं कांहीं चांगले निबंध लिहिले व काव्यरचना केली. साप्ताहिक अँग्लो-मराठी ज्ञानप्रकाशाचीं व पुढें ज्ञानप्रकाश दैनिक झाल्यावर त्याचीं संपादकीय सूत्रें कांहीं काल त्यांच्याकडे होतीं व सुधारकाचें पुनरुज्जीवन केल्यावर त्यांत कांहीं सुंदर निबंध त्यांनीं लिहिले. हा त्यांचा सगळा लेखनोद्योग मनांत आणला म्हणजे वाङ्मय-क्षेत्रांत त्यांनीं केलेली कामगिरी केवळ संख्येच्या दृष्टीनेंहि फारच मोठी आहे अशी खात्री पटल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्या आयुष्याचा लेखनव्यवसायांत गेलेला काल साधारणतः पसतीस वर्षांचा आहे. पण त्यांत जास्त नेटाची व उत्साहपूर्वक कामगिरी करमणुकीच्या सुरवातीपासून पुढील २०–२१ वर्षांतच झाली.

हा सगळा लेखनाचा प्रचंड खटाटोप त्यांनीं लोकशिक्षणासाठीं व बहुजनहित-साधनासाठीं केला; पैशासाठीं अगर कीर्तीसाठीं केला नाहीं. त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन कीर्ति त्यांच्याकडे धांवत आली, तशी लक्ष्मी मात्र आली नाहीं. श्री आणि सरस्वती यांच्यांत छत्तिसाचा आंकडा असतो हाच सिद्धांत पुनश्च प्रस्थापित करणारें महाराष्ट्रांतील ह्या कादंबरीकारकुलगुरूचें चरित्र आहे. आर्यभूषण छापखान्यानें आणि महाराष्ट्रांतील या नामांकित मुद्रणालयाचे निःसीम सेवक कै. रा. रा. केशवराव बाळ यांनीं वेळोवेळीं त्यांना जें साह्य केलें तें केलें नसतें व अखेर त्यांचे परममित्र गोपाळराव गोखले यांच्या ‘सर्व्हंट्स ऑफ् इंडिया सोसा-यटी’नें त्यांच्या ऋणविमोचनाची व त्यांच्या कुटुंबाच्या आजन्म निर्वाहाची व्यवस्था केली नसती तर त्यांच्या मनाला होणाऱ्या सांपत्तिक दुःस्थितीच्या वेदना अखेरच्या क्षणापर्यंत वाढत गेल्या असत्या.

चुलते अण्णासाहेब यांनीं आपल्या संपत्तींतली एक कपर्दिकहि जरी हरि-भाऊंना दिली नाहीं, तथापि त्यांनीं आयुष्याच्या अखेरीस ‘आनंदाश्रम’ ही संस्था स्थापन करून शिल्लक संपत्तीचा सद्व्यय केला, व त्या आश्रमाची व्यवस्था ठेवण्याचें काम हरिभाऊंच्या हातीं सोंपवून त्या आश्रमाच्या खर्चांतून हरिभाऊंच्या संसारयात्रेची थोडीशी सोयहि करून ठेविली. हरिभाऊंनीं या आश्रमांत पंचवीस वर्षें वास्तव्य केलें आणि त्यांचा लेखनाचा बहुतेक उद्योग याच आश्रमांत झाला.

कौटुंबिक सुखाचा वांटा या कादंबरीकाराच्या भागधेयांत विधीनें लिहिला नव्हता असें म्हटलें पाहिजे. अगदीं शैशवांत मातृसुख संपलें; जुन्या वळणामुळें

व विचारामुळें पित्याचा लळा लागला नाहीं; तारुण्यांत प्रथम पत्नी व तिला झालेलीं तिन्हीं मुलें गेलीं; द्वितीय विवाह केल्यावर फार वर्षांनीं त्यांना एक मुलगी झाली पण आयुष्याच्या उतरणीजवळ ते येत आहेत तोंच काळानें तिला उचलून नेलें आणि यानंतर बरोबर एक वर्षानें त्यांचे परम स्नेही गोपाळराव गोखले गेले. अशीं त्यांच्या कौटुंबिक दशेंत आभाळावर आभाळें येत गेलीं. पण त्यांच्या प्रेमळ स्वभावांत, सौजन्यांत, आदरातिथ्यवृत्तींत अगर स्नेहशीलपणांत कधींहि बदल झाला नाहीं. गर्वानें त्यांना स्पर्श केला नाहीं; विनयाची वृत्ति त्यांना सोडून गेली नाहीं.

त्यांनीं वाङ्मयाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतहि पुष्कळ कार्य केलें व बहुमान मिळविला. पुण्यांतील प्रमुख पुढाऱ्यांत त्यांची गणना होत होती. पुणें म्युनिसिपालिटीचे ते एक वेळ अध्यक्ष होते. ज्या युनिव्हर्सिटीची परीक्षा ते पास होऊं शकले नाहींत त्याच युनिव्हर्सिटीनें त्यांना आपल्या अत्युच्च परीक्षेंत पुढें मराठीचे परीक्षक नेमलें. मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें वुईलसन फायलालॉजिकल लेक्चरर म्हणून त्यांची नेमणूक होऊन त्यांनीं सन १९१५ सालीं Marathi–its Sources and Development या विषयावर सहा व्याख्यानें दिलीं. १९१५ सालीं पुण्यास भरलेल्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या स्वागत मंडळाचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं फार मोठा मित्रपरिवार गोळा केला, व त्यांत अनेक थोर विद्वान् होते.

अखेर दीपनिर्वाणाचा दिवस आला. १९१८ च्या आक्टोबरांत त्यांच्या एका डोळ्यास पक्षघाताचा विकार झाला. त्यांतून बरे झाल्यावर बंगाल्यांतील रेल्वेचे शेअर खपविण्यास ते कलकत्त्यास गेले. तेथून परत येतांना वाटेंत त्यांना जलोदराचा विकार झाल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें. औषधोपचारासाठीं ते मुंबईस आले, पण दुखणें वाढत गेलें. यावेळीं १९१९ च्या मार्च महिन्याची सुरुवात होती. त्या महिन्याच्या तिसऱ्या तारखेस ते मुंबईहून पुण्यास गेले. दुपारीं १ वाजतां ते आनंदाश्रमांत जाऊन पोहोंचले आणि त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांच्या जीर्ण शरीराचा त्याग करून त्यांतील चैतन्य शाश्वतांत विलीन झालें.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ कथानकाचा काळ | ... | १ |
| २ महत्त्वाची बातमी | ... | ३ |
| ३ महाराजांच्या दर्शनास | ... | ९ |
| ४ वीरपत्नी | ... | १२ |
| ५ वकिलाशीं सल्लामसलत | ... | १८ |
| ६ कुणब्याच्या वेषांत... | ... | २९ |
| ७ सुडाची तळमळ | ... | ३२ |
| ८ तपस्वीबोआंचें कारस्थान | ... | ३८ |
| ९ ओळख पटली | ... | ४३ |
| १० सावजीनें काय ऐकलें ? | ... | ४७ |
| ११ हा काय चमत्कार ! | ... | ५१ |
| १२ सावजीच्या शोधार्थ | ... | ५४ |
| १३ जाधवरावाची पत्नी | ... | ५८ |
| १४ शिष्यीण झाली | ... | ६३ |
| १५ तुझा दुष्मन्, तो जगाचा हितकर्ता ! | | ६९ |
| १६ गूढ उकललें ! | ... | ७२ |
| १७ बेत फसल्यावर | ... | ७६ |
| १८ खानाचा अंतस्थ कावा | ... | ८० |
| १९ हेजीब व बालगोसावी | ... | ८२ |
| २० गोसावीणबाई | ... | ८८ |
| २१ अकल्पित भेट | ... | ९४ |
| २२ दोघांचा विचार | ... | ९८ |
| २३ महाराजांचा खानास निरोप | ... | १०५ |
| २४ महाराजांचें स्वप्न | ... | ११० |
| २५ तयारी झाली | ... | ११२ |
| २६ समर्थांचा कृपाप्रसाद | ... | ११५ |
| २७ निकाल झाला | ... | ११७ |
| २८ आनंद | ... | १२१ |

# सूर्योदय

## कथानकाचा काल : : १

आमची ही कथा कोणत्या काळाला उद्देशून आहे व त्यावेळीं महाराष्ट्राची मनःस्थिति कशा प्रकारची होती हें प्रथम सांगणें जरूर आहे. हा काल स्वराज्यसूर्योदयाचा होता. या वेळीं महाराष्ट्रांत स्वराज्य-स्थापना होणार याबद्दल शंका जर असली तर ती फारच थोड्यांना होती. परंतु ती स्थापना होणार आणि महाराष्ट्र तरी मोंगलांच्या जुलुमापासून सुटणार अशी उमेद बहुतेक तरुणांस वाटूं लागली होती. कांहीं काळापूर्वी शिवाजी म्हणजे एक उगीच कांहीं तरी टारगेपणा करणारा शहाजीचा मुलगा असें जें कित्येकांस वाटत होतें तें आतां वाटेनासें झालें होतें. आतां, तो कर्तृत्ववान् पुरुष आहे आणि कांहींना कांहींतरी करून तो विजापुरकरांच्या तावडींतून महाराष्ट्र सोडवील असें पुष्कळांस पक्केपणें वाटूं लागलें होतें. नदीचें मूळ अगदीं करंगळीपेक्षांही बारीक असतें; वडापिंपळाचें बीं अतिशय सूक्ष्म असतें; परंतु बोटभर पाण्याच्या धारेलाच आणखी धारा येऊन मिळाल्या म्हणजे ती महानदी होऊन कितीतरी प्रदेशाला अन्नपाणी देणारी होते. राईहून बारीक बीं मोठा थोरला वृक्ष बनून हजारों माणसांस छाया देतो. तद्वत् पहिल्यानें अगदीं यःकश्चित् असा वाटला तोच शहाजीचा मुलगा आतां पुष्कळांस कार्यकर्ता पुरुष वाटूं लागला. त्यास कोणीं मिळूं नये, त्याची संगति धरूं नये असें म्हणणारे म्हातारे आतां नाहींसे झाले किंवा जे राहिले होते त्यांचें मन आतां पूर्वींइतकें जोरदार राहिलें नाहीं. ते 'बरें आहे झालें तर, पण होईल तेव्हां खरें' असें म्हणण्याच्या स्थितीला आले होते; आणि महाराष्ट्रांतला कोणीही तरुण पुरुष तर आतां विजापुराकडे किंवा अलमगीराकडे न पाहतां शिवाजीराजाकडेच आपला मोर्चा फिरवूं लागला. त्यास मदत करणें, त्याच्या परिवारांत किंवा सैन्यांत शिरणें यांतच मोठेपणा मानूं लागला,

आणि हस्तें परहस्तें त्या महावीरानें आरंभिलेल्या कार्यांत त्यास साहाय्य करणें यांतच पुरुषार्थ मानूं लागला. मोंगलांची किंवा विजापुरकरांची नोकरी सोडून एकदम शिवाजीराजांस मिळणें म्हणजे पाप करणें तर नव्हेच, परंतु पुण्य करणें होय असें ज्यास त्यास वाटून जो तो महाराजांस साहाय्य करण्याविषयीं उत्सुक झाला. शिवाजीराजांस कोणचाही किल्ला सर करण्यास फार श्रम करावे लागले नाहींत किंवा मनुष्यहानि करून घ्यावी लागली नाहीं, याचें कारण काय, हें जर कोणीं बारकाईनें पाहिलें तर स्वराज्य स्थापन होण्याविषयींची सर्व लोकांची लालसा हेंच होय, असें सहज दिसून येणार आहे.

हा पुरुष स्वार्थासाठीं कांहींसुद्धां करीत नाहीं, जें काय करतो तें केवळ स्वराज्याच्या स्थापनेसाठीं करतो आहे; गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावा याखेरीज दुसरा कांहींही हेतु त्याच्या निर्मल अंतःकरणांत नाहीं हें प्रत्येक मनुष्याच्या मनांत पूर्णपणें बाणून राहिलें होतें. त्यामुळें त्यास मदत करावी या विचाराखेरीज दुसरा विचार त्यावेळीं सगळ्या महाराष्ट्रांत एखाद्याच माणसाच्या मनांत असला तर असेल. बाकी बहुतेकांच्या मनांत त्याला मदत करावी हेंच होतें. निदान त्यास त्यानें स्वीकारलेल्या कामांत यश यावें अशी इच्छा तरी फार दृढ होती यांत शंका नाहीं. साधारणतः महाराष्ट्रांतील लोकांच्या मनाची ही स्थिति.

इकडे विजापुरकरांच्या मनांतही आतां निराळेच विचार येऊं लागले होते. आतांपर्यंत 'उगीच पोर दांडगाई करीत असेल, शहाजीराजांकडून जरब देवविली कीं वठणीस येणार आहे,' असें जें त्यांस वाटत असें, तें सर्व फिरलें. आतां या पोराला चांगलीच शिक्षा केली पाहिजे असें दरबारीं व खुद्द हजरतींसही वाटूं लागलें. शहाजीराजांस अनेक वेळां सांगून पाहिलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शहाजीराजांनीं आपल्याकडून पुष्कळ सांगितलें कीं, मीं लिहिलें असतांही त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. परंतु कित्येक दिवसपर्यंत तें दरबारीं खरें वाटलें नाहीं. राजासारख्यांचा मुलगा त्यांच्या कह्यांत नाहीं हें शक्यच दिसेना. यांचीच

आंतून त्यास फूस असेल असें सर्वांस वाटलें आणि सर्वांनीं त्यांजवर मोठें काहूर केलें. परंतु त्यांचा तरी काय इलाज होता ! इतका प्रकार जेव्हां झाला तेव्हां हजरतीचे आणि दरबारचे डोळे उघडले. शिवाय किल्ले भडाभड शिवाजीला वश झाले, आपलीं ठाणीं तेथून उठून त्याचीं ठाणीं बसूं लागलीं अशाबद्दल बातम्यांवर बातम्या येऊं लागल्या; तेव्हां विजापुरकरांस वाटूं लागलें कीं, आपण 'पोर, पोर,' 'यःकश्चित्, यःकश्चित्,' म्हणून सोडून देतों हें बरें नव्हे. कांहींना कांहीं तरी करून त्याच्या स्वराज्याचा अंकुर वृक्षत्व पावण्याच्या आधींच तोडून टाकला पाहिजे. नाहीं तर त्या वृक्षाचीं पाळेंमुळें दिवसानुदिवस पसरत पसरत जाऊन आपल्या तख्ताच्या खालींही यावयाचीं; इतकेंच नव्हे तर, तें तख्त उलथून पाडण्यास कारण व्हावयाचीं. त्यापेक्षां आतांच तीं पाळेंमुळें खणून काढून बीजाचाही नाश करून टाकला पाहिजे असा विचार करून त्यांनीं एका पाठीमागून एक सरदार शिवाजी-राजास धरण्यास, अगर सांपडला नाहीं तर त्यास जीवें मारण्यास इकडे महाराष्ट्रांत पाठविले. त्यांपैकीं एकासही यश आलें नाहीं. त्यामुळें प्रकरण फारच चिडीस गेलें, 'आपल्या दरबारीं असा कोणी नाहीं काय, कीं जो महाराष्ट्रांत जाऊन या उर्मट पोरास पकडून येथें आणील ?' अशा प्रकारचे उद्गार वारंवार निघूं लागले. शेवटीं मोठ्या आढ्यतेनें अफझलखानानें ती कामगिरी पतकरली आणि 'मी त्याला जिवंत धरून आणीन किंवा मारीन' अशी प्रतिज्ञा करून तो विजापुराहून आपल्या प्रचंड सेनेसह निघाला. ही बातमी शिवाजीमहाराजांस कशी कळली हें पुढें समजेल.

---

## महत्त्वाची बातमी : : २

ऐन पंचविशीचा अंमल. सरदार पण असा ऐटींत दिसे कीं कोणी पाहिला तर त्याच्या तोंडून 'वा !' असाच शब्द निघावा. वर्ण बरा-चसा सांवळा, आणि त्यांत उन्हातान्हांतून हिंडणें, अन्न आहे आहे, नाहीं नाहीं, जें मिळेल तें खावें, वेळीं नुसतींच शाळूचीं अगर बाजरीचीं जीं ज्या

वेळीं मिळतील तीं कणसें काढावीं, हातावर चोळावीं आणि फक्क्या माराव्या व पुढें कामास लागावें अशी स्थिति. अन्न नाहीं किंवा पाणी मिळेना, म्हणून कधीं कामास हरकत झाली आहे किंवा विलंब झाला आहे असें मुळींच घडावयाचें नाहीं. यामुळें चर्या जास्तच काळवंडलेली होती. तथापि डोळे फार पाणीदार आणि चंचल. जणूं काय एका दृष्टिक्षेपांत जें कांहीं दिसेल तें बारीकसारीकसुद्धां अगदीं पूर्णपणें मनांत उतरावयाचें. घोड्यावर मांडही अशी ऐटीची होती कीं, जणूं काय चित्रीं रेखल्याप्रमाणें. जवळ शस्त्रें तीन—भाला, तलवार आणि तिरकमठा; या त्रयींनें त्रिभुवन जिंकून घेईन अशी उमेद चर्येवर दिसत होती. घोडा दमानें चालला होता. त्यानें बरीच मजल मारली होती. पंढरपूर सोडून सुमारें दहा कोसांवर स्वारी आली होती. वाटा पुऱ्या माहीत असल्याकारणानें, राजरस्त्यानें चालावयाचें नाहीं; लवकरच पोंचूं अशा रस्त्यानें जावयाचें; असा मनाचा कृतनिश्चय दिसला. रानांत घुसल्याखेरीज रहावयाचें नाहीं; तेथें आपल्यावर काय संकट येतील याबद्दल दिक्कत कधीं मनाला शिवलीसुद्धां नाहीं. प्रातःकाळची वेळ, आकाशाचा तांबडेपणा जाऊन त्यांतील तेजास पांढरेपणा आला होता. सूर्य थोडा वर आला होता. त्यास कोठें तरी जाण्याची फार घाई होती. रोंख पुण्याकडे जाण्याचा होता, आणि मनांत नानाप्रकारचे विचार चालले असावे असें स्पष्ट दिसत होतें.

अशा स्थितींत कोठें तरी वाघाची चाहूल असावी असा त्या सरदारास भास झाला. घोडा तर तेव्हांच चमकला. मोठ्यानें फुरफुरूं लागला. त्यानें पायाखालची जमीन उकरण्यास व थयथय नाचण्यास आरंभ केला. वरच्या शिपायानें सभोंवार दृष्टि फिरविली. गुरगुर तर खास कानीं पडली. ज्याअर्थीं गुरगुर आहे, त्याअर्थीं कोठें तरी जवळच स्वारी असावी असें वाटलें. परंतु नजरेस कोठेंच कांहीं येईना. संकट कोठून येणार हें समजलें नाहीं म्हणजे कसाहि शूर पुरुष असला तरी त्याच्या चित्ताची अणुरेणु तरी चलबिचल होतेच. त्याप्रमाणें क्षणमात्र आमच्या या सरदाराची अवस्था झाली. तथापि

एक तर काय पण चारही बाजूंनीं चार 'वाघरें' आलीं तरी आपण त्यांस लंबे करूं, ही छाती असल्यामुळें कचर म्हणून त्यानें खाल्ली नाहींच. उलट आज आपणांस चांगलीच शिकार मिळणार म्हणून त्याची चित्तवृत्ति आनंदित झाली व त्याचे बाहू स्फुरण पावूं लागले. त्यानें पुन्हां एकवार आपले तीक्ष्ण डोळे सभोंवार फिरविले, तों दूर ओढ्याच्या कांठीं कांहींतरी धडपड चालली असावी असा संशय त्यास वाटला. लागलीच त्यानें आपल्या घोड्यास चांगली जोरानें टांच मारली, आणि तोंडानें 'चल, रणबीर, वाघाच्या वासाला इतका घाबरतोस?' असें आपल्या घोड्यास म्हटलें. त्या बोलण्यानें रणबीरास थोडा धीर आलासें दिसलें, आणि त्यानें एकवार मान वळवून पुढें धांव घेतली. परंतु ही धांव फार वेळ टिकली नाहीं. लवकरच रणबीर थांबला हें पाहून सरदार लागलाच खालीं उतरला. तों पुनः दोन मोठ्या गुरकण्या त्याच्या कानीं पडल्या. वास्तविक पाहतां त्यानें घोड्यावरून उतरून पायीं वाघाच्या अंगावर जाणें म्हणजे मोठें धाडसाचेंच काम होतें. परंतु आमच्या या तरुण सरदारास अमुक एक गोष्ट म्हणजे धाडस आहे, असें मुळींच वाटत नसे.

तो सुमारें शंभर कदम पुढें गेला असेल नसेल, तों वाघाच्या गुरगुरण्याचा व शेपट्या हापटण्याचाही शब्द स्पष्टपणें ऐकूं येऊं लागला, आणि पुढें पाहतो तों भयंकर प्रकार दृष्टीस पडला. दोन भले जंगी वाघ एकमेकांशीं लढाई करीत होते. दोघांच्याही अंगांतून रक्ताचे प्रवाह सुरू झाले होते. दोघांचींही अंगें ओरखडलीं गेलीं असून, कित्येक ठिकाणीं अंगाचे वाभाडेही निघाले होते. तो देखावा पाहून आमच्या सरदारास विलक्षण आश्चर्य वाटलें. त्यानें आजपर्यंत वाघ मारले खरे; परंतु असे दोन वाघ आपसांत लढतांना त्यानें कधीं पाहिले नव्हते. यामुळें किती वेळ तरी तो देखावा पहातच उभें राहावं असें त्यास वाटलें. एक वाघ दुसऱ्यापेक्षां बराच लहान होता, परंतु फारच चपळ होता. दुसरा भला धिप्पाड आणि फार क्रूर परंतु मठ्ठ दिसत होता. त्याचा दम सुटला. धाकट्यानें त्याच्या डोळ्यावरच जबरदस्त जखम

केली. त्याबरोबर तो पाठ फिरवून पळूं लागला. ही संधि साधून आमच्या सरदारानें एक अचुक तीर सोडून त्यास जायबंदी केलें. पण इतक्यांत दुसरा वाघ त्याच्यावरच चाल करून आला व तो त्याजवर झांप टाकणार तोंच सरदारानें अवधान राखून आपला भाला त्याच्या काळजावर रोखून मारला व त्यास पुरें चीत केलें. नंतर रणबीरावर बसून तो आपल्या मार्गाला लागला. त्या वेळीं त्याच्या मनांत नानाप्रकारचे विचार येत होते. 'काय? जी बातमी आज आपण पोंचविण्यास चाललों आहों तिचा परिणाम असाच सुखदायक होईल काय? हा थोरला लठ्ठ वाघ—आतां विजापुराहून मुद्दाम निघालेला तो वाघ—आमच्या लहानशा सिंहाचा प्राण घेणार काय? काय बिशाद आहे त्याची! जो प्रकार या दोघांत आतां झाला, तोच त्या दोघांत होणार. परंतु महाराजांनीं बेसावध असूं नये म्हणून आपण शक्य तितकी त्वरा करावी, हें बरें.' असा विचार करून त्यानें महाराज राजगडावर होते तिकडे मोर्चा फिरवला. मजल दरमजल करून स्वारी रायगडावर जाऊन पोंचली. रितीप्रमाणें वर्दी जाऊन लागलीच भेटीस येण्याची परवानगी आली. सरदारानें पुढें होऊन फार लवून महाराजांस रामराम केला आणि तो हात जोडून उभा राहिला. तेव्हां महाराजांचे जवळ त्यांची नेहमींची मंडळी आपापल्या दर्जाप्रमाणें उभी व बसलेली होती. जिजाबाईसाहेब महाराजांपासून जवळच बसल्या होत्या. त्यांनीं त्या सरदाराकडे न्याहाळून पाहिलें आणि किंचित् स्मित करून म्हटलें, "कोण, सावळ्या?"

त्याबरोबर, "होय, आईमहाराज, मीच तो; कांहीं......" असें त्या सरदारानें उत्तर दिलें, परंतु तितक्यांत महाराज आईसाहेबांकडे वळून हंसत हंसत म्हणतात, "आईसाहेब, हें काय हें! 'सावळ्या, सावळ्या' म्हणूं नये म्हणून आपलीच त्याला 'सर्जेराव' म्हणण्याबद्दल आम्हां सगळ्यांना ताकीद होतीना?"

"खरंच, खरंच, तो किती मोठा झाला आहे तरी, माझ्या तोंडांत आपलं

सावळयाच येतं. सुलतानगड घेतल्यावर तूं परत आलास त्याला घेऊन, तेव्हां जी याची मूर्ति पाहिली, ती आपली माझ्या ध्यानांत बसली आहे. आणखी आज तीन वर्षांत हा विजापुरास गेल्यापासून तर त्याला पाहिलाच नाहीं. कां सर्जेराव, तुमच्या अंगावर हें रक्त कसलं उडालं आहे ? वाटेंत कांहीं शिकार मारली वाटतं ! तुम्ही सरळ कुठले यायला ? कांहीं तरी करायचेंच."

सरदार विनयानें म्हणतो, "कांहीं नाहीं, आईमहाराज. तसं कांहीं नाहीं, पण मी मोठी महत्त्वाची बातमी घेऊन स्वतः उभयतांच्या चरणांपाशीं सांगायला आलों आहें."

"ती काय?" महाराजांनीं व जिजाबाईनीं दोघांनींही एकदम विचारलें.

"आजपर्यंत झालेले प्रयत्न थकले, तेव्हां आतां हजरतींनीं अफ़्झल्खानाला इकडे येऊन पारिपत्य करण्याचा हुकूम केला आहे."

"कोणाला, अफ़्झल्खानाला ?" महाराजांनीं आश्चर्यानें विचारलें.

"होय सरकार. आणखी त्यानं अशी शपथ खाल्ली आहे कीं, महाराजांना धरून हजरतींच्या पुढें नेईन किंवा मा .....” पुढें तो बोलेना.

तेव्हां महाराज त्यास म्हणतात, "'किंवा मारीन' असंच कीं नाहीं ? कांहीं हरकत नाहीं. आजपर्यंत असे कितीक आले आणखी कितीक गेले ! एकूण आतां अफ़्झल्खान येणार काय ? कधीं निघणार ?"

"कधीं निघणार कसला सरकार, तो निघालासुद्धां."

"बरं निघूं दे. कांहीं हरकत नाहीं." असें म्हणून महाराजांनीं मातुःश्री जिजाबाई व इतर कारभारी मंडळींशीं कांहीं मनसुबा केला. नंतर त्यांनीं राजगडावरून आपला तळ हलवून महाबळेश्वरानजीक प्रतापगडचा आश्रय केला प्रतापगडास आल्यावर महाराजांनीं सर्जेरावास कांहीं महत्त्वाची कामगिरी सांगून 'पुन्हां तूं विजापुरास जा' अशी आज्ञा केली, पण आपण पुन्हां विजापुरास गेल्यानें कांहीं विशेष होणार नाहीं, येथेंच राहिल्यानें आपला अधिक उपयोग होईल, असें सर्जेरावाच्या मनानें घेतलें होतें; परंतु महा-

राजांच्या आज्ञेचें उल्लंघन करणें म्हणजे विस्तवाशीं खेळण्याप्रमाणेंच होय, हें इतरांप्रमाणें त्यालाही पक्कें ठाऊक असल्यामुळें त्यानें आपली वाट धरली. वाटेंत एका झाडाखालीं एक फकीर बसलेला आहे आणि त्याच्या भोंवतीं दहावीस लोक–बहुतकरून मुसलमान–जमलेले आहेत असें त्यानें पाहिलें. ही काय मौज आहे हें पाहण्याची सहजच आमच्या सर्जेरावास इच्छा झाली म्हणून तो त्या घोळक्याकडे गेला. त्याला पहाण्याबरोबर फकीरानें त्यास मोठ्यानें हांक मारून शिव्या देण्यास प्रारंभ केला, त्याची आणि त्याच्या धर्माची नालस्ती करून त्याजवर यथेच्छ तोंडसुख घेतलें आणि शेवटीं म्हणाला, "आतां हा अफ्झलखान आला आहे हा तुमची पक्की फजिती करून, तुमच्या शिवाजीला गिरफदार केल्यावांचून येथून जात नाहीं."

असें त्या फकीराचें अगदीं अपमानकारक भाषण ऐकून सर्जेरावास अतोनात राग आला. ती रागाची चर्या पहाण्याबरोबर फकीरानें आणखी तोंड सोडलें. इतक्या मुसलमानांच्या समाजांत आपण एकटे सांपडलों म्हणून हा आपल्यावर तोंडसुख घेतो आहे, असें मनांत येऊन सर्जेरावानें त्यास म्हटलें, 'साधुसंत, फकीर यांच्यावर हत्यार उचलावयाचें हें आमचें मराठ्यांचें ब्रीद नाहीं, म्हणून मी तुझें बोलणें मनावर घेत नाहीं. तूं दुसरा कोणी साधा माणूस असतास, तर तुला दाखविलें असतें."

सर्जेराव असें बोलतो न बोलतो तोंच त्या फकिराच्या भोंवतीं जमलेल्या घोळक्यांतील पांचसात असामी उठून पटकन् त्याच्या अंगावर धांवले व म्हणाले, "दाखव, दाखव. आम्ही साधे माणूस आहों. मराठ्यांचा मर्दपणा जबानींतच." असें म्हणून पांचसातजण आपल्या तरवारी उपसून त्याच्या एकट्याच्या अंगावर तुटून पडले. हें पाहून त्या फकिराच्या मनांत काय आलें असेल तें असो! तो त्या मुसलमानांस म्हणाला, "यारहो! एवढ्यावर पन्नासांनीं तुटून पडावें आणि त्याला चीत करावें हें मुसलमानांचें– महंमदाच्या पवित्र धर्माप्रमाणें चालणारांचें ब्रीद नव्हे, तर तुम्ही परत या

व त्याला सोडा." फकिराच्या आज्ञेनुसार ते परतले व म्हणाले, "साईजी, आपण सांगतां तर आम्ही या गनिमाला जीवदान देतों. पण हा बहुतकरून लबाडीनें बातम्या काढण्याच्या हेतूनें येथें आला असला पाहिजे. म्हणून आम्ही त्याला आमच्या तावडींतून जाऊं देत नाहीं.

इकडे सर्जेराव आपण येथून आतां निसटून जाण्याचा प्रयत्न करावा कीं काय, या विचारांत होता आणि या विचारांतच त्यानें एकेक पाऊल मागें मागें चालविलें होतें. परंतु त्या फकीरानें त्यास बजावलें, "अरे मराठ्या, तूं पळून जाण्याच्या भानगडींत पडूं नकोस. तूं पळूं लागलास तर तुला हे कधीं जिवंत सोडणार नाहींत." एकटा सांपडला आहेस खरा, तर प्रसंगाप्रमाणें वाग" असें बोलत बोलत फकीर सर्जेरावाजवळ गेला व त्याला फार कळकळीचा उपदेश करण्याच्या मिषानें त्यास त्यानें कांहीं इषारा दिला, आणि त्याच्या कानांतहि कांहीं अक्षरें उच्चारलीं. तीं ऐकतांच सर्जेरावाची चर्या एकदम कशीशीच झाली.

---

## महाराजांच्या दर्शनास : : ३

तुळजापुराहून सुमारें सहा किंवा आठ कोसांच्या टप्प्यावर एका राईत विजापुराहून शिवाजीमहाराजाकडे जाण्याकरितां निघालेली कांहीं मंडळी उतरली होती. एका झाडाखालीं पुरुषमंडळी होती व दुसऱ्या झाडाखालीं कनातीच्या आड मराठामोळ्यांतल्या स्त्रिया होत्या. पलीकडे दर झाडागणिक एकेक असे सुमारें पंधरा घोडे बांधले होते. जेवणखाण झाल्यावर मंडळी गप्पा मारण्याच्या भरांत आली होती इतक्यांत त्यांतील एक काळा तरुण दुसऱ्या गोऱ्या तरुणास म्हणाला, "तुळजापुरकरांनीं जगदंबेचा बचाव पण बचाव केला! ती मूर्ति जर त्या दुष्टाच्या हातीं लागती तर त्यानें तिचें पीठ करून रस्त्यावर पेरून दिलें असतें. काय करूं रे! अशा गोष्टी ऐकल्या म्हणजे अंगाची लाही होते आणि असं वाटतं..." पण यावर दुसरा गोरा तरुण हंसून म्हणाला, "जाधवराव, एवढंच वाटायचं दुसरं काय वाटणार!"

त्यावर जाधवराव म्हणाला, "मग काय म्हणतोस निरोजी, तुझ्या मतें त्यांनीं काय करायला पाहिजे होतं ? अफझलखानाच्या प्रचंड सैन्याबरोबर त्यांना सामना करणं शक्य तरी होतं ? भोप्यांनीं देवी लपविली म्हणून त्यानें संतापून सर्व गांवाला प्रायश्चित्त कसें भोगायला लावलें नाहीं, हाच मला चमत्कार वाटतो. पण कायरे, अफझलखान तर विजापुरासच होता. आपण विजापुराहून निघालों तेव्हां तर त्याला कोठें पाठविणार किंवा कांहीं कामगिरी सांगणार हें कधीं ऐकलें सुद्धां नाहीं; आणि आपण निघून अजून फार दिवस झाले नाहींत, तों तो आपल्यापुढें निघून गेलाहि ! तेव्हां विशेषच कांहींतरी उलाढाल झाली असली पाहिजे. आपणहि आतां रस्त्यांत न गमतां महाराजांच्या दर्शनास लवकर गेलें पाहिजे, म्हणजे विजापूरच्या नोकरीवर व घरादारावर पाणी सोडून त्यांची सेवा करण्यास निघाल्याचें सार्थक होईल.

असें त्यांचें बोलणें चाललें असतां त्यांच्यापासून सुमारें दोन हांकांच्या अंतरावर एकदम कांहीं गलबला झाला असून धूळ उडते आहे असें त्यांस दिसलें; व काय आहे म्हणून ही मंडळी पाहते आहे तों धुरळा आणि गलगा त्यांच्या अगदीं जवळ येऊन भिडला. त्या गलग्यांत 'पकडो पकडो' असे शब्द होते. ते शब्द कानीं पडतांच आपल्यावर कांहीं तरी संकट आहे हें त्या तरुण वीरांस ताबडतोब वाटलें आणि त्यांच्या बाहूंत स्फुरण चढून त्यांचे हात एकदम आपल्या तलवारींकडे गेले. हत्यारांस हात घालण्याची जितकी घाई बाहेर पुरुष मंडळीस झाली, तितकीच घाई कनातीच्या आड असलेल्या स्त्रीमंडळींतही झाली.

आमच्या या प्रवासी मंडळींनीं जेमतेम हत्यारें हातांत घेतलीं असतील नसतील, तोंच गलगा करणाऱ्या सुमारें पंचवीस लुटारू पठाण घोडेस्वारांचा गराडा त्यांचेभोंवतीं पडला. त्यांनीं आमच्या प्रवासी मंडळींशीं 'तुमच्यां-जवळ काय असेल नसेल तें सगळें आमच्या स्वाधीन करा' अशी मागणी केली. भर ज्वानीचें उष्ण रक्त अंगांत खेळत असलें म्हणजे विचारांची थंडी पार दूर पळून जाते हेंच खरें. आमच्यासारख्या लढवय्यांवर एकाएकीं हल्ला

करून आमचें द्रव्य मागण्याचें धाडस करणाऱ्यांना त्यांच्या धाडसीपणाचें प्रायश्चित्त दिलेंच पाहिजे, असें आमच्या तरुण वीरांनीं आपल्या बलाबलाचा बिलकुल विचार न करतां ठरविलें आणि तत्काळ पुढें सरसावले. पठाणांकडून अद्वातद्वा भाषण चाललें होतें, परंतु दोघेही वीर केवळ आपलें स्वतःचें व आपल्या जनान्यांचें रक्षण करीत होते. सुमारें तासभर त्यांनीं टिकाव धरला. परंतु तितक्या अवधींत त्यांची बरीच मंडळी पडली. इतक्यांत तोंडांत लगाम दिलेला एक घोडा उधळून त्या कनातीच्या आड गेला. तेथें तो जातो तों तेथील स्त्री जणूं काय ही व्यवस्था परमेश्वरानेंच केली असें समजून त्याच्या पाठीवर अर्धवट ठेवलेलें खोगीर धरून त्याच्यावर आरूढ झाली. घोड्यावर स्वारी करण्याबरोबर घोड्यास तिनें बाहेर काढलेंच आणि आपण एकदम शत्रूंवर मारा करण्यास सुरवात करावयाची अशा विचारानें तिनें आपला भाला सरसावला. ही स्त्री त्याच्या अंगावर चाल करणार तोंच घोड्यानें डोक्यांत काय घेतलें न कळे, पण तो बेफाम होऊन त्या पठाणांचा गराडा फोडून तेथून वाट फुटेल तिकडे पळत सुटला. लागलीच त्या पठाणांपैकीं एकास कांहीं मूर्खपणाची इच्छा होऊन तो त्या स्त्रीच्या मागें लागला. बाकी लोक इकडे लढतच राहिले.

जाधवराव आणि निरोजीराव या दोघांनीं लढण्याची शिकस्त केली, परंतु व्यर्थ. एकट्या निरोजीच्या अंगावर चौघे पठाण चालून गेले आणि थोड्याच वेळांत त्यांनीं त्यास जमिनीवर पाडले. एकाच्या तरवारीचा वार त्याच्या मर्मींच लागला आणि त्याचा प्राण कुडी सोडून गेला. त्याबरोबर जाधवरावाखेरिज सर्वांचा दम उडाला. तो अगदीं जिवावर उदार होऊन त्यांचे हल्ले चुकवीत एकेक पाऊल त्या कनातीकडे टाकीत होता. आतां तो अगदीं कनातीच्याजवळ गेला आणि झाडाच्या मागल्या बाजूनें आंत शिरणार, तों त्याच्या खांद्यावर एका पठाणाचा वार बसलाच. परंतु त्यानें दाद दिली नाहीं; तो तसाच आंत शिरला, इतक्यांत सुदैवानें मराठ्यांची बरीच मंडळी कर्नाटकांत जाण्यासाठीं निघालेली त्या राईत उतरण्यासाठीं आली.

त्यांच्या आकस्मिक येण्यानें पठाणांची तारांबळ उडाली व त्यांनीं यःपलाय केलें व त्यामुळें जाधवरावाचा जीव वांचला व जनान्याची अब्रूही वांचली. निरोजी पडला हें त्याच्या पत्नीस जेव्हां पक्केपणें कळलें, तेव्हां तिचा शोक अगदीं अनावर झाला आणि तिनें त्याच्या शवाबरोबर सहगमन केलें. आलेल्या मंडळींनीं जखमी झालेल्या जाधवरावांस औषधोपचार केले, परंतु तो शुद्धीवर न आल्यामुळें ते त्यास आपल्याबरोबर घेऊन पुढें वाट चालूं लागले.

---

## वीरपत्नी : : ४

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जाधवरावांची पत्नी घोडा उधळून त्या पठाणांची फळी फोडून कोणीकडच्या कोणीकडे नाहींशी झाली. तिनें तो घोडा आवरून धरावा म्हणून आपलेकडून पराकाष्ठा केली. परंतु कांहीं केल्या घोडा थांबेना. आतां मध्यंतरीं कांहीं तरी मोठा थोरला अडथळा आल्याखेरीज हा थांबत नाहीं, आणि आपले प्राण आपल्यास वांचवितां येत नाहींत असें तिच्या मनानें घेतलें. इतकें सगळें झालें, तरी तिनें आपली मांड यत्किंचितसुद्धां ढळूं दिली नाहीं. तिला जी विशेष काळजी होती ती म्हणजे आपली मंडळी तिकडे राहिली त्यांचें काय झालें हीं होय.

इतक्यांत समोरून एक घोड्यावर बसलेला मराठा शिपाई चालला होता. त्याची दृष्टि या भयभीत झालेल्या स्त्रीकडे गेली. घोडा अनावर झाल्याकारणानें हिची अशी स्थिति झाली हें त्यानें पक्कें जाणलें; व क्षणाचाहि अधिक विचार न करितां त्यानें आपला घोडा आडवा घालून त्या घोड्यास अडविलें. त्या स्त्रीनें घोड्यावरून खालीं उडी टाकली, परंतु परक्या पुरुषाबरोबर काय बोलावें हें न सुचल्यानें ती थोडा वेळ स्वस्थ उभी राहिली. शेवटीं तो मराठा शिपाई तिला म्हणाला, "घोडा जिकडून उधळून आला तिकडे परत नेऊन पोंचविण्यास मी सिद्ध आहे. मला जागा सांगितली तर नेमका

नेऊन पोंचवीन." क्षणमात्र ती स्त्री त्यास कांहींएक बोलली नाहीं. त्याला काय उत्तर द्यावें तें तिला समजेना ! पण तिनें जरा दम धरून त्यास सर्व वृत्तांत थोडक्यांत सांगितला.

त्या स्त्रीचें भाषण पुरें होतें न होतें तोंच पठाणी भाषेंत मोठ्यानें उच्चारलेले कांहीं शब्द तिच्या व त्या पुरुषाच्या कानीं पडले. ते ऐकतांच ते ज्या बाजूनें आले तिकडे दोघांनींही वळून पाहिलें; तों एक पठाण घोडा दवडत आपल्याजवळच आला असें त्यांच्या नजरेस पडलें. आणि तोही लागलीच खालीं उतरून त्या स्त्रीशीं लगट करण्याच्या उद्देशानें जवळ जाऊन तिला उर्दू भाषेंत म्हणाला, "आय बिजली ! तूं हां हां म्हणतां किती दूर आलीस. तुला इकडे निघून येतांना पाहण्याबरोबर मी आपल्या मंडळीला सोडून तुझ्या पाठोपाठ आलों. तूं मला टाकून इतक्या झपाट्यानें कां आलीस ? हा तुला कोण भेटला ?"

हे त्याचे लघळपणाचे व बेशरमपणाचे शब्द ऐकून तो मराठा शिपाई त्या पठाणास एकदम दूर लोटून म्हणाला, "दुष्टा, आपल्यो बायकांची इज्जत घेऊं पाहणारांस लंबे करण्याची ताकद मराठ्यांच्या अंगांतून नाहींशी झाली काय ? आतां तूं आपल्या अल्लाचें नांव घेऊन आपला जीव बचावण्याला तयार हो" असें म्हणून त्यानें एकदम आपली तरवार उपसली आणि त्याच्या अंगावर वार करण्यास तो मागें झाला. परंतु तो पठाण बेसावध नव्हता. त्यानें आपली तरवार तेव्हांच बाहेर काढली व हंसत हंसत त्यास म्हणाला, "तुमच्या तोंडाच्या वल्गना आजपर्यंत आम्हीं किती ऐकल्या ! हातून एकही गोष्ट होत नाहीं, परंतु कोण बकवा करतां ! आमच्या लोकांनीं या बिजलीच्या नवऱ्याला आणि दुसऱ्या मंडळीला केव्हांच ठार करून त्यांची सगळी चीजवस्त लुटून आपल्या मकाणावर नेली देखील; ही एक उत्तम चीज इकडे आली म्हणून मी तिच्या मागोमाग येथें आलों." असें बोलून त्या मराठा शिपायाशीं तो नेटानें लढूं लागला. किती वेळ झाला तरी कोणी हार घेईना. बारीक जखमा प्रत्येकास पांच चार तरी झाल्या,

परंतु दोघेहि अशा जखमांस मुळींच जुमानणारे नव्हते. इकडे ती स्त्री त्या दोघांची चकमक पाहात उभी राहिली होती. परंतु तिचें चित्त त्या पठाणानें आपल्या मंडळींस ठार मारल्यासंबंधानें उच्चारलेल्या वाक्यानें अगदीं खिन्न होऊन गेलें होतें. पण त्या चकमकींत पठाणाची सरशी होऊन तो त्या मराठा शिपायास आपल्या तीक्ष्ण हत्यारानें वार करणार हें पाहून त्या शूर स्त्रीनें आपला भाला पुढें करून खूप जोरानें त्या पठाणाच्या पाठींत खुपसला; पठाणास जागेवरून उठवेना, तरी त्याचें तोंड मात्र सुरूं होतें. मरतां मरतां तो आपल्या नैसर्गिक दुष्टपणानें खोटेंच असें म्हणाला, "माझ्या सोबत्यांनीं तुझ्या सर्व मंडळींचा फडशा उडविला असून आतां ते लवकरच याही बाजूला येणार आहेत."

'तुझ्या मंडळींचा फडशा उडवून—" हे शब्द ऐकल्याबरोबर त्या बिचाऱ्या स्त्रीच्या अंगावर अगदीं शहारे उभे राहिले; व तिची मोठ्यानें हंबरडा फोडण्यापर्यंत स्थिति आली! पण प्रसंग जाणून तिनें फार मोठें आत्मसंयमन केलें, व त्या जखमांनीं घायाळ झालेल्या शिपायास घेऊन ती कशीबशी तेथून निघाली आणि सुमारें कोसा दीड कोसावर असलेल्या एका गांवीं जेमतेम पोंचली. नखशिखांत रक्तबंबाळ झालेल्या घोडेस्वाराला व बरोबर असलेल्या स्त्रीला पाहतांच, गांवांतील लोकांना फार आश्चर्य वाटलें. त्यांची हृदयद्रावक हकीकत ऐकून त्यांच्यापैकीं एकानें त्या स्त्रीस म्हटलें, "बाई, तुम्ही आतां येथें बसून काय करणार? तुम्ही माझ्या घरीं जा. तेथें माझी मंडळी आहेत, त्यांच्यांत जाऊन बसा. बायको माणूस येथें उपयोगी नाहीं; यालाहि आम्ही उचलून आतां गढींत नेऊन ठेवतों. तुम्ही याची अगदीं काळजी करूं नका. त्याची आम्ही काळजी घेतों."

तिनें विशेष आढेवेढे न घेतां त्या गृहस्थाच्या घरीं जाण्याचें कबूल केलें. घरीं गेल्यानंतर तिला कळलें कीं, हे गृहस्थ देशमूख होत आणि तो गांव देशमुखी गांव होता. त्या घरांत जाण्याबरोबर तेथील स्त्रियांनीं तिचें आदरातिथ्य केलें. तिला प्रथम थोडेसें कांहीं खाण्याविषयीं आग्रह केला. परक्या

ठिकाणीं संकटांत सांपडलेल्या स्त्रीला ज्या प्रेमाच्या प्रकारानें वागवावयाचें त्या प्रकारानें तिला वागविलें गेलें. थोड्या वेळानें त्यांनीं तिला अगदीं एकीकडच्या खोलींत आंथरूणही घालून दिलें. ती त्यावर पडली. परंतु तिला झोंप कुठली यायला ? थोडा डोळा लागतो न लागतो तोंच तिनें दचकून उठावें, इकडे तिकडे पहावें, पुन्हां पडावें, मध्येंच 'पठाण पठाण' असें तरी ओरडावें. इतक्यांत खरोखरीच 'पठाण पठाण' असा मोठा आरडा साऱ्या गांवभर झाला. तो ऐकून हिची स्थिति फारच विलक्षण झाली. आपण आहोंत कोठें. करतों आहोंत काय, हें कांहीं तिच्या लक्षांत किती वेळ तरी येईना. शेवटीं 'पठाण, पठाण' असा जो आरडा झाला त्यानें ती शुद्धीवर आली आणि मग तिला हेंही आठवलें कीं, आपण एका गांवीं तेथील देशमुखांच्या घरीं येऊन राहिलों आहों. आपली दैन्यवाणी स्थिति पाहून त्यांनीं आपल्याला आश्रय दिला आहे. त्या गांवीं पठाणांची धाड येणार असें आगाऊ कळल्यामुळें गांवचे सगळे लोक शस्त्रास्त्रें घेऊन बसले आहेत हेंही पण तिला आठवलें. त्याबरोबर राईतील आपल्या मंडळींची स्थिति काय झाली असेल, त्या दुष्ट पठाणांनीं त्यांचा फडशा उडविला नसेल ना, असा विचार येऊन तिचें चित्त अगदीं विव्हल झालें. पण तिकडची खरी बातमी आपणांस कशी कळणार, कोण आणून देणार ? येथील गांवकरी मंडळी तर आपल्या संकटामुळें हवालदील झालेली. दुसरा कांहींसुद्धां उपाय नाहीं. तेव्हां आपण स्वतः राईत गेलं पाहिजे असा मनाचा निश्चय करून ती आंथरुणावरून उठूं लागली. पण शरीर फार अशक्त झाल्यानें तिला घेऱ्या येऊं लागल्या व ती मटकन् खालीं पडली. दोनतीनदां प्रयत्न करून पाहिला पण व्यर्थ. शेवटीं निराश होऊन आपल्या आंथरुणावरच तिला स्वस्थ पडून राहावें लागलें, पण मनाची अस्वस्थता थोडीच कमी होणार ? नाना प्रकारच्या विचारांनीं तिच्या मनांत मोठें काहूर उसळलें.

इकडे गांवच्या शिवेवर येतांच, जेव्हां सगळा गांव सज्ज होऊन आपल्या अंगावर तुटून पडण्याची वाट पाहात आहे असें पठाणांनीं पाहिलें.

तेव्हां ते दूरच कांहीं अंतरावर थांबले. नंतर त्यांच्या मुख्यानें आतां हा गांव लुटण्यास जाण्यांत अर्थ नाहीं, आपलेही लोक कमी झाले आहेत तर आपण माघार घ्यावी असें सुचविलें. परंतु त्या लोकांत सगळे सारख्या विचाराचे नव्हते. आपल्यापैकीं ज्याला कोण्या स्त्रीनें मारलें ती व तो घोडेस्वार या गांवांत आश्रयाला गेलीं असावींत, तीं मागून घ्यावींत, कांहीं खंडणीही मागावी आणि मग जावें, असें रस्त्यावर जखमी होऊन पडलेल्या पठाणाच्या स्नेह्यानें सुचविलें. तें इतरांसही मानवलें आणि त्याप्रमाणें एका पठाणास गांवकऱ्यांकडे पाठविलें. पठाणांच्यातर्फे आलेल्या मनुष्यास गांवच्या देशमुखांनीं सडेतोड जबाब दिला कीं, “आम्हीं कोणीं माणसें तुमच्या स्वाधीन करीत नाहीं, एक दमडीसुद्धां तुम्हांला देत नाहीं. तुम्हांला आपला जीव बचवावयाचा असला तर मुकाटयानें आल्या वाटेनें परत जा; नाहींतर तुमची धडगत लागणार नाहीं. आमची मंडळी तुमचा नायनाट केल्याखेरीज रहाणार नाहींत.”

झालें. तो पठाण संतापानें त्यांना शिव्या देत व सूडाची भाषा बोलत परत आपल्या मंडळीकडे गेला. पठाणांनीं गांवकऱ्यांस जबर धाक घातला. “संभाळा, आमचें म्हणणें मान्य न कराल तर तुमचा सगळा गांव उध्वस्त करूं व सर्वांचा सत्यानाश करून लूट घेऊन जाऊं.” परंतु या धमकीस गांवकऱ्यांनीं मुळींच दाद दिली नाहीं, उलट त्यांना अतिशय चेव आला, व ‘हरहर महादेव’ असा वीरश्रीचा शब्द करून त्यांनीं पठाणांवर निकराचा हल्ला केला व त्यांचा धुव्वा उडविला. आपण आज पठाणांची खोडकी जिरवून त्यांना जमीनदोस्त करणार व कित्येक गांवांना त्यांच्या कचाटींतून कायमचें सोडविणार अशा विचारानें त्या लोकांचीं अंतःकरणें आनंदानें भरलीं व त्यांना अधिकच स्फुरण चढलें; पण तो आनंद फार वेळ टिकला नाहीं. थोडयाच वेळांत पठाणांची एक नवीन तुकडी-ताज्या दमाची व सशस्त्र-त्या ठिकाणीं आली. त्यामुळें सारेंच पारडें फिरलें. मराठयांचें व पठाणांचें भयंकर रणकंदन माजलें. मराठ्यांनीं लढण्याची शिकस्त केली,

पण त्यांचा पाडाव झाला, मनस्वी घातपात झाला. जे थोडे कोणी जगले ते सैरावैरा धांवूं लागले.

मागें सांगितल्याप्रमाणें जाधवरावांची पत्नी देशमुखांच्या घरीं अंथरुणावर हताश होऊन पडली असतां आपल्याला स्वाधीन करण्याकरितां पठाण लोक आग्रह करीत आहेत ही बातमी तिला समजली. त्याबरोबर तिचें अंतःकरणांत चर्र झालें. अशा स्थितींत 'आतां गांवकरी काय बरें करतील? आपणांस सोडून देतील काय? पठाणांच्या स्वाधीन आपणांस करतील काय?' असे प्रश्न तिच्या मनांत अनेकवार उत्पन्न होऊन तिचें अंतःकरण अगदीं भयभीत झालें. आपल्यापासून या लोकांस विनाकारण त्रास झाला, या त्रासाच्या भरांत यांच्या मनांत काय येईल आणि काय नाहीं? परंतु 'आपण जातों' म्हणून म्हणावें कसें? आपल्यास कोण जाऊं देईल? 'हा विचार मनांत येऊन तर ती फारच घाबरली; आणि तिला वाटलें, कीं आपण कांहीं तरी युक्तिप्रयुक्ति करून इतरांना न कळत येथून निसटावें हाच उत्तम मार्ग. म्हणून ती इकडे तिकडे पाहूं लागली. बराच वेळ तिनें धडपड केली. शेवटीं कर्मधर्मसंयोगानें तिला एक दार दिसलें, तें तिनें महत्प्रयासानें उघडलें देखील. परंतु पलीकडे कांहीं दिसेना. पलीकडे रस्ता आहे कीं खोल खड्डा आहे याचा कांहींच उमज पडेना. पठाणांच्या हातीं सांपडून आपल्या कुळाची व आपली अब्रू जाण्यापेक्षां किंवा आपल्यामुळें एखाद्या गांवावर भयंकर प्रसंग गुदरण्यापेक्षां आपलें कांहींहि होवो, आपण येथून निसटून जायचेंच असा निर्धार करून जाधवरावांच्या वीरपत्नीनें पुढें पाऊल घातलें. तों पायाला लवकरच जमीन लागली. त्या ठिकाणीं बारीक धूळ पसरून ठेविल्याप्रमाणें तिला वाटूं लागली. न भितां न डगमगतां ती साहसी स्त्री हळूंहळूं तशीच पुढें चालली. आपल्या माहेरच्या व सासरच्या वाड्यांतील भुयारांची तिला माहिती असल्यानें आपण भुयारांतून चाललों आहों, हें तिला लवकरच कळून आलें. तेव्हां तिला एक प्रकारें आनंदच झाला. भुयारांतून निर्वेध स्थळीं बाहेर पडल्यावर कदाचित् आपल्या पतीचा

शोध लागून त्याची भेट होईल अशी तिला आशा वाटूं लागली. त्या आशेच्या जोरावर वाटेंतील संकटांस न जुमानतां ती आपला पुढील मार्ग आक्रमूं लागली.

---

## वकिलाशीं सल्लामसलत : : ५

विजापुराहून निघाल्यापासून वाटेंत ठिकठिकाणीं अफ्झुलखानानें नुसता धुमाकूळ मांडला. त्याला म्हणण्यासारखा कोठेंच विरोध झाला नाहीं. लोकांनीं शौर्याच्या वृथाभिमानाला बळी न पडतां शहाणपणानें थोडें पडतें घेऊन आपला कसाबसा बचाव केला. परंतु अफ्झल्खानाचा मुख्य हेतु दुसराच होता. त्याच्या मनांत पुण्याकडे येऊन निराळीच शिकार साधावयाची होती, परंतु ती मुळींच साधली नाहीं. त्याचा मोठा हेतु असा होता कीं, आपल्या प्रचंड सेनेशीं शिवाजीच्या सैन्याचा सामना व्हावा, म्हणजे शिवाजीला पकडण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं. परंतु शिवाजीमहाराज कच्चे नव्हते. त्यांचे मस्तकीं भवानीचा पूर्ण वरदहस्त. आपण उघड्यावर सामना केला तर आपणांस जय येईल अशी खात्री नाहीं, तेव्हां आपण कोठेंतरी जंगी किल्ल्यावर जाऊन रहावें असा आपल्या मातुःश्री जिजाबाई व इतर कारभारी मंडळींशीं मनसुबा करून स्वारीनें पुण्याजवळील राजगडावरून तळ हलविला व महाबळेश्वरानजीक प्रतापगडाचा आश्रय केला. तें वर्तमान अफ्झल्खानास वाटेंत कळल्याबरोबर त्याला अतोनात वाईट वाटलें, मरणप्राय दुःख झालें, हातची शिकार गेली असें वाटलें. मग त्यानें प्रतापगडाकडे आपला मोर्चा फिरविला. मनांतला आशय हा कीं, आपण प्रतापगडावरहि हल्ला करून शिवाजीस पकडूं व प्रतिज्ञेप्रमाणें हजरतींपुढें गिरफदार म्हणून नेऊन त्यास उभा करूं. आपल्या सैन्यापुढें त्याचा काय टिकाव लागणार आहे? असा विचार करून त्यानें वाई खोऱ्याकडे आपलें सैन्य चालविलें. परंतु महाराष्ट्रांतलीं तीं प्रचंड खोरीं पाहून व त्यांच्या आणि त्यांतील किल्ल्यांच्या अवघडपणाबद्दलच्या गोष्टी आपल्या सरदारांच्या

तोंडून ऐकून त्याचा उत्साह मावळला व त्याची उमेद खचली. शिवाय त्याच्या हेरांनीं अशा बातम्या आणल्या कीं, किल्ला फार भयंकर, सर करून घेणें केवळ अशक्य. वेढा देऊन वरच्या लोकांची उपासमार करून तो घेऊं म्हटलें तरी दहा वर्षे दाद लागणार नाहीं. शिवाय चोरवाटा इतक्या आहेत कीं शत्रू केव्हां पळून गेला तरी मुळींच कांहीं समजणार नाहीं. रिकामा किल्ला लढविण्यांत आपल्या सैन्याला मात्र शीण. तेव्हां खानसाहेबांची पुष्कळच नाउमेद झाली, व त्यांना प्रतापगडावरील मोहिमेचा बेत रद्द करावा लागला. प्रतिज्ञा तर अशी केली होती, कीं त्या डोंगरी उंदरास जिवंत किंवा मारलेला असा विजापुरास घेऊन जाऊं. परंतु त्याला पकडण्याच्या साधनांपैकीं एकहि अजून अनुकूल नाहीं. असे एकंदर विचार डोक्यांत चालले असतां सरतेशेवटीं तो आपल्याशींच म्हणाला : "डोंगरी उंदराला आपण तलवारीनें मारण्याचा घाट घालीत होतों ही आपलीच चूक. उंदराला सांपळाच पाहिजे. त्या सांपळ्यांत त्याला अडकवून धरला म्हणजे जिवें मारणें कोणासहि सोपें होईल, आणि असा उंदीर जिवंत धरण्यांत जितकी बहार आहे तितकी बहार त्यास मारण्यांत आहे असें कोण म्हणेल!" असा मनांत दीर्घ विचार करून प्रतापगडावर हल्ला करण्याचा बेत तर राजेश्रींनीं सोडून दिलाच. आतां कपटाचें जाळें पसरून काय कार्यभाग होईल तो करावा अशा विचाराला स्वारी लागली.

एके दिवशीं दुपारीं वर सांगितलेल्या विचारांत असतांना त्यास त्याच्या हुजऱ्यानें वर्दी दिली कीं, 'प्रतापगडाहून कोणी एक ब्राह्मण शिवाजीचें पत्र घेऊन आला आहे आणि त्यास कांहीं बोलावयाचेंहि आहे.' खानानें त्या गृहस्थाला आंत आणण्याची परवानगी दिली.

तो ब्राह्मण अगदीं नम्रतेनें आंत आला व त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें त्यानें कुर्निसात वगैरे करून खानाच्या हुजऱ्याचे हातीं थैली दिली. खानानें आपले चिटणीस यांस ती वाचण्यास सांगितली. पत्र त्या काळाचे रिवाजाप्रमाणें फारसी भाषेंत लिहिलेलें होतें. त्यांत पुढील अर्थाचा मजकूर होता:

"हजरतीनीं मला गरिबाला पकडून नेण्यासाठीं खाविंदांस पाठविलें आहे असें ऐकतों आणखी तशी प्रतिज्ञा भोगून खाविंद आले आहेत असेंहि समजतें. जाणोन आश्चर्य वाटलें. बंदा तर हजरतींच्या मुलुखाची व्यवस्था नीट रहावी एवढ्यासाठींच केवळ खटपट करतो आहे. पाळेगारी, पुंडावे मोडून मुलूख बेदिक्कत केला तो स्वतःसाठीं नव्हे, तर हजरतीसाठींच. असें असून हजरतींच्या मनांत दुष्मानी उत्पन्न व्हावी हें मोठें दिलगिरीचें काम झालें. परंतु दुसरा कोणी न येतां खाविंद इकडे आले, त्यामुळें थोडी आशा उत्पन्न झाली कीं, खरा प्रकार समजला असतां कांहीं दगा होणार नाहीं. उलट खाविंद हजरतीजवळ शिफारस करून संशय दूर करतील. आपली बेदिली दूर होईल. जाणोन पत्र लिहिलें; तरी जो काय खरा मजकूर आहे हा समजण्याकरितां कृष्णाजी भास्कर इकडले जाणते व विश्वासू पुरुष पाठविले आहेत. त्यांजपासून सर्व मजकूर विदित करून घेऊन पुढें जसा विचार होईल तसा हुकूम होणें; मुलूख सोडून जावें म्हणून हुकूम झाला तरी मानणें जरूर. परंतु पुंडावे मोडून हजरतींची कामगिरी केली ती ध्यानीं आणावी. एवढाच मोका आहे."

तें पत्र वाचून संपल्याबरोबर अफ़झलखान मोठ्यानें हंसला व म्हणाला, "आतां हजरतींचा बंदा गुलाम वगैरे गोष्टी सांगण्यास वकील पाठवून देतो, परंतु विजापुराहून निरोप आणि हजार हुकूम पाठविले, नानाप्रकारचे धाक घातले, शाहिस्तेखानासारख्या सरदारास पाठविलें, तरी यानें दाद दिली नाहीं. मला वाटलेंच कीं, मी इकडे आलों, हें समजतांक्षणींच हा नांगी टाकणार. पण आतां रुमालानें हात बांधून माझ्यापुढें येऊन उभा राहिल्याखेरीज मी त्याची कोणचीहि गोष्ट पक्की समजणार नाहीं. लाखों लोक आजपर्यंत बोलत आले कीं शिवाजी मोठा लबाड आहे. पण मी त्याच्याहून सातसवाई आहें. असे निरोप कितीहि पाठविले तरी मी फसणार नाहीं. चिटणीस, या पत्राचा कांहीं जबाब पाठवावयाचा नाहीं. पत्रांतील मजकूर खरा किंवा खोटा हें समजण्याकरितां दुसरी कांहीं तजवीज आम्ही

करणार आहों. तोंपर्यंत या वकिलाला राहाण्याची वगैरे व्यवस्था लावून द्यावी." इतकें सांगून त्यानें वकिलास बाहेर पाठवून दिलें.

नंतर आपण एकटाच बराच वेळ विचार करीत राहिला. शिवाजीनें हें पत्र पाठविलें त्यांत लबाडी तर असलीच पाहिजे. सरळपणाचा कारभार नव्हे; परंतु शिवाजी घाबरला आहे खास, त्यास आपल्यास तोंड देणें शक्य नाहीं. तेव्हां कांहीं तरी युक्ति करून सुटूं पहातो आहे. तरी आपणांकडील हुशार वकील पंताजीपंत गोपीनाथ यांस या कृष्णाजीपंताची भेट घेऊन खरा मोका काय आहे तो काढविला पाहिजे. बहाण्यानेंच सध्यां त्यास ठेवून घेण्याचा विचार केला हें ठीक. असा विचार करून पंताजी गोपीनाथ यांस खानानें बोलावून आणिलें.

पंताजी गोपीनाथ यांजवर अफ़झलखानाचा फार विश्वास होता. कोणचीहि गोष्ट त्यास विचारून त्याचे सल्ल्यानें करावयाची असा त्याचा नेहमींचा प्रघात असे आणि तो त्या विश्वासास पात्रहि होता. पंत येतांच खान त्यांस म्हणाला: "पंत ! आपल्याला जसें वाटत होतें तसेंच बरोबर झालें. आपला शत्रु आपणास शरण आला आहे. त्याचेकडून पत्र घेऊन वकील आला आहे. तें पत्र वाचून पहावें. परंतु इतक्यांतच विश्वास धरून मात्र उपयोगी नाहीं. बाहेर एक, आंत एक असेंहि असण्याचा संभव आहे. त्याच्या वकिलास ठेवून घेतलें आहे. कांहीं तरी निमित्त काढून त्यास बरेच दिवस ठेवून घेऊं. तुम्ही त्याच्याशीं सख्य करा, आणि खरा प्रकार काय आहे तो काढून घ्या."

खानाचें सगळें भाषण ऐकून पंताजी गोपीनाथ म्हणाले, "खरी गोष्ट आपण म्हणतां तशीच असली पाहिजे. शिवाजी फार धूर्त आहे. आपले हातून जी गोष्ट होणार नाहीं ती भलत्याच वेळीं करूं जाण्याचा धाडसपणा करणारा तो नव्हे. आपण सांगतां तें करण्याचें मजकडे लागलें. परंतु आलेल्या पत्रांतील मजकुरांत पूर्ण खरेपणा असल्यास त्याचे म्हणण्यास मान

द्यावा. नसल्यास आपण ज्या हेतूनें आलों आहों, त्या हेतूप्रमाणें सर्व कांहीं करणें आपल्या हातीं आहेच."

इतकें बोलून पंताजी गोपीनाथ तेथून निघून गेले. विजापुरच्या पातशाहीशीं तंटाबखेडा करण्यापासून फायदा होणार नाहीं, गोडीगुलाबीनें घेतल्यास विजापुरकर शिवाजीस इकडील सर्व मुलूख जहागीर म्हणून सोडून देतील; अशा प्रकारचा सल्ला शिवाजीमहाराजांस द्यावा हें आज कित्येक दिवस त्याच्या मनांत घोळत होतें. आजची ही संधि बरी आली आहे, असें वाटून त्यांस आनंद झाला. शहाजीमहाराजांचे ठिकाणीं त्याचा फार आदर, आणि त्यांचे चिरंजीवास कांहीं धक्का पोंचूं नये अशी मनापासून इच्छा. ती आज पूर्ण करण्यास आपणांस संधि मिळते आहे, हें पाहून त्यास आनंद होणें अगदीं साहजिकच होतें. अफझलखानाची रजा घेऊन ते ज्या ठिकाणीं कृष्णाजीपंतास उतरण्यास जागा दिली होती त्या ठिकाणीं गेले. परस्परांचीं प्रहर दीडप्रहरपर्यंत भाषणें झालीं. सायंकाळीं नित्याप्रमाणें पंताजी गोपीनाथांस अफझलखानानें बोलावून नेलें आणि एकंदर मनसुबा कसा काय आहे त्याची चौकशी केली.

पंताजी गोपीनाथ यांनीं जें सांगितलें तें मौजेचें होतें. ते म्हणाले:— "खानसाहेब, आपण एका अर्थी हेलपाटा घेतला हें ठीक झालें. कारण आपल्या ह्या कामांत फारच विलक्षण तऱ्हेचें यश येणार आहे. शिवाजी विजापुराशीं मुळींच वैर करूं इच्छित नाहीं. इकडे पुंडावा माजला होता, तो मोडून आपण स्वस्थता करणार एवढेंच त्याचें म्हणणें आहे. कदाचित् आपण आतां आलों म्हणून त्याचा हा कावा असेल, पण आतां या वेळीं तरी तो अगदीं नम्रता धरून आहे. विजापूरची शक्ति किती आहे हें त्याला स्पष्ट दिसतें आहे. आपण आज किती सैन्य घेऊन आलां आहां हेंहि त्याच्या दृष्टीसमोर आहे. अशा स्थितींत दांडगाई करून चालणार कसें ? अर्थातच तो अगदीं गरिबी दाखवून आपला आज्ञांकित होऊं इच्छितो आहे. अशा वेळीं आपण मोठेपणा दाखवून त्यास वश करून घ्यावें म्हणजे ठीक होणार

आहे. एक प्रबळ होणारा शत्रु नाहींसा केल्यासारखे होईल. अलमगीर बादशहा विजापूरची पातशाही बुडवूं पहातो आहे. आपण हाहि एक शत्रु म्हणून राहूं दिला, तर फार त्रास होईल. शिवाजी आपल्या आज्ञेत राहिला नाहीं, तर तो अलमगिराचा आश्रय करील, आणखी तसा आश्रय त्यानें केला म्हणजे काय प्रसंग ओढवेल याचा नेम नाहीं. विजापुरच्या पातशाहीला एकदम दोन शत्रु उभे राहतील; तरी या वेळीं आपण मोठेपणा दाखवून त्याला आपलासा करावा हाच मुत्सद्दीपणाचा मार्ग आहे. खानसाहेब याचा योग्य तो विचार करतीलच."

अफ्झल्खान या बोलण्यानें खूष झाला; त्याला अस्मान आतां ठेंगणें झालें. त्याला वाटलें कीं आपल्या सामर्थ्याच्या गोष्टी दुरूनच ऐकून शिवाजी इतका घाबरला. तेव्हां आतां तो लबाडी काय करणार? तथापि त्याला एकदम 'होय' म्हणून सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा विचार करून त्यानें पंताजी गोपीनाथ यांस म्हटलें, "पंत, तुम्हांला मी फार मोठे मुत्सद्दी म्हणतों. पण केव्हां केव्हां तुमचें चुकतें. अहो, शिवाजी लुच्चा आहे. त्यानें आपल्या वकिलाच्या भाषणानें तुम्हांला भारलें यांत मला शंका वाटत नाहीं. तो आपल्याला अशा थापा मारील, पण आपली पाठ वळलीं नाहीं तों पुनः आपला मुलुखगिरीचा क्रम सुरू करील. त्यानें आपल्या शहाजी-राजालासुद्धां दाद दिली नाहीं, त्यांची सुद्धां बेधडक अवज्ञा केली, तो काय तुम्हां आम्हांला फसवायला कमी करील? तुम्ही म्हणतां तशी अलमगीर पातशाहाची भीति आहे खरी; परंतु मला नाहीं वाटत कीं, अलमगीर याला आपल्या बाजूला घेण्याच्या भानगडींत पडेल. तो अजून आपल्या संकटांत आहे. त्याला आपलें तख्त पक्कें झालें असें वाटायला अजून थोडा तरी अवकाश आहे. तेव्हां तो इतक्यांतच विजापुराकडे मन घालील असें मला वाटत नाहीं."

"पण खानसाहेब, शिवाजीला तशीं अलमगिराचीं पत्रं आलीं आहेत. आपण औरंगझेबाचा खरा कावा ओळखला नाहीं असं वाटतं. तेव्हां माझी

तर सल्ला अशी पडते कीं, शिवाजीराजा जर गरिबी दाखवतो आहे तर ती खोटी असली तरी आपण खरी धरून चालावें. आज आपल्यांत ताकद नाहीं तर आपण सलोख्यानें वागून तिकडील सुभेदारी हजरतीपासून मिळवावी अशी त्याची इच्छा खचित. करितां आतांच त्याच्या इच्छेप्रमाणें एकदां त्याला बांधून घ्या. मग आपल्याला त्याला सुभेदार नेमावयाचा असला तर नेमा, किंवा हजरतीस भेटण्यास म्हणून नेऊन तिथेंच कांहीं तरी कामगिरी द्या. पण आतांच 'आम्ही तुला कैद करणार, पकडून नेणार' असें म्हणूं नका. याच्यापलीकडे दुसरी कांहीं सल्ला माझी नाहीं. राजांनीं आपले वकील पाठविले आहेत, ते हेंच बोलण्यासाठीं पाठविले आहेत; दुसरें कांहीं नाहीं. आपण अव्हेर केला तर सर्व कांहीं बिघडेल. याउपर आपल्या निदर्शनाला जसें येईल तसें खरें. आपल्या दराऱ्यानें शिवाजीराजा भ्याला आहे एवढी गोष्ट खास."

" पंत, आपला विचार नेहमींच पोक्त असतो, त्याच्याबद्दल मला शंका नाहीं. आपल्यावर माझा विश्वास किती आहे हेंहि आपल्याला पक्कें ठाऊक आहे. जें आपण सांगाल तें मला मान्य आहे, पण आपण एकदम त्याच्या म्हणण्याला होकार देऊं नये. तो इतका काकुळतीला येत असला तर आपण त्याला गय करूं; पण एवढें सांगितलेंच पाहिजे कीं, येथल्या येथें आमचीं जीं कांहीं बोलणीं होतील तेवढ्यावरच संपावयाचें नाहीं. हजरतीला मुजरा करण्याला त्यानें आमच्याबरोबर विजापुरला आलेंच पाहिजे. हें त्याच्या वकिलाला कबूल असेल, तर पुढें दुसऱ्या गोष्टी बोलावयाच्या. बाकी माझा खरा विचार म्हणाल तर असा आहे कीं, याला नाहींसाच करावा. हा आपल्याला गरिबी दाखवील, आणखी कोण्या वेळीं काय करील याचा बिलकूल नेम नाहीं. आपणहि त्याला विश्वास दाखवून तसाच कांहीं तरी कावा करावा. इथल्या इथें कावा साधला नाहीं तर विजापुरला नेऊन तेथें बंदींत टाकावा. पण त्याला मोकळें राहूं देण्यांत मुळींच तात्पर्य नाहीं." परंतु आपलें बोलणें पंताजींस रुचत नाहीं असें खानास स्पष्ट दिसलें. तेव्हां तो

म्हणाला, "कां पंत, माझें बोलणें आपल्याला पसंत नाहीं असें दिसतें. नसेल तर तसें बोला."

पंत थोडा वेळ थांबले, आणि एकदम म्हणाले, "खानसाहेब, मी आपल्या आणखी हजरतींच्या अन्नावर वाढलों. आपला बंदा आहे. पण आपण मला फार सन्मानानें वागवितां म्हणून मी वाटेल तेव्हां अगदीं निःस्पृहपणानें जसा बोलत आलों, तसाच आजहि बोलणार आहें, त्याबद्दल माफी असावी. आपण म्हणाला कीं, शिवाजीराजाशीं कावा करून त्याच्या म्हणण्याला आज रुकार द्यावा, आणखी विश्वासानें त्याला विजापुरास नेऊन बंदींत टाकावें; तर एवढी गोष्ट मात्र आपण करूं नये. आपल्याला त्याला गय करायची नसली, तो दाखवितो ती गरिबी खोटी वाटत असली तर त्याला स्पष्ट असा निरोप पाठवा कीं, 'आम्हांला तुझा विश्वास नाहीं; तूं शरण ये. मग आम्हांला काय वाटेल तें तुझं करूं.' पण फसवूं नका. निदान या फसवण्याच्या कामांत मला घालूं नका. मुत्सद्दीपणाच्या गोष्टी मी करीन, पण सरळपणानें ज्या होतील त्या करीन. येथें त्याला अभयवचन देऊन विजापुरास नेऊन त्याच्या मानेवर सुरी ठेवावयाची इतका कावा तरी कशाला पाहिजे? काय आपल्याला शक्ति नाहीं त्याचें आतांच काय तें पारिपत्य करायला? मग कावा कशाला? शहाजीराजे हजरतींचे इमानी नोकर. त्यांचे हे चिरंजीव, तेव्हां झाले अपराध माफ करून त्यांना आपलेसें करून घेण्याला ही उत्तम संधि आहे. पण कावा करून फसवून नेऊन त्यांचा घात करण्याला मी सिद्ध नाहीं."

पंताजी गोपीनाथ यांचें हें अगदीं निर्वाणीसारखें भाषण ऐकून त्या वेळीं खानाला सुद्धां फार अचंबा वाटला. परंतु पंताजी त्याचा फार दिवसांचा मोठा इमानी नौकर. त्याचा निःस्पृहपणाहि त्याला पूर्णपणें ठाऊक. यामुळें त्यांस कांहीं उलटून बोलावयाचें त्याच्या मनांतहि येईना. उलट तो हंसून म्हणाला, "पंत, कावा करून सगळें अगदीं सिद्ध तर झालें नाहींना? आपली तुम्हांला एक शेवटली गोष्ट सांगितली इतकेंच. त्याला तुरुंगांत

टाकावा अशी माझीहि इच्छा नाहीं. पण मीं त्याला मारीन किंवा जिवंत विजापुरास आणीन अशी प्रतिज्ञा केली आहे. तर मला माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें करायला नको का? मी आपल्या शपथेप्रमाणें त्याला येथून घेऊन गेलों असा प्रकार झाला पाहिजे. या गोष्टीला शिवाजी कबूल असला तर मला सगळें कबूल आहे. बाकी माझा कावा नाहीं, कांहीं नाहीं."

आपण इतकें निःस्पृहपणानें बोललों, आतां खान आज अगदीं शांत आहे, हें पाहून गोपीनाथपंतास आश्चर्य वाटलें. आपण ब्राह्मण, शिवाजी ब्राह्मणांचा पक्षपाती, तेव्हां आपल्या भाषणानें त्याच्या चित्तांत वास्तविक विपर्यास यावयाचा, तो न येतां तो अगदीं शांतपणें बोलतो आहे हें पाहून त्यास समाधानहि वाटलें. परंतु नंतर मनास असें वाटूं लागलें कीं, आज जरी हा खान नाहीं म्हणाला, तरी उद्यां विजापुरास गेल्यानंतर हा आपलें वचन पाळील कशावरून? त्यापेक्षां त्याचा विश्वास न धरतां महाराजांना ज्या कांहीं आपल्या संरक्षणासाठीं योजना करावयाच्या असतील, त्या त्यांनीं कराव्या हेंच चांगलें, असें त्यांना वाटलें.

महाराजांची जेव्हां प्रथम भेट झाली, तेव्हांपासून पंताजी गोपिनाथ यांचे मनावर एक प्रकारचा परिणाम झाला कीं, हा पुरुष खऱ्या निरपेक्ष बुद्धीनेंच हिंदुधर्माचें संरक्षण करण्यासाठीं झटतो आहे, याचे ठिकाणीं स्वार्थाचा लवलेश सुद्धां नाहीं. त्यापेक्षां आपण त्यास फसविण्यासाठीं उपक्रमांत मुळीं सुद्धां सहाय्य करूं नये. आपल्या हातून झालें तर आपल्या धन्याशीं बेईमानीपणा न करतां होईल तितकी त्यांस मदतच करावी. परंतु धन्यानें कावा करून त्यास मारण्याचा किंवा धरण्याचा बेत केल्यास त्यांत आपण पडूं नये; इतकेंच नव्हे, तर आपण होईल तेवढा मोडता घालावा असा त्याचे मनाचा आंतून विचार झाल्यामुळेंच त्यानें वर सांगितल्याप्रमाणें आपल्या धन्याशीं भाषण केलें, व कृष्णाजी भास्कर यांस राजांना जागृत करण्याइतकी बातमी दिली.

कृष्णाजी भास्कर हा थोडासा उतावळ्या स्वभावाचा होता. त्याची इच्छा

कीं, पंताजी गोपिनाथ यानें आपल्या धन्याशीं दगा करून आपणांस मदत करावी. मोंगलांची चाकरी धरली असतां त्यांच्याशीं दगा केल्यानें जर हिंदुधर्माच्या संरक्षणास मदत होते असें दिसलें तर दगा करण्यास हरकत नाहीं. परंतु पंताजी गोपिनाथ यास तसें वाटत नव्हतें. कृष्णाजी भास्करास या कामीं पंताजी गोपिनाथ कच्चेपणानें वागतात असें वाटलें. तथापि झालें इतकें थोडें नाहीं असें वाटून त्यांनीं खानाशीं घेतलेल्या मुलाखतींत असें सुचविलें कीं, "शिवाजीमहाराज खानाची मुलाखत घेण्यास सिद्ध आहेत. परंतु ती मुलाखत ते वाई खोऱ्यांत जाऊन खानाच्या छावणींत येऊन घेण्याइतके धीट नाहींत. आपण आजपर्यंत जें काम केलें तें केवळ पुंडावे मोडण्याकरितांच केलें. पातशाहीच्या विरुद्ध बंड करून स्वतंत्र राज्य स्थापावें या बुद्धीनें केलें नाहीं. परंतु हजरतींस व त्यांचे दरबारास तसें न वाटतां आपणास धरण्याकारितां अगर मारण्याकारितां वारंवार सरदार पाठविले जातात, यामुळें महाराजांना धास्ती वाटत आहे. ही धास्ती एक दोन वेळां भेटी झाल्यानेंच दूर होणारी आहे. कारितां तसा भेटीचा योग आणावा. आपण प्रतापगडाचे खालीं यावें. वाटेंत आपली सरबराईची व्यवस्था उत्तम ठेविली जाईल. आपण तिकडे येण्याचें करावें. नाहींपेक्षां जें होणें असेल तें होतच आहे. महाराजांचा खरा हेतु असा, तो आपल्याला विदित केला आहे. आपण मुलाखत घेण्याचें ठरविलें, तर सर्व सुयंत्रित होऊन महाराजांचें खरें हृद्गत आपल्या ध्यानीं येणार आहे."

कृष्णाजी भास्कर याचें हें बोलणें अगदीं सरळ असून आपल्या इकडे येण्यानें शिवाजी खरोखरीच घाबरला आहे असें खानास अगदीं उघड उघड वाटलें. तेव्हां त्याच्या इच्छेप्रमाणें होऊं दिलें तर त्यांत कांहीं वावगें नाहीं, आपल्याला जें काय करायचें असेल तें मुलाखतीच्या वेळीं खुशाल करितां येईल; याबद्दल आतांपासूनच त्याच्या मनांत संशय उत्पन्न होईल असें वर्तन करा कशाला, असा विचार खानानें मनांत करून कृष्णाजी भास्कर याच्या म्हणण्यास होकार भरला.

वकिलानें बोलतां बोलतां एकदां 'महाराज' हा शब्द शिवाजीमहाराजांस उद्देशून लाविला असतां, त्या उद्धट व डौली अफ़झलखानास तें मुळींच आवडलें नाहीं व तो एकदम म्हणाला, "कोण महाराज? शिवाजीला महाराज म्हटलें कोणीं! महाराज ही पदवी फुकट येत नाहीं. निदान माझ्याशीं बोलतांना तरी 'शिवाजी' म्हणत जा. त्याला म्हणावं तूं भ्याला आहेस. पण मला शरण येऊन कांहीं उपयोग नाहीं. तुला हजरतींच्या पायांवर लोटांगण घालण्याला आलं पाहिजे. मग तिथें तूं सुटशील. जा."

"आम्ही काय, निरोपाचे धनी," कृष्णाजी भास्कर म्हणाला, "आपली व त्यांची व्हाशी तशी मुलाखत झाली म्हणजे सर्व कांहीं यथायोग्य होईल याबद्दल आम्हांला शंका नाहीं."

इतकें बोलून त्यानें रजा घेतली व पंताजी गोपीनाथाशीं कांहीं बोलून तो परत महाराजांकडे आला. नंतर त्यानें आपल्या वकिलीचा एकंदर वृत्तांत त्यांस निवेदन केला. महाराजांनीं त्यापासून काय अनुमानें काढावयाचीं तीं काढलीं, आणि एकदम मनाचा पक्का निश्चय करावा असें त्यांस वाटूं लागलें. महाराजांचें चित्त एकाग्र झालें. त्यांची वृत्ति तन्मय होऊन त्यांचे तोंडून पुढील शब्द निघालेः 'वत्सा, घाबरूं नकोस. हें संकट तुझ्या चातुर्यानें आणखी समयसूचकतेनें दूर होईल.' चिटणिसांनीं ते शब्द चटाचट टिपून घेतले. आणि महाराजांचा लय उतरल्यानंतर त्यांस निवेदित केले. ते ऐकतांच महाराजांस व सर्वांसच फार आनंद झाला व विशेष हुरूप आला. नंतर त्यांनीं मुसेखोऱ्यापासून प्रतापगडापर्यंत रस्ता साफ करण्याचें व मुक्कामामुक्कामावर दाणावैरणीची व धान्यधुन्य व इतर अनेक भक्ष्य पदार्थांची यथास्थित सांठवण करून ठेवण्याचे हुकूम सोडले. या गोष्टीस थोडे दिवस लागले. रस्ता वगैरे जसा होण्यास पाहिजे तसा झाल्यानंतर त्यांनीं खानाकडे पुनः कृष्णाजी भास्कर यांस पाठवून वर्दी दिली कीं, 'सर्व कांहीं यथास्थित आणि व्यवस्थित झालें आहे, तरी आपण आतां तळ हालवून महाराजांच्या मुलाखतीस चलावें. मार्गावर सरबराईची वगैरे व्यवस्था किती उत्तम ठेविली आहे, हें आपल्याला प्रत्यक्षच दिसणार आहे.'

शिवाजीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें कृष्णाजी भास्करांनीं खानास वर्दी दिली. खानानें तळ हालविला. शिवाजीमहाराजांनीं सरबराईची जी व्यवस्था केली होती तिचा यथास्थित उपभोग घेत घेत स्वारी एकदांची नियमित ठिकाणीं येण्याला एका मुक्कामाचा अवधि राहिला. या मुक्कामापासून हालण्याच्या वेळीं अफ्झल्खान प्रातःकाळीं सुमारें नऊ वाजतां सहज घोड्यावर बसून एकटाच पुढें जाण्यास निघाला. त्याचेबरोबर फक्त पंताजी गोपिनाथ होते. अफ्झल्खान अगदीं साध्या पोशाखानें चालला होता. एका तलवारीखेरीज त्याच्याजवळ दुसरें हत्यारहि कांहीं नव्हतें. परंतु तो तसाच बेफिकीर; त्याला आपल्या शौर्याचा मोठा अभिमान. आपल्या केसालासुद्धां धक्का लावण्याचें सामर्थ्य कोणाच्या अंगांत नाहीं असें त्याच्या मनांत पक्कें बिंबलेलें; आणि तसें बिंबण्याला कारणहि तसेंच होतें. तो शरीरानें फार धिप्पाड. त्याचें हाडपेर भयंकर मजबूत; जणूं काय पक्कें पोलाद. तो उंच अर्थात् त्याचे हातपायहि लांब व लठ्ठ होते. त्यास पहाण्याबरोबर सहज कोणास वाटायचें कीं, हा एकटा दहापांच असामींना भारी. शरीरानें जितका धिप्पाड तितकाच छातीचाहि तो निधडा असे, आणि शस्त्रविद्येंत अगदीं निपुण. तलवारीचा किंवा बंदुकीचा नेम कधीं चुकायचा नाहीं आणि घाव बसला कीं ज्याच्यावर तो बसेल तो जमीनदोस्तच व्हायचा. असो.

वर सांगितल्याप्रमाणें तो चालला असतां एक गरीब बिचारा कुणबी कांहीं रताळीं, कांहीं भाज्या वगैरे घेऊन चालला होता; तो सहज त्याच्याकडे पहाण्यास उभा राहिला. त्या कुणब्याच्या अंगावर धड कपडा नाहीं. अंगावर एक घोंगडी आणि डोकीवर त्या घोंगडीची खोळ होती तिजवर ती पाटी. कुणबी अगदींच ठेंगणा, काळा, आणि गरीब वेंधळा असा दिसत होता आणि तो ज्या रीतीनें अफ्झल्खानाकडे पहात होता ती रीत पाहिली म्हणजे तो आपला पक्का गांवढेकरी, ज्यानें कधीं कांहीं कोठें पाहिलें नाहीं असा आहे असें सहजच वाटलें असतें. पाटी उगीच लहान पण तींत माल

बराच भरला होता. माल म्हणजे वर सांगितलेलाच, पण हे दोघे घोडेस्वार येण्याबरोबर त्यानें दोन हात पाटीला लावून ती धरून मान उंच केली. अफ़्झलखान आधीं उंच पुरा माणूस आणि त्यांत भल्या थोरल्या उंच अशा घोड्यावर! तेव्हां त्या कुणब्यासारख्या ठेंगण्या माणसाला त्याच्याकडे पाहाण्यास मान खूप उंच करावी लागेल यांत नवल काय? मान उंच होण्याबरोबर पाटी कलली व ती कलण्याबरोबर रताळींबिताळीं काय होतीं तीं भराभर खालीं पडलीं, परंतु तें त्या कुणबी गड्याच्या मनांत सुद्धां नाहीं. त्याची मान उंचची उंच आणि तोंड वासलेलें. ती त्याची मूर्ति, व पाठीमागून त्याचीं रताळीं वगैरे खुशाल पडताहेत हें पाहून अफ़्झलखान हंसला व पंताजी गोपीनाथांस म्हणाला, "पंत, हे तुमचे लोक किती गयाळी पाहा, यांना कांहींसुद्धां समजत नाहीं.उगीच नाहीं तैमुरलंगापासून सगळे तुम यावर स्वाऱ्या करकरून तुम्हांला जेरीला आणीत आले ते!"

अफ़्झलखान आपल्याकडे पाहून आपल्या गयाळीपणाबद्दल हंसतो आहे हें त्या कुणब्याच्या गांवींहि नाहीं. त्याचें काम झालें. अफ़्झलखानास त्यानें नीट पाहून घेतलें. थोडा वेळ थांबून तो कुणबी जो तेथून नीट निघाला, तो सुमारें पाव मैल झाडीच्या आंत जाऊन उभा राहिला, आणि त्यानें शीळ घातली त्याबरोबर एक मोतद्दार घोडा घेऊन आला, व तो कुणबी घोड्यावर बसून चालता झाला. तो सुमारें अर्धा कोस उलट दिशेला गेल्यानंतर तेथें दोघेतिघे लोक त्याला भेटले, त्यांनीं मोठ्या अदबीनें त्यास रामरामाचा मुजरा केला. तेव्हां तो कुणबी आपल्या अंगावरली ती कांबळी टाकून देऊन हंसत हंसत त्यांस म्हणाला, "काय हो, तुम्ही नव्हतां तिथं, नाहींतर तुम्हीं सुद्धां मला दुरून ओळखतां कीं नाहीं, शंकाच आहे. मला जें काय साधायचं तें अगदीं बेमालूम साधलं. अगदीं जवळ राहून नीटपणें पाहून घेतला. तो प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्यावर आपणांस कोण्या प्रकारें तुटून पडतां येईल हें समजायचं नाहीं. तेव्हां तुम्ही नको नको म्हणालांत तरी मी जो गेलों तो एवढ्याकरितां."

"पण सरकार, जर कोणी आपल्याला ओळखलं असतं, आणखी अफझलखानाला सांगितलं असतं तर काय प्रसंग ओढवला असता! कधीं कधीं आपण विनाकारण आपला जीव धोक्यांत घालतां. मग आमच्यासारखे जे आपल्याला वाहिलेले लोक त्यांचा उपयोग तरी केव्हां करावयाचा?"
"तानाजी, तूं अगदीं वेडा आहेस. अरे गांठ पडायची आहे त्याची आणखी माझी, आणि त्याची माझी झटापट व्हायची. तेव्हां तो कसा आहे, काय आहे, झटापटींत त्याला यश येईल कीं आपल्याला, या गोष्टीचा शोध करायला आपण स्वतः गेल्याखेरिज उपयोग काय? स्वतः पाहिलं म्हणजे बरोबर अंदाज लागतो. बरं तें असो. आतां पुढें काय काय करायचं हें ठरवूं. जर अफ़झलखानाच्या मनांत आम्हांला दगा करायचा असं आलं, तर आम्हांलाहि आपलं कांहीं तरी केलंच पाहिजे. मी प्रत्यक्ष आतां त्याला पाहून आलों. माझी इतकी खात्री आहे, आपण जर सावध असलों तर त्याला पालथा पाडूं, तो आपल्याला फसवणार असं धरून चालायचं, आणखी आपण आपली तयारी करायची. त्या तयारीचा उपयोग करायचा कीं नाहीं तें वेळेवर ठरवतां येईल. आम्हांला त्याचा कावा जसा समजला आहे तसा आमचाहि कांहीं कावा आहे अशी त्यांना शंका येऊं नये. याकरितां खबरदारी ठेवावी; आपल्या खालच्या जाळींत आणखी पलीकडच्या झाडींत फौजफाटा ठेवला पाहिजे. जें काय करायचं तें इतक्या बेतानं केलें पाहिजे कीं, या कानाचं त्या कानाला कळतां कामा नये. चला तर आतां. इथं फार वेळ राहतां उपयोगी नाहीं."

इतक्यांत एक फकीर महाराजांचे भेटीस आला. त्यास पहातांच सर्व मंडळी हंसूं लागली. तो फकीर त्यांच्या नेहमींच्या कार्यकारी मंडळीपैकींच एक होता. आल्याबरोबर त्यानें आपण हें सोंग कां घेतलें व त्याचा उपयोग काय झाला हें महाराजांस सविस्तर सांगितलें. बोलतां बोलतां आपणांस सर्जेराव कसा भेटला व तो कठिण प्रसंगांतून आपल्यामुळें कसा निभावला हेंहि सांगितलें. तें ऐकतांच महाराजांचा चेहरा जरासा क्रुद्ध झाला.

त्यांनीं फकिरास आणखी कांहीं विचारलें, तेव्हां सर्जेरावानें आपली अवज्ञाच केली अशी त्यांची खात्री झाली; व ते एकदम जागचे उठले आणि इकडून तिकडे फेऱ्या घालूं लागले.

---

## सूडाची तळमळ : : ७

अफ्झलखान ऐन मिजाशींत आपल्या किनखापी तंबूंत हुक्का पींत बसला होता. आजपर्यंत इतक्या सरदारांनीं हात टेकले, आणि आपण एक माणूससुद्धां मरूं न देतां, लढाई न करितां, शत्रूला गिरफदार करून नेणार. तेव्हां आपली केवढी वाहवा होईल ! हा नुसता विचार मनांत येण्याबरोबरच त्यास आनंदाचें भरतें आलें. अशा आनंदांत स्वारी असतां एके दिवशीं रात्रीं त्याचा आवडता हुजऱ्या मीर गुलाम हळूच त्याच्याजवळ येऊन म्हणाला, “ सरकार, माझा एक जरूरीचा अर्ज आहे. एका माणसास आतांच आपली मुलाखत पाहिजे आहे. ती आपण द्यावी. ”

मीर गुलामाचा हा अर्ज ऐकून अफ्झलखानास फार आश्चर्य वाटलें आणि तो म्हणाला, “ एवढ्या रात्रीं माझी मुलाखत घेण्याजोगें नाजूक काम तरी कोणाचें काय आहे ?...बरं. जा, तुझ्या खात्रीचा माणूस असेल तर आंत आण. पण संभाळ हो, आपण मराठ्यांच्या मुलुखांत आहोंत तो पुंड शिवाजी केव्हां कोणास काय सोंग देऊन इकडे आपला घात करण्याला पाठवील याचा नेम नाहीं. ” मीर गुलामानें लागलीच बाहेर जाऊन एका तरुण उमद्या मराठ्या जवानास आंत आणिलें. त्यास पाहतांच अफ्झलखानाचें मत फार चांगलें झालें. तो तरुण मराठा कुर्निसांत करून उभा राहण्याबरोबर खान त्यास म्हणाला, “ तूं मीर गुलामाच्या विश्वासांतला म्हणून मीं तुझी एवढ्या रात्रीं गांठ घेतली. तुझें काय काम असेल तें मनमोकळें करून मला सांग. ”

अफ्झलखानाचें असें उत्तेजनपर भाषण ऐकून त्या तरुण पुरुषास फार आनंद झाला. तो खानास मोठ्या नम्रपणानें परंतु ठासून म्हणाला: “ मी

कोण, आणखी कां आलों ही गोष्ट आपल्याला कळली म्हणजे आपणच मला जवळ कराल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. सरकार, मी चंद्रराव मोरे यांचा भाचा आहें. हजरतींच्या उलट बंड करण्याला, हजरतींची चाकरी सोडून शिवाजींची चाकरी धरण्याला—माझा मामा कबूल झाला नाहीं, म्हणून शिवाजीनं त्याचा खून करविला. लोक जेव्हां निंदा करूं लागले, तेव्हां राघो बल्लाळ आणि संभाजी कावजी यांनीं आपल्याला नकळत हें कृष्णकृत्य केलें असें म्हणून त्यानें रिकामी सारवासारव चालविली. पण अशानें कोठें माझ्यासारखीं जिव्हाळ्याचीं माणसें फसतील काय ? मामाचा खून झाला, आणि मीं असा निश्चय केला कीं मी शिवाजीचा त्याचप्रमाणें खून करीन, किंवा हजरतींकडून जे कोणी त्याचें पारिपत्य करण्यास येतील त्यांस साहाय्य तरी करीन. माझ्या एकट्याच्यानें हें काम निभायचें नाहीं म्हणून मी आपल्या आश्रयाला आलों आहें. मला आपण आपल्या पदरीं ठेवून घेऊन वकिलाच्या कामावर माझी नेमणूक करावी. आपल्या वकिलाच्या विरुद्ध कांहीं बोलणें हें धाडसाचेंच आहे. पण खरी गोष्ट आपल्याला न भितां स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे. या माणसाचा सर्वथैव विश्वास धरूं नये. शिवाजी गोब्राह्मणांच्या प्रतिपालाचें ज्याला त्याला आमिष दाखवितो आणि फसवितो. त्याची खरी इच्छा विजापूरची पातशाही उद्‌ध्वस्त करून आपलें राज्य स्थापन करण्याची आहे. परंतु त्याचा कावा सगळ्यांनाच समजत नाहीं. आपण मला आश्रय द्याल तर मी याचें सारें थोतांड बाहेर काढतों. यापेक्षां जास्त मी बोलत नाहीं. बोललों हेंच प्रथम भेटीला फार झालें. पण मी तरी काय करूं ? मामाच्या खुनामुळें माझे अंतःकरणांत सूडाची तळमळ लागून मला वेड लागल्याप्रमाणेंच झालें आहे.”

ही चर्पटपंजरी ऐकून अफझलखानास मौजच वाटली असावी, त्या मनुष्याचा राग आला नसावा हें स्पष्ट दिसलें. कारण तो हंसला व शांतपणें त्यास म्हणाला, “तुझ्या मामाच्या खुनामुळें तुझें डोकें बहकलें आहे, नाहीं तर तूं एकदम असें भाषण पहिल्याच भेटीला केलें नसतेंस. तुझ्या मामाचा

लबाडीनें खून करणाऱ्याबद्दल तुला संताप आला तो अगदीं यथायोग्य. त्याच्याबद्दल तुझी मी पाठ थोपटतों. पण वेडचा, पंताजी गोपीनाथासारख्या पिढीजाद नोकराची नालस्ती करून आपला कार्यभाग साधूं पहाशील तर त्या भानगडींत मात्र तुला यश येणार नाहीं. त्याची वकिली मी तुला देईन हें आपल्या मनांत तरी कसें आणलेंस?"

आतां यावर काय बोलावें हें त्या मराठ्या जवानास मुळींच समजेना. शेवटीं तो शांतपणें त्यास म्हणाला, "खाविंद, आपण म्हणतां त्याप्रमाणें माझें डोकें बिघडलें आहे खरें. मला माझ्या मामाच्या खुनाबद्दल अतोनात त्वेष आला आहे आणि असें वाटतें कीं, आपण काय वाटेल तें साहस करावें, प्रसंगीं प्राणही वेंचावा, पण त्या कपटी शिवाजीवर सूड उगवावा. या वैतागाच्या भरांत मी आपल्याला काय बोललों तिकडे आपण लक्ष देऊं नये. तो शिवाजी नम्रतेचीं भाषणें करितो आहे, एवढ्यावर आपण जाऊं नये. तो कोण्या वेळीं काय दगा करील याचा बिलकुल नियम नाहीं. कदाचित् आपल्याला भेटीला म्हणून बोलावून आपला प्राणही घेईल. मला आपल्या पदरीं ठेवा म्हणजे मी आपल्या दोघांनाही इष्ट अशी गोष्ट घडवून आणतों."

त्याचें बोलणें ऐकल्यापासून अफझलखानाचें चित्त फार अस्वस्थ झालें. तो आधींपासून संशयग्रस्त नव्हता असें नाहीं, परंतु या तरुण पुरुषानें त्यास आपल्या चऱ्हाटी बोलण्यानें अधिकच संशयग्रस्त केलें. आपल्याला शिवाजी फसवून कांहीं तरी भयंकर कृत्य करील, अशी शंका त्याचे मनांत विशेष जोरानें आली नव्हती. पंताजी गोपीनाथ आपल्यास फसवीत असेल, किंवा शिवाजीस मिलाफी होऊन आपला घात करण्यास प्रवृत्त होईल ही शंका मात्र त्याच्या मनांत धर धरीना. पंताजी गोपीनाथ खरोखरी फितुर होणारा माणूस नव्हे अशी त्याच्या मनास खात्री वाटे. त्याच्या मनांत असा एक संशय आला कीं, हा शिवाजीच्या गोष्टी सांगून मला फसविण्यासाठीं त्याच्याकडून हेर म्हणून तर आला नसेलना? ही शंका मनांत येतांच तो थोडा

गांगरला. तथापि लवकरच त्यानें स्वस्थपणें विचार करून आपल्या मनाशीं कांहीं बेत ठरविला, आणि त्या तरुण पुरुषास म्हटलें, " तूं वाटेल तें धाडस करायला तयार आहेस ना ? ठीक आहे. आतां तुला मी एक फार नाजूक काम सांगतों. तूंही जातीचा मराठा. तेव्हां तुला तें सहज साधेल. जा, तूं आमचा हेर. वाटेल तें सोंग घे किंवा युक्ति कर. पण शिवाजीच्या गोटांत शिरून त्याचे खरेखुरे मनसुबे काय चालले आहेत, त्याचा पक्का तलास लावून मला येऊन कळीव. तूं या कामांत जीव द्यायलाही तयार आहेस, म्हणून तुला कामगिरी सांगितली. आतां पाहतों, चंद्रराव मोऱ्याच्या भाच्याच्या अंगांत किती धाडस आहे तें !"

अफ्झलखानाचें हें बोलणें त्यास अर्थातच रुचलें नाहीं. पण काय करणार ? त्याला तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागलें. तो उत्तरादाखल खानास म्हणाला, "खाविंद, आपण सांगितलेली कामगिरी कांहीं वावगी नाहीं. ती मी करतों. माझ्या मनांतील खरी इच्छा मात्र वेगळीच होती !" असें बोलून त्यानें खानाचा निरोप घेतला. जातांना खानाच्या विचारण्यावरून त्यानें आपलें नांव मात्र सांगितलें, तें खंडेराव होय.

अफ्झलखानानें सांगितलेली कामगिरी पतकरून खंडेराव त्याच्या समोरून निघून बाहेर आला, तेव्हां त्याच्या चेहऱ्यावर पराकाष्ठेची उदासीनता दिसूं लागली होती. त्याचा फार दिवसांचा हेतु सपशेल फसला. अफ्झलखानाकडून म्हणून आपल्यास जर शिवाजीकडे जाण्यास सांपडलें असतें, तर फारच चांगलें झालें असतें. मग आपण त्याच्याशीं कांहीं हितगुज, बोलण्याचें मिष करून केव्हांच त्याचा जीव घेतला असता. परंतु तसें त्यानें आपणांस कांहींच सांगितलें नाहीं. हा 'आपला' म्हणून मला मुळींच म्हणत नाहीं. नुसती 'बातमी काढून आण, वाटेल तें सोंग कर, वेळीं जिवावर बेतली तरी हरकत नाहीं, परंतु बातमी काढून आण,' म्हणून हा मला सांगतो ! ही कामगिरी आपल्याला यानेंच कशाला द्यायला पाहिजे होती ? माझी मीच करण्याला काय असमर्थ होतों ? पंताजी गोपीनाथ धडधडीत फितला आहे. तिकडे

शिवाजीजवळ एक मनसुबा करतो, इकडे येऊन निराळ्याच थापा मारतो. आपण असें खानाला स्पष्टपणें सांगितलें तरी याचा आपला विश्वास पंतावर आहेच. याला काय म्हणावें ! मीर गुलामाशीं संधान बांधून अफ्झलखानाची पायधरणी करण्यासाठीं आज दोन महिने थांबून वेळ व्यर्थ घालवला ! त्यापेक्षां आपण आपल्या पायावर उभे राहून स्वतंत्रपणेंच एकादी मसलत केली तर काय वावगी ? पण तो स्वतंत्र होता कोठें ? त्याची खरी प्रेरक शक्ति म्हणजे ताराबाई. तिला भेटल्याखेरीज त्याला कांहींच ठरविणें शक्य नव्हतें. म्हणून त्यानें जावळीकडे आपला मोर्चा फिरविला.

चंद्रराव मोरे याचा खून झाला हें महाराष्ट्रांत कोणासच आवडलें नाहीं. झाली गोष्ट बरी नव्हे असें पुष्कळांस वाटलें. 'चंद्ररावास समोर आणून त्याच्याशीं लढून त्यास शिवाजीनें मारावयाचें होतें,' असें कित्येक म्हणत. 'राजकीय उलाढाली घडतात त्यावेळीं असलीं कृत्यें घडावयाचींच,' असें म्हणून दुसरे कित्येक त्यावर पांघरूण घालूं लागले. तिसरा पक्ष असें म्हणे कीं, 'शिवाजीमहाराजांचें त्या खुनांत मुळींच अंग नव्हतें. त्यांनीं त्याला वश करून घेण्याची खटपट चालविली होती, परंतु ज्यांच्याकडे त्यांनीं तें काम सोंपविलें होतें, त्यांनीं त्यांना नकळत वाटेल तें केलें. त्यांनीं तरी काय करावें ?' दुसरे कित्येक त्यावर म्हणत कीं, 'हें बोलणें उगीच आहे. त्यांनीं त्याच्या हुकमाबाहेर कामगिरी केली असें होतें तर त्यांचें पारिपत्य काय केलें ? जावळीचा मुलूख कां काबीज केला ?' यावरही कांहीं उत्तर देऊन शिवाजीमहाराजांच्याकडे त्यांत कांहीं दोष नाहीं असें दाखवीत. लोकापवादानें आजपर्यंत कोणास सोडलें आहे तर शिवाजीमहाराज त्यापासून सुटतील ? तथापि लोकांची त्यांचे ठिकाणीं भक्ति फार आणि श्रद्धा जबरदस्त, यामुळें साधारण लोक असेंच म्हणत कीं, ते कधीं वावगें असें कांहीं करणार नाहींत. तेव्हां त्यांनीं जें केलें तें विचारपूर्वक आणि गोब्राह्मणांच्या प्रतिपालनाला योग्य असेंच असलें पाहिजे. असो. परंतु आपणांस आतां त्यांच्यावर अपवाद आणणाऱ्यांच्या संबंधानें कांहीं बोलावयाचें नाहीं.

सध्यां आपला खंडेराव व चंद्रावाचीं मुलें यांनीं काय घाट घातला व तो कसा काय साधला हें पहावयाचें आहे.

चंद्रावाचा अंत झाल्यानंतर त्याचे दोघे मुलगे बाजीराव व कृष्णराव यांस महाराजांनीं कबिल्यासह पुणें मुक्कामीं आणून कैद करून ठेवलें होतें. फक्त एक मुलगी ताराबाई त्यांचे हातीं सांपडली नाहीं. त्या दोघां मुलांनीं कसेंही करून तेथून निसटून जावें, विजापुराशीं कांहीं संधान बांधून शिवाजीवर सूड उगवावा याबद्दल गुप्तपणें विचार चालविला होता. एके दिवशीं कांहीं मसलत करून त्यांनीं शिवाजीस अर्ज पाठविला, त्यांत असें लिहिलें कीं, "आम्हांला आमच्या एकुलत्या एक बहिणीस भेटण्याची फार उत्कंठा आहे. आमची भगिनी अल्पवयी, तिचा पत्ता आपण काढला असल्यास आम्हांस तो कळवावा. आपले लोकांस शोध लागला नसल्यास आमच्यांपैकीं एकास किंवा दुसऱ्या कोणास आमचेतर्फे शोधास पाठविण्यास परवानगी असावी. आतां इतके दिवस आपण आमचें वर्तन पाहिलें. तेव्हां आमचा भरंवसा आला असेलच." महाराज स्वतः फार दयाळू. तो अर्ज पाहतांच, या पोरांनीं किती दिवस कैदखान्यांत तळमळत खितपत पडावें, आतां यांस जाऊं द्यावें, असें महाराजांना वाटलें. पण चिटणिसांचा अभिप्राय ऐकून महाराजांसही शंका आली कीं, आपण या दोघांस सोडलें तर न जाणों, अवचित या आतांच्या संकटांत हे दोघे भर घालतील. सुटल्यावर कदाचित् त्यांच्या मनांत आपल्यावर सूड उगविण्याचे येणार नाहीं म्हणून कशावरून? तेव्हां "तुमचा कोणी नौकर शोधास गेल्यास त्याला हरकत होणार नाहीं," असा जबाब लिहावा म्हणून चिटणिसांस सांगितलें.

या उत्तरानें त्यांचें संपूर्ण समाधान झालें नाहीं हें खरें; परंतु एवढ्याच सवलतीचा फायदा घेऊन आपला कार्यभाग आपण करून घेऊं अशी त्या दोघां भावांस पक्की उमेद वाटली आणि त्यांनीं लागलीच आपल्या जनानखान्यांतील एक दासी व एक हुजऱ्या यांस काय शोध करावयाचा, काय नाहीं, तें सांगून पाठवून दिलें. पोरें इतके दिवस नेभळ्यासारखीं बसून आतां

कांहीं करतील हें महाराजांस शक्यच वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. परंतु त्यामुळें त्या मुलांचें, त्यांच्या आतेभावाचें आणि बहिणीचें मेतकूट होऊन एकंदर काय बनाव झाला तो पुढें कळेल.

---

## तपस्वीबोआंचें कारस्थान : : ८

आमच्या कथानकाच्या वेळीं महाबळेश्वर, धौम, जावळी वगैरे प्रांतांच्या जवळ मोठें गहन असें अरण्य होतें. विशेषत: जावळीचें रान म्हणून प्रसिद्ध असे. एकटा दुकटा स्वार त्यांत भर दोनप्रहरींसुद्धां शिरण्यास भीत असे. तरी महाराजांनीं प्रतापगड किल्ला बांधल्यापासून या रानांत उगीच कोठें रहदारी सुरू झाली होती, व प्रसंगानुसार थोडी धामधूमहि चाले. परंतु अरण्य फारच गहन आणि भयंकर असल्यामुळें महाराजांनींहि केवळ येण्याजाण्यासाठीं जितका रस्ता पाहिजे तितकाच करून घेतला होता. तथापि त्यांस व त्यांच्या माणसांसही कित्येक वेळां या रानाच्या भुलभुलावणींत गुरफटून गांगरून गेल्यासारखें होई. शिवाय जाळींतून केव्हां एखादा वाघ आपल्या अंगावर झडप टाकील, पायाला केव्हां एखादा कृष्णभुजंग दंश करील याचा नेम नाहीं, असें मनांत येऊन मनुष्य कसाही निधड्या छातीचा असला तरी त्याला भय वाटल्याखेरीज राहणें शक्यच नव्हतें. जावळीचें रान असें भयंकर होतें.

परंतु अशाही रानांत कसलीही दिक्कत न बाळगतां केवळ परमात्मस्वरूपीं लीन होण्यासाठीं म्हणून एक बैरागी राहिला होता. त्याचेजवळ एक सुमारें पंधरा सोळा वर्षांच्या वयाचा मुलगा त्याच्या सेवेला म्हणून राहिला होता. त्यांना कित्येकांनीं विचारलें, परंतु कधीं कसलाही नक्की पत्ता लागला नाही. कधीं म्हणजे अमुक एक जिन्नस त्यांना लागला आहे आणि ते कोणाजवळ मागायला गेले आहेत असें घडलें नाहीं. एका झाडाच्या बुंध्याशीं कशाबशा बांधलेल्या आपल्या खोपेपासून पांचशें कदमांच्या बाहेर कांहीं या दोघांपैकीं एकही केव्हां गेला नाहीं. बैरागीबोआंचा नित्यक्रम मोठा

विलक्षण असे. पर्णकुटीपासून सुमारें पांचचारशें कदमांवरच एक ओढा असे. त्या ओढ्याच्या कांठीं जाऊन ह्यांनीं मोठ्या पहांटे स्नान करावें आणि आपल्या धुनींतील राख घेऊन ती अंगास फासून ऐन रानांत एका मोठ्या झाडाच्या बुंध्यांतील विस्तृत अशा ढोलींत स्वारीनें जाऊन तपश्चर्या करीत बसावें. मध्यान्ह झाली म्हणजे बाहेर येऊन बोवांनीं त्या आपल्या ओढ्यावर पुनः स्नान करावें आणि मग आपल्या धुनीजवळ सुमारें तिसरा प्रहरपर्यंत विश्रांति घेत अगर आपल्या शिष्याशीं बोलत पडून रहावें. नंतर बोआ पुनः एकदां स्नान करून त्या ढोलींत शिरून बसत आणि त्यांचें तपश्चरण चाले. ते दोघे कंदमुळें, फळें तरी केव्हां कोठून गोळा करून आणीत आणि केव्हां खात, याचा मुळींच पत्ता नसे. त्या बालगोसाव्याचाही अशाच प्रकारचा वर्तनक्रम असे.

गोसावीबोआ एका गोष्टीबद्दल मात्र विशेष खबरदारी घेत. आपल्या ढोलींत केव्हांही कोणास त्यांनीं डोकावूं दिलें नाहीं. या गुरुशिष्यांची हकीकत महाराजांच्या कानीं गेली आणि एकदां त्यांनीं बोआंचें दर्शन घेण्याची इच्छा करून तशी सूचनाही पाठविली. तेव्हां "आम्हांला महाराज आणि महारंक सगळे सारखे, वाटलें तर त्यांनीं इतरांप्रमाणें खुशाल यावें. आमची काय ना आहे ?" असें बोआंनीं सांगितलें. त्यावरून महाराज एकदां तेथें गेले. परंतु गोसावी किंवा त्यांचे शिष्य यांपैकीं कोणी त्यांच्याशीं एक शब्दसुद्धां बोललें नाहीं. महाराज सुमारें प्रहरभर तेथें बसले. शेवटीं 'मजवर आपली कृपा असावी म्हणून आलों' असें महाराजांनीं म्हटलें, तेव्हां बैरागीबोआ फक्त एवढेंच म्हणाले, "तुझ्यावर आदिमाता भवानीचा प्रसाद आहे; आमची कृपा त्याच्यापुढें कसली मागतोस ?" तें ऐकून महाराज आजूबाजूच्या लोकांस बजावून गेले कीं हा पुरुष कोणी तरी खरोखर महात्मा आहे. तेव्हां याच्या वाटेस कोणीं जाऊं नये. त्याची तपश्चर्या खुशाल त्यांस करूं द्यावी. त्याच्याबद्दल चौकशी करण्यासाठीं कोणीं वारंवार जाऊं नये.

एकदां एका गृहस्थानें उंची पक्वान्नें एका ताटांत घालून त्यांचेपुढें ताट

आणून ठेविलें, तेव्हां बोआंनीं त्या ताटाकडे एकदां पाहिलें, नंतर त्यास हात लाविला, वंदन केलें आणि आपल्या शिष्याला सांगितलें, "बेटा, यांतलें अर्धें अन्न अग्निनारायणाला आणि अर्धें वरुणाला दे! आपला जठराग्नि आणखी हा अग्नि एकच आहेत!" गुरूंच्या तोंडून हे शब्द बाहेर पडण्याचा अवकाश, शिष्यानें ताट घेऊन त्यांतलें अर्धें त्या गृहस्थाच्या देखत धुनीवर घातलें आणि दुसरें अर्धें ओढ्यांत नेऊन टाकलें. हा एकंदर प्रकार पाहून लोकांस विलक्षण आश्चर्य वाटलें. तेव्हांपासून सर्वांची खात्री झाली कीं, हे अन्नाला लालचावलेले भोंदू नव्हत; खरे विरक्त साधुपुरुष आहेत.

अशा प्रकारें बोआंची परीक्षा अनेकांनीं अनेक प्रकारांनीं केली, परंतु बोआ दिसतात त्याहून कांहीं वेगळे असतील, अशी कल्पना करण्यास कोणासही कारण सांपडलें नाहीं. बोआंचें विशेषतः त्यांच्या कोंवळ्या बालशिष्याचें कडकडीत वैराग्य पाहून सर्वांच्या मनांत मोठा आदर व भक्ति उद्भवली. या त्यांच्या विरक्तीमुळें हां हां म्हणतां जिकडे तिकडे त्यांची कीर्ति पसरली. परंतु बोआंचा आश्रम अशा विलक्षण ठिकाणीं होता कीं, रानावनांत हिंडण्याची संवय नसलेल्या लोकांना तेथें जाणें मोठ्या मुष्किलीचें होतें; शिवाय, बोआ होतां होईतों कोणापाशीं बोलत नसत; कांहीं वेळा तर कोणीं कांहीं विचारल्यास विक्षिप्तपणानें तर्हेवाकें उत्तर देऊन त्यांना जा म्हणून घालवून देत; त्यामुळें अगदीं भाविक लोकांखेरीज त्यांचेकडे जाण्यास कोणी सहसा धजत नसे. बोआंना तरी हेंच पाहिजे होतें. इतकेंच नव्हे, तर त्या भाविक लोकांपासून आपणांस त्रास होतो तो बंद करावा अशी त्यांनीं महाराजांकडे विनंति केली तेव्हां महाराजांनीं तोही बंदोबस्त केला. अर्थातच त्या तपस्वीबोआंकडे कोणी जाईनासें होऊन त्यांस आपलीं कार्यें निर्वेधपणें चालविण्यास सांपडूं लागलें.

अशा प्रकारें हे तपस्वी त्या रानांत निर्वेधपणें राहात होते. एके दिवशीं सायंकाळीं ते ओढ्याच्या कांठीं आपलीं नित्यकर्में आटपून बसले असतां तो बालशिष्य त्या वृद्ध तपस्व्यास म्हणाला, "अशाच प्रकारानें आपले

किती दिवस गेले तरी काय होणार ? जी युक्ति साधणार नाहीं असें वाटत होतें ती साधली. आतां कांहींतरी पुढची तजवीज करायला नको का ? एक पाऊलभर तरी......"

"बेटा, उगीच उतावळी करूं नको. तुझ्याप्रमाणें मलाही काळजी वाटत नाहीं काय ? आपलें इष्ट कार्य साधण्याला आतां फारसा अवधि नाहीं. तूं अगदीं निर्धास्त रहा; घाई करून फसगत करून घेण्यापेक्षां धिम्मेपणा पत्करून फत्ते मिळवलेली जास्त इष्ट नाहीं का ? मग उगीच धीर सोडण्यांत काय फायदा आहे ? हें पहा आज इतके दिवस जी जागा तयार करण्यासाठीं मी एवढी धडपड करतों आहे ती आतां दोन दिवसांत आपल्याला पाहिजे तशी होईल. परंतु ती होऊन उपयोग काय ? दुसरेंही काम चालविलें आहे, तें पुरें झाल्याखेरीज आपल्याला कांहीं करतां यायचें नाहीं; तेव्हां थोडा दम धर. जा, आतां तुला दगदग फार झाली आहे. तूं नीज. मी तुला वचन दिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणतों. तुला काळजी नको. आतां मी तिकडेच जातों."

इतकें बोलून तपस्वीबोआ उत्तरेच्या बाजूस गहन अरण्यांत चालते झाले. गुरुजी गेल्यानंतर तो बालशिष्य दोनदां तीनदां उसासे टाकून आपल्याशींच म्हणाला : "झाल्या गोष्टीचा सूड उगविण्याची खरी तळमळ काय ती मलाच अं ? बाकी हे सगळे आज, उद्यां करून वेळ काढताहेत. तो खंड्या तर कोणकिडे गेला आहे निघून मला कांहींतरी थापा मारून; त्याचा पत्ताच नाहीं. जेव्हां आपण मरावें तेव्हांच खरोखर स्वर्ग दिसणार; म्हणे धीमेपणानें घ्यावें, उतावळी करूं नये. सूड आणि धीमेपणा यांची सांगड कधीं कोणीं घातली आहे ? सूड आणि उतावळेपणा यांची सांगड जुळायची नाहीं. कबूल. पण त्वरा म्हणजे उतावळेपणा नव्हे. मग हे लोक त्वरा कां करीत नाहींत ? ज्याचया अंतःकरणाला खरा पीळ नाहीं, त्याच्या हातून कांहींसुद्धां होणें नाहीं. पण आपण तरी दुसऱ्याला दोष काय म्हणून द्या ! आपण स्वतःच कां नाहीं काय करावयाचें तें करूं ?

आजपर्यंत माझ्यासारख्यांनीं जें केलें नाहीं तें करून नांव मिळवायाचें, नाहीं तर पुनः कोणाच्या तोंडीं आपलें नांव यायला नको असें करावयाचें. हाच आपला निश्चय, हीच आपली प्रतिज्ञा..."

अशा विमनस्क स्थितींत तोही बोआंच्या मागून कांहीं वेळानें आश्रमाच्या बाहेर निघून गेला. बोआ जे निघाले ते त्या गहन अरण्यांतील एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि बिकट अशा करवंदीच्या जाळींत शिरले. तेथून थोडे पुढें गेल्यावर एक लमाण लोकांचा तांडा झाडें तोडीत असतांना दिसला. तें पाहून तपस्वीबोआंच्या चर्येवर फारच संतोष दिसूं लागला. ते लागलीच पुढें होऊन त्या तांड्याच्या मुख्यास म्हणाले, "काय तुमचा व्यापार ठीक चालला आहे ना ?" तो प्रश्न ऐकून लमाणांचा मुख्य त्यांच्यापुढें दंडवत घालून त्यांस म्हणाला, "आपल्या आशीर्वादानं अगदीं ठीक चाललं आहे. आपण दोनतीन दिवसांत दर्शन दिलं नाहीं त्यामुळें थोडी दिक्कत वाटत होती; पण आज चरण दिसलें ! आतां आनंद आहे." नंतर बोआजीस जरा एकीकडे बोलावून तो त्यांस हलकेंच म्हणाला, "आपण अगदीं निर्धास्त असा. आठदहा दिवस जसा कामाचा सपाटा चालू आहे तसा कधींच पूर्वी नव्हता. आणखी पुनः या कानाचं त्या कानीं नाहीं. रोज पंचवीस माणूस एकसारखं अहोरात्र खपतं आहे. आणखी त्यांनीं पोखरणीचं काम अगदीं जय्यत चालवलं आहे. आणखी पंधरा दिवस असे मिळाले कीं, आपल्या तपश्चर्येच्या जागीं एक दिवस भुईतून वर निघून आपला आशीर्वाद आणतों. याबद्दल आपण अगदींसुद्धां काळजी करूं नये."

बोआ म्हणाले, "अरे तुझ्या 'पंधरा दिवसांनीं अमुक होईल, तमुक होईल' तें कांहीं उपयोगी नाहीं. आजपासून आठ दिवसांच्या आंत आमच्या मठापर्यंत काम झालें पाहिजे. आतां अफ्झलखानाला मुलाखतीला आणण्यासाठीं त्यांची कडेकोट तयारी चालली आहे. त्याला याच रानांतून प्रतापगडावर नेण्याचा विचार आहे. अर्थात् आतां ते रस्ता करण्याच्या तयारीला लागतील, आणखी त्यांचीं माणसें या रानांत वावरूं लागलीं, म्हणजे मग

तुझें काम कसें चालणार? उलट त्यांच्या नजरेस तुझें सगळें कृत्य येऊन सगळेंच भांडवल बाहेर फुटेल. तर आतां शक्य ती खटपट करून फार त्वरित काम आटप. म्हणजे मी आपली पुढली करामत दाखवितों आणि त्याचें स्वराज्य..."

इतक्यांत एक लमाण त्या मुख्याकडे येऊन कांहीं विचारूं लागला. त्याबरोबर बोआ एकदम त्यास मोठ्या उत्सुकतेनें म्हणाले, "काय म्हणतोस? कोणी घोडेस्वार एकटाच टेहळणी करीत हिंडतो आहे? तो कसली चौकशी करतो आहे? तुमचा नाईक कोठें आहे म्हणून! तो कसा दिसतो? कांहीं माहिती सांगशील कीं नाहीं!" बोआंची ती उत्सुकता पाहून लमाणांच्या नाइकास फार आश्चर्य वाटलें. तो त्यास हलकेंच म्हणाला, "आपण स्वस्थ असा. मी ती सर्व चौकशी करून तसेंच कांहीं असलें तर आपल्याला कळवतों. कदाचित् आपण म्हटलें त्याचप्रमाणें रस्ता कोठून काढावा हें पहाण्यासाठींही तो स्वार आला असेल." त्या दोघांनीं कांहीं तरी विशेष संकेत ठरविल्यावर बोआ आपल्या मठाकडे गेले, आणि नाईक आपल्या लोकांकडे जाण्यास निघाला.

---

## ओळख पटली : : ९

हा स्वार कोण असावा? कां आला असावा? एकदां का आपण खरे लमाण नाहीं अशी शिवाजीस शंका आली तर काय विचारतां! सर्वच ग्रंथ आटोपला. तेव्हां तो टेहळ्या स्वार जर इकडे आला, तर त्याला आपल्या गोटांत सामील करावा, किंवा त्याला फसवून कांहीं विशेष नाहीं असें भासवून द्यावें, असा विचार करीत तो नाईक पुढें चालला. त्या स्वारास पहातांच नम्रतेचें सोंग करून तो त्यास म्हणाला, "कां महाराज बोलावलं?" "अरे, मी शिवाजीमहाराजांकडून आलों आहें; महाराजांना या रानांतून रस्ता काढावयाचा आहे. तुमच्या कालवणाची न् भाकरीची तजवीज आमच्याकडे लागली, पण रात्रंदिवस काम करून रस्ता साफ करून

दिला पाहिजे. विजापूरचं मोठं थोरलं लष्कर या बाजूनं प्रतापगडाला जायचं आहे. पहा, नीट कराल तर तुमची मी शिफारस करीन." इतकें बोलून तो टेहळया घोडेस्वार त्याच्या अगदीं जवळ आला, तेव्हां त्या नाइकाची बरीच चलबिचल झाली. परंतु ती दिसूं न देतां तो म्हणाला, " सरकार, आमची कांहीं ना नाहीं. महाराजांची चाकरी करण्याचा वखत आला, तर तो कोणी तरी जाऊं देईल? माझीं पुष्कळ माणसं हजर आहेत. चार दिवसांत म्हटलं तर चार दिवसांत रान मोकळं करूं." त्या लमाणांच्या नाइकाचा शब्द ऐकतांच कांहीं शंका येऊन तो स्वार त्यास म्हणाला, " यापूर्वीं तुला कुठें तरी पाहिलें आहे असें वाटतें, आणखी तुझा शब्द तर मला अगदीं पक्का आठवतो. पण कोठें आणखी कधीं तो ऐकला, तें कांहींच स्मरत नाहीं. तूंच सांग पाहूं, तूं मला याच्यापूर्वीं कुठें भेटला होतास? ...कां, नाहीं आठवत? मला वाटलें तुला कदाचित् स्मरत असेल. बरें तें असो. महाराजांची सेवा करण्याला तूं तयार आहेस ना?"

"मी तर मनोभावानें तयार आहे हें केव्हांच सांगितलें. माझ्या मनाप्रमाणें माझ्या हातून जर महाराजांची सेवा झाली, तर माझ्यासारखा धन्य कोणीही नाहीं."

"तुम्ही महाराजांच्या सेवेला सिद्ध आहांत हें पाहून फार संतोष वाटतो. ...पण कायरे, त्या चंद्रराव मोऱ्यांची कांहीं हकीकत आहे का माहिती तुला! उगीच या जावळीच्या—त्यांच्या जावळीच्या—रानांत आलों, त्यांची सहज आठवण झाली म्हणून विचारतों. तुम्ही नेहमींचे इकडे येणारे, तुम्हांला माहिती असायची."

"त्याचा झाला निर्वंश न् आतां त्याचं काय पुसतां? आतां त्या चंद्रराव मोऱ्याचं एक चिटपाखरूंसुद्धां नाहीं राहिलं. गेलं सगळं पार रसातळाला मिळून. शिवाजीमहाराजांशीं दुस्मान्गिरी केली त्याचं तळपटच उडायचं."

"कां रे असं कां म्हणतोस? लोक तर म्हणतात कीं, अजून त्याचा एक भाचा आहे, एक भाऊ आहे. एक मुलगी आहे. आणखी..."

"गप्पा हो, त्या निव्वळ गप्पा. मी सांगतों तुम्हांला, कोणी आतां त्याचं

नाहीं राहिलं; मला काय आजची माहिती आहे...बरं तें असो. मग काय ? कांहीं रस्त्याचं काम असलं तर सांगा आम्हांला. नाहीं तर आम्ही आतां दोन दिवसांनीं आपले बैल भरून तळकोंकणांत जाणार. कामगिरी असली तर तयार आहों म्हणून म्हणतों."

"कामगिरी आहे तर.मीं तर पहिल्यानंच तुला सांगितलं,पण कोणीकडून कसं रान तोडीत आणून रस्ता करायचा, तें ठरवायला आणखी कांहीं महाराजांची मंडळी यायची आहेत. तुम्ही आतां इथून जाऊं नका. आम्हांला अगदीं जरूर आहे तुमची."

"जरूर आहे तर आम्ही तयार आहोंत. आम्ही कुठें नाहीं म्हणतों ? पर आम्हांला उगीच नका नादीं लावून ठेवूं म्हणजे झालं; नाहींतर आम्ही आपले जाऊं आपल्या व्यापाऱ्याला."

तो स्वार जाण्याच्या विचारांत दिसला. परंतु त्याचा पाय तेथून लवकर निघेना. त्यानें नाइकास विचारलें, "काय रे ? इथें कोणी बुआ येऊन तप करीत बसला आहे असें म्हणतात, खरं काय ? तो अगदीं निरिच्छ आहे म्हणे. महाराजांनीं नजराणा पाठवला, पण नको म्हणून त्यानं परत पाठवला. त्या बोआचं दर्शन तरी आम्हांला घडवा."

"बोआ ? एक बोआ इथें एका ओढ्याच्या कांठीं आहेत खरे. पण त्यांच्या जवळ जावं कोणी ? त्यांना नको असलं आणखी आपण गेलों तर साफ अंगावर येतात, ठार मारीन म्हणतात, दगड फेंकतात. आमच्यापैकीं एक देखील कोणी तुमच्याबरोबर त्यांची मठी दाखवायला येणार नाहीं. त्याचा काय नेम आहे ! त्यांना एखादे वेळ राग आला, तर खाडकन् शापच द्यायचे."

"अरे, पण दुरून तरी दाखवशील कीं नाहीं आम्हांला त्यांची जागा ? जवळून नको. तूं मठी दाखव आणि आपला परत ये. त्यांचा आमच्यावर राग झाला तर आम्ही तयार आहोंत."

"पण मीं मठी दाखविली म्हणून माझ्यावर नाहीं का राग होणार ?

शाबास महाराज...पण हें काय ! सारं सोडून माझ्याभोंवतीं कां तुम्ही लागलां ? तुम्ही आपले खुशाल हिंडा. तुमच्या नशिबांतच त्यांचें दर्शन असलं तर ते कुठें तरी तुम्हांला आढळतील."

"मला रानाची माहिती नाहीं म्हणून तर तुझी एवढी विनवणी करतों."

"माहिती नाहीं ? आणखी मग महाराजांनीं तुम्हांला कसें पाठवलें ? ज्याला रानाची माहिती नाहीं तो रस्ता काढणार कसा न् करणार काय ? काय राव जें जें बोलताय् तें तें ऐकून आमची थट्टाच करतायसं वाटतं. एकदां तुमची खरी हकीकत काय आहे ती सांगा कीं !"

"अरे" स्वार थोडासा रागावून त्यास म्हणाला, "अरे, तूं सांग बरं आपली खरी हकीकत. बोल तूं तरी खरा लमाण आहेस ? उगीच काय गप्पा मारतोस ? तुझं बिंग बाहेर काढण्याकरितां मी इथें आलों होतों, आतां व्यर्थ लपवालपवी करूं नको."

लमाणांचा नाईक मोठ्यानें हंसून म्हणाला, "वा ! शिलेदारसाहेब, वा! आपण तर खूप केली. मी लमाण नाहीं तर कोण कुठला राजा आहे होय? का ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण आहें ? बोला कीं, कोण आहे तो ? मी लमाणाचें सोंग घेऊन कांहीं तरी कोणाशीं खलबत करतों आहें अशी तुम्हांला शंका आली अन् म्हणून परीक्षा बघायला आलां होय ? अन् ती परीक्षा बघण्याकरितां आलां, तर आतां इथेंच तुमचा मुडदा पाडून गाडून टाकला तर कुणाला समजेल का ?" असें बोलतां बोलतां त्यानें कोणाला कांहीं खूण केली व लमाणी भाषेंतल्या एका गाण्याचें एक कडवें म्हटलें. नंतर एकदां दोनदां मोठ्यानें शीळ घातल्यासारखें केलें. या सर्वांचा अर्थ स्वार उमजला आणि एकदम म्हणाला, "तुळाजीराव, नका त्या त्रासांत पडूं. ज्या कामांत तुम्हीं आहांत त्याच कामांत देह घालविण्याकरितां किंवा सिद्धि मिळविण्याकरितां मी धडपड करितों आहें. तेव्हां माझी आपल्या लोकांकडून गउडी वळवायच्या कशाला भानगडींत पडतां ? आपण दोघे मिळून तिसऱ्याचीच—आपल्या दुष्मानाची—गठडी वळवूं म्हणजे झालें."

एक वेळ ओळख पटल्यानंतर मग काय ? आतांपर्यंत परस्परांत जो दूर-दूरपणा वाटत होता, तो पार नाहींसा झाला. दोघेही तेथून एका बाजूस जाऊन एकमेकांशीं खुल्या अंतःकरणानें बोलत उभे राहिले. " मी आतां आपलें काम करण्यास जातों. जुळल्यास तुमच्याकडे खरोखरीच हें रस्ता साफ करण्याचें काम देतों " असें म्हणून खंडेराव तेथून निघाला.

---

## सावजीनें काय ऐकलें ? : : १०

तुळाजीरावाचा निरोप घेऊन खंडेराव जेथें लमाण लोक काम करीत होते तेथें आला, तों दूर त्यास एक घोडेस्वार दिसला. त्यास पाहतांक्षणींच तो दौडत त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, "सावजी, इकडचा हा सर्व मार्ग फारच दाट झाडीचा आहे; यांतून रस्ता काढायचा म्हणजे चार महिने सुद्धां पुरायचे नाहींत. दुसऱ्या कोणाच्या तरी भागाला जाऊन आपण पाहिलें पाहिजे. आपण रस्ता कोणीकडून करीत यायचें याचा पक्का विचार ठरला म्हणजे या लमाण लोकांचाही आपल्याला फायदा करून घेतां येईल. ' महाराजांचा हुकूम मला होईल, तर मी त्यांची सेवा करायला एका पायावर तयार आहे ' असें त्यांच्या नाइकानें मला सांगितलें आहे. चला, आपण आतां दुसरा कोठें चांगला रस्ता निघण्याजोगा असला तर काढूं ". असें म्हणत म्हणत खंडेराव पुढेंच तडक निघाला. त्याची इच्छा अशी दिसली कीं, सावजीनें त्या लमाणांच्या बाजूला जाऊं नये. पण ' मी या रानांत कितीकदां हिंडलों आहें. मला वाटतें कीं आपण या दुसऱ्या मार्गानें जावें ' असें म्हणून सावजी त्या लमाणांच्या बाजूलाच घोडा दौडत चालला आणि हां हां म्हणतां खंडेरावाच्या दृष्टीच्या पार गेला. जातां जातां एकाएकीं सावजीस कोणीतरी फारच हलकें अगदीं कुजबुजून-एखादी गुप्त मसलत करण्यासाठीं बोलावें त्याप्रमाणें कुजबुजून—बोलतें आहे असें वाटलें. विशेषतः ' मजल ' हा शब्द फार स्पष्टपणें त्याच्या कानावर आला. जवळपास माणूस कोणी नाहीं, आणखी कांहीं तरी बोलतें आहे, असें तर

वाटतें खास. हा चमत्कार आहे काय? त्याच्या मनांत कांहीं विचार आला, त्याबरोबर त्यानें खालीं पडून आपला कान अगदीं जमिनीला लावला व तसाच पुढें चालला तों त्यास कुदळी मारल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्यावरून कोणीतरी जमीन उकरीत चालले आहेत, भुयार करीत आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाली.

ह्या भुयाराचा काय बरें हेतु असावा? अफझलखानाचीं माणसें तर हें सारें करवीत नाहींत ना? महाराजांना कांहींतरी संकटांत आणण्यासाठीं तर हें भुयार नसेल ना? त्यास नीट कल्पना येईना. परंतु यांत कांहींतरी काळेंबेरें आहे असें त्याच्या मनानें घेतलें आणि आपण तें हुडकून काढायचेंच असा त्यानें निर्धार केला. घोडा तसाच टाकून तो सरळपणें त्या आवाजाच्या दिशेनें पुढें पुढें जाऊं लागला. वाटेंत त्याला एके ठिकाणीं बीळ नजरेस पडलें. तें भुयारांत शिरण्याचें द्वारच असलें पाहिजे असें वाटून तो आंत शिरला. आंत जाऊन पाहातांच हें भुयाराचें द्वार नव्हे अशी त्याची खात्री झाली व तो निराश होऊन बाहेर आला. वाटेंत त्याला अशाच प्रकारचीं आणखी चार पांच बिळें अंतराअंतरावर आढळलीं, पण तीं सर्व अगदीं फसवणुकीचीं, त्यांतील एकाच्यांतही कांहीं द्वारबीर दिसेना.

सावजी कोणतेंही काम अर्धवट सोडणारा नव्हता. तो आणखी थोडा पुढें गेला. तेव्हां त्याला एका झाडाखालीं एक खोप दिसली. त्या खोपीजवळ बसून एक माणूस कांहीं कुळंबाऊ गाणें म्हणत होता. तो तेथें बसलेला माणूस फारच विचित्र दिसला. त्याचें तोंड अतिशय भेसूर, डोळे एक काशीस तर एक रामेश्वरास, आणि त्यांत तांबडे लाल ओंठ, वरचा कातरल्यासारखा असून त्यांतून पुढले दांत बाहेर आलेले. ती व्यक्ति पाहण्याबरोबर सावजीस पूर्वकाळच्या रामरावणाच्या युद्धांतील राक्षसांचें स्मरण झालें. वर्ण काळा म्हणजे किती! त्या त्याच्या तकाकीदार काळेपणाला हल्लींच्या छापखान्यांतील शाईचीच उपमा साजेल, दुसरी साजणार नाहीं.

या माणसाला कदाचित् येथें काय चाललें आहे तें विचारलें तर तो सांगेल

अशा समजुतीनें सावजी पुढें जाऊन त्यास उद्देशून म्हणाला, "काय रे, तूं कोण ? एकटा असा इथें रानांत बसून काय करतो आहेस ?" कोणी प्रश्न विचारीत आहे याची त्याला दादच नव्हती. त्याचें भसाड्या, कर्कश आवाजांत भेसूर गायन सुरूंच होतें. मधें मधें तो विचित्र हातवारेहि करूं लागला. सावजीस त्याच्या त्या सर्व कृतींवरून असें वाटलें कीं, हा कोणी तरी वेडा असावा. त्याखेरीज हें असलें विचित्र स्वरूप आणि हें गायन शक्य नाहीं. सावजी असा विचार करीत असतां तो माणूस एकदम तेथून 'हं, हं, हं' करीत उठला, आणि खोपीपासून थोड्या अंतरावर असलेल्या बिळांत जाऊन हातांत एक मोठा थोरला साप घेऊन बाहेर आला व त्याचें तोंड धरून, चाबकासारखा उपयोग करून, त्यानें आपलें वेडेंवांकडें नाचणें व खिदळणें बोकाळणें सुरू केलें. तो मोठा थोरला जहरी साप पाहतांच सावजीस फार आश्चर्य वाटलें आणि त्याला अशी विवंचना लागली कीं, आपणांस आतां या वेड्यापासून पाहिजे ती माहिती कशी मिळणार ? अशा विवंचनेंत असतां एकाएकीं त्याला एक कल्पना सुचली. ज्या ठिकाणीं ही खोप घातली आहे त्या खोपेंत तर भुयाराचें द्वार नसेल ! हा विचार येतांच तो पुढें झाला, आणि त्या खोंपींत डोकें घालून पाहूं लागला, तों विलक्षण कर्कश अशी किंचाळी त्याच्या कानीं पडली. काय आहे तें पहाण्यास तो मागें वळला, तों त्यास त्या धिप्पाड व कुरूप माणसानें मुसंडी मारून पुढें ढकललें. तोंडानें कांहींतरी बोलत होता. तें ऐकून हा विचित्र माणूस कांहीं खरा वेडा नाहीं, हें सावजीस तात्काळ कळून चुकलें.

त्या क्रूर व कुरूप माणसानें सावजीस निःशस्त्र करून व काढणीनें बांधून त्या बिळांत घातलें. सावजीनें बाहेर येण्याची अतोनात धडपड चालविली, शक्तिसर्वस्व खर्च केलें व शेवटीं कसेंबसें एकदांचें त्यानें आपलें शरीर बिळाच्या बाहेर काढलें. तेव्हां त्यास आढळलें कीं, तो भयंकर मनुष्य निश्चेष्ट पडला असून सापानें त्याच्या गळयास घट्ट विळखा घातला आहे; आपल्या हत्यारांपैकीं एक हत्यार शोधून काढून, तें केवळ पायाच्या साहाय्यानें

उपसून व दोन पायांत नीट धरून, त्यानें त्यावर आपल्या काढण्या तोडल्या. एकदां हात मोकळे झाल्यानंतर काय, चटकन् त्यानें आपल्या कट्यारीनें त्या सापाचे तुकडे केले, परंतु सापानें आधींच त्या माणसाचें पुरतें काम केलें होतें !

इतक्या राक्षसी तऱ्हेनें हा विचित्र पुरुष ज्या बिळाचें संरक्षण करीत होता, तें बीळ तरी काय आहे हें पहावें म्हणून तो तिकडे गेला व त्या विवरांत शिरला. असल्या रानांत एवढें भुयार कोणीं व कां केलें याचा त्यास तर्क होईना. परंतु कांहीं केल्या आपला उद्योग सोडायचा नाहीं, येथील सर्व गोष्टींचा पक्का तलास लावायचा, हाच निश्चय त्यानें कायम ठेविला. तो पहिल्यानें उभा होता तेथून पुढें पांच हात ओलसर मातींतून धडपडत गेल्यावर त्याला एक भोंक दिसलें. तेथून चांगला वारा येत होता. भुयारांत येणाऱ्यांनीं आंत गुदमरलें जाऊं नये म्हणूनच हें भोंक ठेविलें आहे याबद्दल त्याला शंका राहिली नाहीं. सावजी त्या भोंकांत शिरला, आणि मोठ्या कष्टानें त्यांतून बाहेर पडून तो वर येऊन उभा राहिला.

आतां अगदीं रात्र झाली होती. उजाडेपर्यंत तेथेंच बसून राहण्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें सावजीला वाटूं लागलें. थोड्या वेळानें दूर एका ठिकाणीं त्याला उजेड दिसला, त्याबरोबर त्यानें उजेडाच्या दिशेनें पाय वळविले, व तो लवकरच त्या ठिकाणीं जाऊन पोंचला. तेथें त्याला एक गोसावी व एक तरुण मुलगा असे दोघेच बसलेले दिसले. सावजीनें पुढें जाऊन गोसावीबोआंस नमस्कार केला, परंतु त्यास आशीर्वाद वगैरे कांहीं सुद्धां न देतां बोआ एकदम त्याच्या अंगावर उसळून म्हणाले, "आम्ही सगळें जग सोडून या भयंकर अरण्यांत येऊन बसलों तरी सुद्धां आमच्या पाठीमागें तुम्ही येतां, याला काय म्हणावें ? क्षणभर सुद्धां तूं येथें उभा राहूं नकोस. आल्या वाटेनें परत जा." हा गोसावी ज्यानें अगदीं शांतपणें आपल्यास या बसा म्हणावें, तो अशा तुसडेपणानें वागून आपल्यास अशा थंडीच्या वेळीं शेकोटीपासून घालवितो, याचें सावजीस फार नवल वाटलें. तरी पण

तो तसाच पुढें होऊन शेकोटीजवळ घुसला, तोंच त्या घुमीजवळील एका भगदाडांतून पांचसहा लोक हातांत हिलाल घेऊन बाहेर पडले, आणि ते बोआंच्या पुढें येऊन म्हणाले, “झाली, आपली सर्व तयारी झाली ! आतां फक्त दारूगोळा भरून ठेवण्याचा काय तो अवकाश.” ते शब्द कानीं पडतांच सावजी चपापला, व चकित दृष्टीनें त्यांचेकडे पाहूं लागला.

---

## हा काय चमत्कार ? : : ११

आणखी कांहीं ते बोलणार इतक्यांत गोसावीबोआंनीं त्यांस दाबलें. ते म्हणाले, “ आधीं कोण हा लुच्चा येथें आहे, त्याला घालवून द्या. मग आपल्याला पुढें काय करायचें अगर बोलायचें तें पाहतां येईल.” गोसावीबोआंच्या तोंडांतून हे शब्द बाहेर पडतांच, त्यांच्यापैकीं एक पुढें होऊन म्हणाला, “ तूं कोण, इकडे कां आलास ? बोल, तूं कोणाचा बातमीदार आहेस, विजापूरच्या अफझलखानाचा कीं त्या डोंगरांतील आपमतलबी, खुनशी दुष्ट शिवाजीचा ? ” बालशिष्याहि मध्येंच आवेशानें बोलूं लागला. “ आमचा दुष्मन जो शिवाजी......”

“ काय ! तुमचा दुष्मन शिवाजीमहाराज ! काय, तुम्ही हें बोलतां तरी काय ? त्या पुण्यपुरुषास दुष्मन समजणारे तुम्ही आहांत तरी कोण ? ”

“बस्स, एवढ्या तुझ्या बोलण्यावरूनच आमची खात्री झाली. तूं त्याचा नोकर आहेस, त्याच्याकडून आमच्यावर पाळत ठेवण्यासाठीं आला आहेस. आतां तूं आमच्या तावडींतून कसचा सुटणार ? तुझीं शंभर वर्षें भरलीं म्हणून समज ! ” तो बालगोसावी संतापाचा झटका येऊन आपल्या लोकां-कडे वळून जोरानें म्हणाला, “ पाहतां काय, पकडा त्याला, बांधा त्याच्या मुसक्या. त्यानें आमचें भुयार पाहिलें आहे व तुमच्या तोंडचें ‘ दारूगोळा ’ हे शब्द ऐकले आहेत. त्याला आमचा बेत समजला आहे. या भुयाराच्या तोंडावरील माती काढून चांगला पुरुषभर खोल खड्डा खणा आणि त्यांत त्याला जिवंत गाडून टाका. ”

क्र. ५६३३

सावजीला आतां आपण जिवंत पुरले जाणार याबद्दल मुळींच शंका नव्हती. त्याची पक्की खात्री झाली कीं हा गोसावी व त्याचा बालशिष्य हे कांहीं खरे तपस्वी नव्हत. परंतु महाराजांस पक्का दुष्मन समजून त्यांचा घात करण्याची इतकी कडेकोट तयारी करणारे हे लोक कोण असावेत हें त्याला कांहींच समजेना. तो स्वामिनिष्ठ, धाडसी वीर स्वतःच्या प्राणावरचें भयंकर संकट विसरून गेला. आपल्या धन्यावरची विलक्षण आपत्ति कशी दूर होईल यानेंच त्याचें अंतःकरण व्यथित झालें. परंतु असल्या संकटप्रसंगीं सुद्धां त्याला एका विचारानें, एका श्रद्धेनें समाधान प्राप्त झालें. त्याची अशी श्रद्धा होती कीं, महाराजांवर भवानीची कृपादृष्टि आहे. ते निःसंशय संकटांतून पार पडणार. त्याला असाहि विश्वास उत्पन्न झाला कीं, ज्याअर्थीं भवानी मातेनें मला यावेळीं येथें आणलें आहे, त्याअर्थीं महाराजांची सुटका माझ्याच हातून होणार.

इकडे बोआंच्या आज्ञेप्रमाणें त्या लोकांनीं खड्डा खणून तयार केला, व त्यांत सावजीला त्यांनीं अत्यंत क्रूरपणें ढकललें, व ते वर माती लोटून देऊं लागले. आंत सावजीची सारखी धडपड चाललीच होती. ती ऐकून बाहेर तो बालशिष्य खदखदां हंसत होता ! थोड्या वेळानें वरचा कडा ढांसळला, व सावजीची हालचाल थांबली. सर्वांना तो मेला—जमीनदोस्त झाला—असें वाटलें. बालशिष्याला फार आनंद होऊन तो म्हणाला, “ धरणीमातेला आज चांगला बळी मिळाला. आपण आतां पुढच्या तयारीला लागूं. माझ्या बाबांचा खून करणाऱ्या ...” हे शब्द बोलतां बोलतां संतापानें त्याचें मस्तक हलक होऊन तो बेशुद्ध होऊन खालीं पडला. तो अशा अस्ताव्यस्त स्थितींत कोणाच्या नजरेस पडूं नये म्हणून बोआजींनीं त्याला खोपींत नेऊन ठेवलें; कांहीं वेळानें बोआजींच्या प्रयत्नानें तो शुद्धीवर आला. त्याला बोआजी म्हणाले, “ बेटा ! एखादे दिवशीं संतापाच्या भरांत, तूं आपल्या सगळ्या बेताचा स्फोट करशील. मला तुझें मोठें भय वाटतें. तूं स्वस्थ एके ठिकाणीं बस. तुझ्या इच्छेप्रमाणें मी सगळ्या गोष्टी घडवून आणतों.” बोआंनीं

आपल्या भुयार खणलेल्या लोकांची फार प्रशंसा केली, व धुमींतून मूस काढून त्यांतील सोनें त्यांनीं केलेल्या कामाबद्दल बक्षीसहि दिलें. ते म्हणाले, "आपला सर्व बेत जर सिद्धीस गेला तर तुम्हांला याच्या चौपट बक्षीस देईन. चला, आतां एकवार तुम्ही मला त्या भुयारांतून घेऊन चला." बोआजी व इतर मंडळी भुयारांत शिरली; थोड्याच वेळांत ते भुयारांतून बाहेर पडले. दुसऱ्या तोंडास येण्याबरोबर मात्र कांहीं चमत्कारिकच प्रकार त्यांच्या नजरेस पडला. तेथें तो भयंकर विद्रूप माणूस मरून पडलेला होता. तुळाजीरावहि तेथें येऊन हा एकंदर काय प्रकार आहे याची चौकशी करीत होता. सर्वांना भोल्याचा मृत्यु म्हणजे एक गूढच वाटलें. शेवटीं त्याच्या संवयीच्या सापानेंच एके दिवशीं चिडून त्याचा प्राण घेतला असावा, असा सर्वांनीं कयास बांधला. परंतु तो साप कोठें आहे ? शोधाअंतीं त्यांस त्याचीं शकलें मात्र दिसलीं.

भोल्या जर साप चावून मेला तर अर्थातच दुसऱ्या कोणींतरी सापाचीं शकलें केलीं असलीं पाहिजेत, हें अगदीं उघड होतें. हा दुसरा कोण असावा, व त्यानें येथें येऊन सापाला मारण्याचें काय प्रयोजन असावें ! अनेकांनीं अनेक तर्क केले. बोआंना एकदां वाटलें, 'जो मनुष्य धुनीपासून खोपीच्या बाजूला कांहीं अंतरावर उभा राहिला होता त्यानेंच सापास मारलें असावें. तो तर जमिनींत गाडला गेला !' या विचारानें बोआंस समाधान वाटलें. पण दुसराहि एक विचार त्यांच्या मनांत आल्यामुळें त्यांना काळजी वाटूं लागली. कदाचित् दुसऱ्याच कोणातरी मनुष्यानें सापाला मारलें असेल; व जर तो भुयाराची माहिती मिळवून पळूनहि गेला असेल तर आपलें सगळें कारस्थान बाहेर पडल्याखेरीज राहणार नाहीं. तेव्हां खरेंच आपलें कारस्थान फुटलें कीं काय याचा तपास करावा, असें त्यास वाटलें. 'या माझ्या तपस्व्याच्या वेषांत जर मी शिवाजीच्या दरबारीं गेलों तर माझा मानमरातब चांगला राहून मला जी काय पाहिजे ती चौकशी करण्यास सोपें जाईल' असें म्हणून, तुळाजीरावांशीं कांहीं एकांत करून, बोआजी मोठ्या निश्चयानें तेथून तडक चालते झाले.

---

## सावजीच्या शोधार्थ : : १२

सावजी हा शिवाजीमहाराजांचा एकनिष्ठ सेवक. तो अत्यंत शूर व धाडसी. 'स्वामिकार्य यशस्वी तरी करून दाखवीन, नाहींतर त्या कामीं प्राण तरी वेंचीन,' असा त्याचा बाणा होता. त्यामुळें महाराजांचा त्याच्यावर पूर्ण भरंवसा होता. कोणतेंही जबाबदारीचें काम ते त्याजवर बिनधोक सोंपवीत. त्यांनीं सावजीस कांहीं गुप्त गोष्टी सांगून जावळीच्या रानांतून रस्ता कसा,व कोणीकडून काढावा याबद्दल शोध करण्यास पाठविलें होतें.त्याच्याबरोबर खंडेरावास त्या रानाचा चांगला माहितगार म्हणून दिला होता. त्या उभयतांना जाऊन चार दिवस झाले, तरी त्यांचा पत्ता नाहीं. यामुळें महाराज फार चिंतातुर झाले. ते कांहींतरी संकटांत सांपडले असावेत अशी त्यांना शंका आली. आपल्या सेवकांस कांहींतरी दगा आहे असें मनांत आल्यावर त्यांच्या साहाय्यार्थ आपण स्वतः धांवून जावयाचें, हें महाराजांचें ब्रीद असे. त्यास अनुसरून त्यांनीं तात्काळ त्यांच्या शोधार्थ जाण्याची तयारी केली.घोड्यावर स्वार होऊन, बरोबर तीन मराठे वीर घेऊन महाराज गडावरून खालीं उतरूं लागले. उतरतांना वाटेंतच त्यांना खंडेराव भेटला. त्यास एकटाच पाहून महाराज एकदम म्हणाले, "खंडेराव, तुझ्या-बरोबरचा आमचा सावजी कोठें आहे? तुम्ही रस्ता पाहण्याला गेलां होतां, त्याचें काय झालें? त्याला सोडून तूं एकटाच कसा निघून आलास?" खंडेरावानें हे सर्व प्रश्न ऐकून आपला चेहरा रडवा केला, व म्हटलें, "वाघाच्या तडाख्यांतून मी वांचलों आणि सावजीचा दुपेटा तेवढा मला सांपडला. त्यास मदत करण्याकरितां माझ्याकडून मीं शिकस्त केली. परंतु कांहीं उपयोग झाला माहीं." खंडेराव हें सर्व सांगत असतां त्याच्या खरेपणाबद्दल संशय येऊन महाराज आपल्या तीक्ष्ण नजरेनें एकसारखे त्याजकडे पाहात होते. खरोखरीच महाराजांच्या नजरेनें खंडेराव थोडासा नरमला. ते म्हणाले, "खंडेराव, तू या रानांतला माहितगार म्हणून तुला सावजीबरोबर दिला, आणि हीच का सावधगिरी तूं ठेवलीस? त्या

वाघाला मारून तरी आणायचा, नाहीं तर सावजीच्या बरोबर आपणहि बळी पडायचें. कामगिरीवर पाठविलेला इसम अशा प्रकारानें काळें तोंड घेऊन येणारा तूंच पाहिला. बोल, कोणच्या ठिकाणीं सावजीस मारून आलास ?" महाराजांचें हें रागाचें भाषण ऐकून खंडेराव थोडासा दचकलाहि, परंतु तो कसला वस्ताद ! तो अशा प्रसंगीं दाद देणारा नव्हता. त्यानें एखाद्या वृथा आरोपानें अन्यायाची शिक्षा झालेल्या निरपराधी मनुष्याचें सोंग आणलें, जसा 'आलिया भोगासी' नाइलाज म्हणून सादर होतों, त्याचप्रमाणें त्यानें चेहरा केला. तें पाहून महाराजांस अधिकच शंका आली. परंतु ते आपला राग आवरून अगदीं सौम्यपणानें म्हणाले, "अरे, तूं कांहीं त्याला वांचविण्याचा प्रयत्न केला नसशील, किंवा बळेंच त्याला वाघाच्या जाळीपुढें नेलास असें माझें म्हणणें नाहीं...बरें, तें कांहीं असो. चल. जें झालें तें झालें. ज्या ठिकाणीं त्याला वाघानें उडी मारून पकडलें तेथें नेमकें आम्हांला घेऊन चल."

खंडेरावास स्पष्टच दिसलें कीं आतां जास्त बोलण्याची वेळच नव्हे, मुकाट्यानें त्यानें तोंड फिरविलें आणि तो एक एक पाऊल उतरूं लागला. खंडेराव नवीनच महाराजांचे नोकरीस राहिला होता. महाराजांच्या मनांत त्याच्याबद्दल संशय होताच आणि त्याची ती बोलण्याचालण्याची चल-बिचल व कावरीबावरी मुद्रा पाहून महाराजांची खात्री झाली कीं ह्यांत कांहींतरी लबाडी आहे, सावजी कांहीं वाघाच्या तडाख्यांत सांपडून मेला नाहीं. मग त्याचें काय बरें झालें असेल ? खंडेरावाचा आपल्याकडे येण्यांत काय गुप्त हेतु असावा ? गोडीगुलाबीनेंच त्याच्याकडून सर्व माहिती काढून घेतली पाहिजे. असा विचार करीत करीत ते मंडळीसह सपाटीवर येऊन पोंचले. तेथें त्यांना समोरच एक गोसावी दृष्टीस पडला.

साधुसंत, बैरागी वगैरे पाहिले म्हणजे शिवाजीमहाराजांस फार आनंद होत असे या वैराग्यशाली पुरुषांच्या अस्तित्वामुळेंच एकंदर सृष्टि चालली आहे, त्यांच्या निरपेक्ष परमेश्वरभक्तीमुळें जगांत पापाचें वर्चस्व रहात नाहीं

अशी त्यांची समजूत होती. जसा ज्याचा अनुभव असतो, तशी त्याची श्रद्धा असते. महाराजांचे काळीं महाराष्ट्रांत दोन फारच थोर साधुपुरुष होऊन गेले. त्यांच्या वैराग्याचें वर्णन करावें तेवढें थोडें. रामदासस्वामींच्या चरणीं सर्व राज्य घातलें असतां त्यांनीं आपणांस सुतळीचा तोडाहि त्यांतून ठेविला नाहीं, आणि तुकारामबोआंच्या पुढें हिऱ्यामाणकांचीं ताटें ठेविलीं असतां त्यांनीं तीं आपल्याला मातीसमान आहेत म्हणून सुचविलें. असा एकंदर साधुपुरुषांचा अनुभव असल्यामुळें कोणी कसाहि बैरागी किंवा संन्यासी आला तरी त्याचा मनःपूर्वक आदरसत्कार केल्याशिवाय महाराज रहात नसत. अर्थातच याहि वेळीं त्यांनीं त्या बैराग्यास पाहतांच घोड्यावरून खालीं उतरून त्याचें पादवंदन केलें. त्यानेंहि त्यांस आशीर्वाद दिला. नंतर महाराजांनीं "बोआसाहेब, आपली काय इच्छा आहे? मी या वेळीं कांहीं कामगिरीवर चाललों आहें. आपल्या इच्छेप्रमाणें आपली सर्व तजवीज करण्याची व्यवस्था लावून आपली आज्ञा घेतों. माझ्या एका इसमाबरोबर आपण गडावर जावें, तेथें मातुःश्री आपली सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें करतील," अशी बोआंची प्रार्थना केली. बोआ म्हणाले, "राजा, आम्हांला तुझ्या गडावर जाऊन पाहुणचार घेण्याची अपेक्षा नाहीं. या तुझ्या रानांत आज महिनाभर एक महावैराग्यशील साधुपुरुष येऊन राहिले आहेत. ते आतां येथून जाणार. त्यांची इच्छा आहे कीं तुला भेटावें. आज माझ्याबरोबर येत असलास तर त्यांची भेट होईल." "आम्ही त्या रानांत जाण्यासाठीं निघालों आहोंत. परंतु स्वामी तेथें आल्याचें कोणी आम्हांला येऊन सांगितलें नाहीं. उलट आमचा एक इसम रानांत नाहींसा झाला आहे. त्याच्यावर वाघानें झडप घालून फाडलें असें समजलें. त्याच्याबरोबर असलेल्या आमच्या एका इसमानेंच हें सांगितलें. तेव्हां त्याच्या शोधाकरितां आम्ही चाललों आहों. त्यांत आतां आपण ही बातमी येऊन सांगितली, तर आम्ही अवश्य येतों. साधुपुरुषांच्या दर्शनाला येण्याला नाहीं कोण म्हणेल? आमच्या त्या माणसाचाहि तपास लागला तर महाराजांच्या कृपेनें लागेल."

या बोलण्यानें आपणास समाधान झालें आहे असें दाखवून तो गोसावी म्हणाला, " शाबास, राजा तुझी कीर्ति ऐकली तसा तूं साधुसंतांचा परामर्ष घेणारा दिसतोस खरा. पण या रानांत बोवा येऊन राहिले आहेत हें न कळल्यामुळेंच जर तूं त्यांच्या दर्शनास आला नाहींस तर त्यांत तुझा काय दोष ? बाकी आम्ही इतके दिवस येथें असून तुम्हांला कळूं नये हें आश्चर्य नाहीं का ? अशाच तऱ्हेनं आपली मंडळी चौकशी ठेविते कीं काय ? "

महाराज यावर कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं बोआंस, " माझ्या एका माणसास मीं पायीं चालावयास सांगतों. आपण घोड्यावर बसून मजबरोबर चलावें, " असें मात्र विनविलें.

सावजीचा तपास लावावा म्हणून महाराज फार उत्कंठित होते. परंतु गोसावीबोआंस मात्र इतक्या जलद्रीनें तेथून निघणें इष्ट वाटत नव्हतें असें दिसलें. त्यांनीं आपल्या महंतांचें वय किती अल्प आहे, त्यांना कोण-कोणत्या विद्या अवगत आहेत, त्यांनीं काय काय अद्भुत चमत्कार केले आहेत, वगैरे रसभरित वर्णन केलें. महाराजांची तेथून निघण्याची चुळबुळ सुरू झाली, तेव्हां बोवा म्हणाले, 'राजा, मीं आतांच दमूनभागून आलों आहें. जरा आपण विश्रांति घेऊं. माझ्या फलाहाराची व्यवस्था कर. माझा अंतरात्मा संतुष्ट होऊं दे. मग येथून निघूं. अरे, तुला एवढी घाई कसली ? माझ्या आशीर्वादानें तुझा माणूस तुला खात्रीनें भेटेल. मुळीं चिंता करूं नको. हें पहा, राजा तुला आणखी एक गोष्ट सांगतों. आमच्या महंतांच्या अनुग्रहानें तुझ्या चित्तांत सध्यां असलेली काळजी दूर होईल. तुला पकड-ण्याला म्हणून आलेला अफझलखान तुझ्या केंसालाहि धक्का लावूं शकणार नाहीं. तुझाच विजय होणार. महंतांच्या कृपाप्रसादानें सर्व कार्यांत तुला सिद्धि मिळणार यांत संदेह नाहीं. श्रद्धा मात्र ठेव. " असें बोलून बोआ महाराजांच्या घोड्यापुढें आडवें येऊन उभे राहिले.

महाराजांचा नाइलाज झाला. ते खंडेरावाकडे पाहून म्हणाले, " बोआंचा

इतका आग्रह आहे, तर मी थोडा मागून येतों. वाघाच्या मुखांत सावजीला सोडून आलास ही अतिशय नामर्दपणाची गोष्ट केलीस. आतां त्याचें प्रेत कोठें असेल—निदान त्याच्या अस्थि कोठें पडल्या असतील तेथें जाऊन शोध करून मला सांगायला ये. मी थोड्या वेळांत तुझ्या मागोमाग येतोंच. बरोबर आणखी कोणाला तरी घेऊन जा."

"कशाला? मी एकटा पुढें जाऊन सगळा तपास करतों," असें बोलून खंडेराव मोठ्या आतुरतेनें—महाराज आणखी कांहीं सांगतात, बोलतात कीं काय, याची मुळींच वाट न पाहतां—पुढेंच निघाला. आपली युक्ति साधली म्हणून बोआंस समाधान वाटलें.

## जाधवरावाची पत्नी : : १३

जाधवरावाची पत्नी या अज्ञात व भयाण अशा भुयारांतून आपला मार्ग आक्रमीत होती. अंधारांतून धडपडत चाचपडत चालल्यानें ती अगदीं थकून गेली. तिला अतोनात कष्ट झाले. आतां आपण या भुयारांतून बाहेर पडत नाहीं, धड इकडे नाहीं धड तिकडेहि नाहीं, मध्येंच कोठेंतरी पडून आपण उपासमारानें व कोंडमारा होऊन मरणार असें तिला वाटूं लागलें. अगदीं हताश होऊन, "आई भवानी, आतां तुझ्या मनांत काय असेल तें कर," असें म्हणून ती खालीं अंग टाकणार तोंच तिच्या अंगावर कोठून तरी गार वाऱ्याची झुळूक आली. त्यायोगानें तिला फार आनंद झाला. उत्साह आला, आणखी थोडा नेट धरून निश्चय करून ती पुढें चालली, तिच्या निश्चयाच्या बळाला खरोखरच चांगलें फळ प्राप्त झालें. लवकरच ती भुयाराच्या दुसऱ्या तोंडांतून बाहेर पडली. अद्यापि स्पष्ट दिसूं लागलें नव्हतें. म्हणून ती भुयाराच्या तोंडाशींच बसून राहिली. जेव्हां अगदीं फटफटीत उजाडलें तेव्हां ती उठली, व वाट चालूं लागली. परंतु आदल्या दिवशीं तिला अन्न न मिळाल्यामुळें तिच्या पोटांत भुकेनें कालवल्यासारखें झालें. कोठें तरी आतां पाणी पाहून कांहीं फळें किंवा कंद सांपडले तर खावे असा विचार करून ती पुढें निघाली. कांहीं वेळानें ती लहानशा तळ्याजवळ

आली. तें लहानसें तळें इतकें सुंदर होतें कीं, ती वीरपत्नी त्याच्या दर्शनानें आपलें दुःख क्षणमात्र विसरली. त्यांतील स्वच्छ आणि थंडगार पाणी ओंजळींत घेऊन तिनें आपल्या त्या सुंदर परंतु म्लान व उद्विग्न मुखाला लावण्याबरोबर तिला किती तरी आल्हाद झाला! तळ्यांत जाऊन तिनें मनसोक्त स्नानहि केलें. त्यामुळें तिच्या मनाला फार समाधान वाटलें. पण पोटांत क्षुधा लागलेली. अशा स्थितींत नुसत्या त्या पाण्यानें काय होणार? खायला नाहीं, तें मिळण्यासाठीं आपण आतां जाणार तरी कोठें? सगळीकडे तिनें पाहिलें तरी कोठें मळलेली पायवाट दिसेना. तेव्हां तेथून कोणच्या दिशेला म्हणून जावें? तिला कांहींच सुचेना. कोठेंहि रस्ता दिसेना. अर्थात् जिकडे वाट फुटेल तिकडे ती चालली, परंतु तिचें शरीर निःशक्ततेनें अत्यंत जड झाल्यानें पावलापुढें पाऊल टाकण्याची सुद्धां तिला पंचाईत पडूं लागली. ऊन तर क्षणोक्षणीं वाढत चाललें. त्यापासून तिला अतोनात ताप होऊं लागला. त्यामुळें ती बिचारी भोंवळ येऊन खालीं पडली, आणि बेशुद्ध झाली.

ती त्या ठिकाणीं तशी बेशुद्ध होऊन पडल्यानंतर सुमारें अर्धा तास झाला असेल नसेल तोंच एक वाटसरू तेथें आला. हा वाटसरू दिसण्यांत एखाद्या शिपाईगड्याप्रमाणें दिसत होता. हातांत एक जबर लांब भाला आणि कमरेला तरवार. शिपाई अगदीं तरुण सुमारें वीस वर्षांचा, वर्ण काळा परंतु फार तेजस्वी, आणि डोळे विशाल, काळेभोर व फारच पाणीदार होते. अशा भयंकर अरण्यांत अशी तरुण सुंदर स्त्री बेशुद्ध होऊन पडलेली पाहतांक्षणींच तो चपापला. परंतु तिची ती कठीण अवस्था पाहून त्यानें क्षणाचाहि विलंब न करतां तळ्याकडे धाव मारून आपला दुपेटा भिजवून आणला. तो तिच्या तोंडावर पिळला; हातांत पाणी घेऊन तिच्या डोळ्यांस लाविलें आणि तो ओला पिळा तिच्या डोक्यावर ठेविला. कांहीं वेळानें ती शुद्धीवर येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तिनें एकदां डोळे उघडले, व गरगर फिरविले, व कांहीं पुटपुटली. त्या शिपायास वाटलें कीं, आणखी एकदां

तोंडावर पाणी मारल्यास ती चांगली शुद्धीवर येईल. म्हणून तिच्याजवळ जाऊन तो तिच्या मस्तकावर ठेवलेला दुपेटा उचलूं लागला तों तिनें पुनः आपले डोळे उघडले. आणि आपल्या डोक्याजवळ कोण हा उभा आहे, असें मनांत येऊन एकदम ती तडफडीनें उठून बसली, आणि म्हणाली,

"कोण ! तुम्ही कोण ? माझ्या अंगा..." परंतु पुढें तिच्या तोंडून शब्द निघेना इतकी तिला ग्लानी आली. तिच्या विचारण्याचा आशय लक्षांत येऊन तो एकदम तिला म्हणाला, " ताई, मी आपल्या अंगाला स्पर्श केला याबद्दल आपण रागाऊं नका. आपण माझ्या धर्मभगिनी, मी आपला धर्मबंधु, असा मनाचा निर्धार करूनच मी आपल्याला शुद्धीवर आणण्यासाठीं पुढें झालों. जर वाट चुकून इकडे आलों नसतों, तर आज आपण एखाद्या हिंस्र पशूच्या तोंडीं पडलां असतां किंवा योग्य उपाय न झाल्यानें केव्हांच आपले प्राण निघून गेले असते. असें होऊं नये म्हणून मी आपला दुपेटा भिजवून आपल्याला शुद्धीवर आणण्यासाठीं यत्न केला, त्यांत मला यश आलें म्हणून मला किती तरी आनंद होतो आहे !"

याप्रमाणें बोलून तो मराठा शिपाई तिच्या समोर मोठ्या अदबीनें उभा राहिला. तिनें एकवार सूक्ष्म दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें. आणि ती म्हणाली, " मला हवें होतें तें मिळत असतां त्याला आपण अडथळा केला, तेव्हां आपले उपकार झाले असें कसें म्हणूं ? आपण केलें हें आपल्या दृष्टीनें ठीक, माझ्या दृष्टीनें अगदीं अनिष्ट. मी खरोखर मृत्यूची वाट पहाण्यासाठीं अशी पडलें होतें. आपण मला शुद्धीवर आणून कोठें नेणार ? काय करणार ? मला कांहीं म्हटल्या कांहीं सुद्धां इच्छा नाहीं. मी आतां याच रानांत एक पर्णकुटी करून राहीन. मला आतां संसार नाहीं, कोणाचाहि पाश नाहीं. मी येथेंच परमेश्वराचें ध्यान करीत बसतें."

तो शिपाई तिचें भाषण ऐकून म्हणाला, " ताई, मला आपला धर्मबंधु माना, आणि आपण या रानांत कशा आलां ही सर्व हकीकत अगदीं मन मोकळें करून सांगा. आपल्यावरचें एखादें संकट माझ्या हातून दूर होण्या-

जोगें असेल तर तें मी मोठ्या आनंदानें दूर करीन."

तें ऐकून ती बराच वेळ स्तब्ध बसली. शेवटीं, ती निश्चयपूर्ण व गंभीर वाणीनें म्हणाली, "माझी पूर्वीची हकीकत ऐकून आपल्याला काय कर्तव्य आहे? माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रिया या जगांत काय थोड्या आहेत? आपण त्या सगळ्यांचीं संकटें थोडींच दूर करूं शकणार आहां? आपण माझी दुःखाची कहाणी ऐकून आपल्या मनाला कां उगीच वाईट वाटून घेतां? मला आतां येथेंच पर्णकुटी करून राहूं द्या. मला जगांत माझें असें कोणीं राहिलें नाहीं. अशा अभागिनीला धर्म-भगिनी म्हणून, ती परमेश्वराच्या सेवेला सिद्ध असतां, मागें कां ओढतां? आपण मात्र आपलें नांवगांव मला सांगून ठेवून खुशाल मराठा वीरांना शोभतील अशीं कृत्यें करण्याला जा. आपल्याला त्या कार्यांत यश येण्याकरितां मी परमेश्वराची प्रार्थना करीन."

आपण आतां कितीहि आग्रह केला, तरी कांहीं उपयोग होणार नाहीं, असें त्याला स्पष्ट दिसलें; परंतु अशा सुंदर व तरुण स्त्रीला अशा भयंकर रानांत एकटें सोडून जाणें त्यास रास्त वाटेना. म्हणून पुनः एकदां त्यानें त्या स्त्रीला आग्रहाची विनंति केली: "ताई, वाटल्यास आपण येथेंच पर्ण-कुटी करून रहा. पण आपली पूर्वीची हकीकत सांगा. संकोच धरूं नका. मी आपला धर्मबंधु आहे, न जाणों, आपल्या जिव्हाळ्याचे कोणी मला भेटलें तर त्याला आपण अमुक ठिकाणीं आहां, एवढें तरी सांगायला सांप-डेल. आपल्यावर काय संकट आलें तें सांगाच. नाहीं म्हणूं नका." तो कांहीं केल्या आपला आग्रह सोडीत नाहीं हें पाहून, अखेरीस तिनें आपली सगळी हकीकत—त्या गांवांतून भुयारांतून बाहेर निघून त्या ठिकाणीं येऊन बेशुद्ध पडल्यापर्यंतची हकीकत—त्याला सांगितली.

ती सगळी हकीकत ऐकून त्या मराठा शिपायास विलक्षण अचंबा वाटला आणि तिच्याकडे तो अत्यंत आदरयुक्त दृष्टीनें पाहूं लागला. नंतर तो नम्रपणानें हात जोडून तिला म्हणाला, "बाई, मी शिवाजीमहाराजांचा एक दास आहे. कोठेंहि स्त्री, गाय किंवा ब्राह्मण हीं संकटांत पाहिलीं तर

त्यांच्या संरक्षणाकरितां आपला प्राण जाईपर्यंत झटावें अशी त्यांची आम्हांला सक्त ताकीद आहे. तेव्हां मला तुम्हांला एकटीला टाकून येथून कांहीं जातां येत नाहीं. येथून महाराजांचें हल्लींचें मुक्कामाचें ठिकाण कांहीं फार लांब नाहीं. तीन दिवसांच्या वाटेवर आहे. आपण माझ्याबरोबर चला. मी आपल्याला महाराजांपर्यंत नेऊन पोंचवितों. तेथें आईसाहेब आहेत, त्या तुम्हांला आपल्या कन्येप्रमाणें पाळतील. कदाचित् तेथें गेल्यावर देवदयेनें आपल्या पतीची गांठहि पडेल."

आपण इतकें बोललों तरी ही आपल्याला प्रत्युत्तर कांहींच देत नाहीं, हें पाहून तो पुनः तिला म्हणाला, "बाई, तुम्हांला माझी धर्माची बहीण, नव्हे माझ्या धर्ममाता समजतों. आपण आतां माझ्याबरोबर येण्याला कां संकोच करतां ? या रानांत आपण एकट्या कशा राहणार ? आपण शूर आहांत खऱ्या, वीराच्या पत्नी आहांत, परंतु एकट्या एखाद्या संकटांत सांपडलांत तर कसें होईल ? बैरागीण होऊन राहणार असें म्हणतां, पण तें तरी कसें शक्य ? आपल्या हकीकतीवरूनच स्पष्ट दिसतें कीं, आपल्याला आजपर्यंत अशा कष्टांची मुळींच संवय नाहीं. शिवाय, असें पहा, तुम्ही विजापुरांतून ज्या हेतूनें बाहेर पडलां तो हेतु तिथें दरबारांत कळून तुम्हांला पकडून परत नेण्यासाठीं जर कोणी सरदार पाठविला असला आणखी त्याच्या हातांत आपण सांपडलां तर काय होईल, याचाहि विचार करा. माझ्यासारखा मनुष्य बरोबर असला म्हणजे आपल्याला मुळींच भय नाहीं. निदान तुमच्याकारितां मी आपला जीव तरी खचित धोक्यांत घालीन. याहून आतां मी जास्त काय सांगूं...?

या त्याच्या अत्यंत आदराच्या व कळकळीच्या भाषणाचा तिच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तिनें त्याच्याबरोबर महाराजांकडे जाण्याचें कबूल केलें. नंतर ती फार भुकेली आहे हें पाहून तो एका गर्द छायेच्या राईंत गेला, व तेथून त्यानें दोनतीन कंद आणले. त्यानें ते स्वतः भाजून तिला खावयास दिले. तिनें देवाचें नांव घेऊन त्या कंदाचे तुकडे

खाल्ले आणि वर थोडेसें पाणी प्याली. खरोखरीच त्या कंदाचा काय गुण असेल तो असो, तिला एकदम चांगली हुशारी वाटूं लागली व तिची चित्तवृत्ति उल्हसित झाली. कांहीं वेळानें अंगांत तकवा आल्यावर तीं दोघे शिवाजीमहाराजांकडे जाण्यास निघालीं.

---

## शिष्यीण झाली : : १४

मजल दरमजल करीत तीं दोघें सूर्यास्ताचे वेळीं त्या जावळीच्या रानांत जेथें तो बालगोसावी होता तेथें आलीं. बालगोसावी एकटाच विचारमग्न होऊन इकडून तिकडे फेऱ्या घालीत होता. त्याच्यापुढें हीं दोन मंडळी दत्त म्हणून उभीं राहतांच प्रथम तो दचकला; नंतर साशंक मुद्रेनें त्यांच्याकडे पाहून तो म्हणाला, "कोण तुम्ही ? इकडे कसे आलां ? काय चमत्कार आहे बुवा ! घरदार प्रपंच सोडून अगदीं किर्र रानांत बसलों तरी सुद्धां माणसं चैन पडूं देईनात ! याला काय करावें ? जा. जा. तुम्ही आपल्या वाटेनें जा. बाबांनो, आमच्यासारख्यांच्या तपश्चर्येचा भंग करूं नका."

परंतु काय चमत्कार असेल तो असो, त्या बालगोसाव्याला पाहिल्यापासून, आणि विशेषतः त्याचा आवाज ऐकल्यापासून, त्या आपल्या प्रवासी स्त्रीस विशेषच मोह पडला. तिचें वैराग्यप्रेम बळावलें. ती आपल्या सोबत्यास म्हणाली, "माझा निर्धार झाला कीं, आतां यांचे चरण सोडून कोठें जावयाचें नाहीं. आजन्म यांची सेवा करावयाची. अशी वैराग्यमूर्ति सेवेला मिळाल्यावर मला संसार काय करायचा—पण मी हें काय बोलतें ! आतां संसार तरी आहे कोठें ? आतां मला महाराजांकडे, आईसाहेबांच्याकडे येऊन कर्तव्य तरी काय ? तुम्ही मला आतांपर्यंत संभाळून इथें आणून पोंचवलंत, याबद्दल तुमचे उपकार जन्मोजन्मीं मीं विसरणार नाहीं. पण आतां मला इथेंच राहूं द्या."

हें सर्व भाषण ती मोठ्यानेंच करीत होती. तें ऐकून तो बालगोसावी अगदीं थक्क झाला, व अत्यंत चकित दृष्टीनें तिजकडे पाहूं लागला. शेवटीं एकदम

वसकन् तिच्या अंगावर येऊन तो म्हणाला, "माझी सेवा करणार? मजजवळ राहणार? मला कोणी सेवेला नको. माझ्याजवळ कोणी नको म्हणून तर मीं जग सोडलें, आणि इतकें भयंकर रान शोधून काढून इकडे आलों. जा. नीघ येथून. पुनः इकडे तोंडसुद्धां दाखवूं नकोस."

बालवैराग्याच्या भाषणानें त्या स्त्रीच्या मनावर निराळाच परिणाम झाला. तिचें वैराग्यप्रेम उलट दृढच झालें, व तिनें त्याच्या सेवेला रहाण्याचा निश्चय कायम केला. त्याच्याकडे न पाहतांच ती आपल्या सोबत्यास पुनः म्हणाली, "अहो, तुम्ही जा आतां! मी कांहीं केल्या येथून हालणार नाहीं. शंकराच्या पिंडीवर जसें बेलाचें पान वाहून घेतलें आहे...बोवा माझ्यापासून सेवा घेणार. मी त्यांना घ्यायला लावणार. तुम्ही जाहो!! तुम्ही येथून गेल्या-खेरीज बोआ माझ्यावर अनुग्रह करणार नाहींत..." तिची वेड्यासारखी स्थिति झाली होती. मोठमोठ्यानें बोलून ती त्याला घालवीत होती. शेवटीं एकदां तो गेला. काय करणार? नाइलाज होऊनच तो गेला. तो गेल्यानंतर ती बोआंच्याकडे वळली, त्यांच्या अगदीं जवळ गेली, व त्यांच्या कानांत 'आपण हा पुरुषाचा वेष...' असे कांहीं शब्द पुटपुटली. त्याबरो-बर त्या बालगोसाव्याची चर्या अगदीं चमत्कारिक झाली. तो बराच वेळ स्वस्थ बसला, आणि शेवटीं म्हणाला, "काय करावें, कोठेंहि गेलों तरी तुमच्यासारखे छळक आमचा पिच्छा पुरविल्याखेरीज सोडीत नाहींत."

"महाराज, माझ्यासारख्यांना छळक कां म्हणतां? सेवक म्हणा. महा-राज, आपण माझी वाटेल तशी परीक्षा घ्या, पण आपल्या सेवेसाठीं ठेवून घ्या; नव्हे, मी राहणार. अगदीं जिवें मारलें तरी मी येथून जाणार नाहीं. संसारांत राहून माझे हाल झाले तेवढे पुरे झाले. आतां चित्त शांत करून स्वस्थपणानें हरि हरि करीत बसावें यासारखें दुसरें कांहीं करण्याजोगें राहिलें नाहीं. मी आपले पाय धरतें. आपला अनुग्रह मला पाहिजे" असें म्हणून खरोखरीच तिनें त्या गोसाव्याचे पाय धरले.

या सर्व प्रकारानें बालगोसावी फारच चिंताक्रांत झाला व बराच वेळ स्वस्थ बसला; पण गप्प तरी किती वेळ बसणार? तेव्हां तो त्या स्त्रीस म्हणाला,

"इतका तुझा निश्चय, इतकी तुझी दृढ श्रद्धा जर माझ्या ठिकाणीं बसली आहे, तर आम्ही तरी नाहीं कसें म्हणणार ? तसाच तुझा आमचा पूर्वीचा ऋणानुबंध असेल, म्हणून तूं या अशा जागीं येऊन आम्हांला भेटून असा आग्रह धरून बसलीस. ठीक आहे. तुझा जर इतका दृढनिश्चय आहे, तर कर केंस मोकळे, घे त्या धुनींतली विभूति. आणखी पलीकडे कृष्णाबाईच्या कांठीं जाऊन स्नान करून ती विभूति केंसांत घालून सर्व अंगाला फास, व माझ्या त्या खोपींत उशाशीं दुसरी कौपीन आहे ती घालून इकडे ये. मग तुला गुरुपदेश देतों. जा."

बालगोसाव्याच्या तोंडून ही आज्ञा निघण्याचा अवकाश. त्यानें सांगितल्याप्रमाणें तिनें अक्षरशः केलें. तो सर्व विधि अत्यंत उल्हासानें व चपलतेनें उरकून ती त्याच्या सन्मुख येऊन उभी राहिली. तेव्हां तो म्हणाला, "ठीक आहे. उद्यां मी तुला काय गुरुमंत्र द्यायचा तो देईन. पण त्याच्या आधीं एक दोन गोष्टी केल्या पाहिजेत, त्या करायला तूं तयार आहेस ?"

"आपण जी काय आज्ञा कराल, ती अगदीं अक्षरशः पाळायला मी तयार आहें. आपल्याला माझी कांहीं परीक्षा पहायची असली तर पहा. आपण डोंगरावरून उडी टाकण्याची आज्ञा केलीत तरी टाकीन. काय सांगाल तें करीन, पण मला दूर लोटूं नका."

बालगोसावी म्हणाला, "पहिली शपथ अशी वहा कीं, या ठिकाणीं जें कांहीं मला दिसेल, किंवा माझ्या कानीं पडेल, तें कितीहि अघोर किंवा कितीहि क्रूर असें वाटलें, तरी त्याचा कोठें उच्चार करून दाखविणार नाहीं, किंवा असें कां तसें कां असा कोणालाच प्रश्न विचारणार नाहीं."

ती आज्ञा आणि ती शपथ ऐकतांच ती स्त्री थोडीशी चपापली. परंतु तावडतोब तिनें वरील शब्द उच्चारले. नंतर तिला तो म्हणाला, "आणखी एक शपथ वहा कीं, 'या ठिकाणीं जें काम तुम्ही करायला सांगाल, तें कितीहि अघोर किंवा क्रूर असें वाटलें तरी आपली आज्ञा म्हणून मीं अक्षरशः करीन. क्षणभरसुद्धां विचार करणार नाहीं.'" ती बराच

वेळ थांबली. परंतु शेवटीं तिनें हीहि शपथ घेतली. बालगोसाव्यास समाधान वाटलें.

तिकडे शिवाजीमहाराज थोरल्या गोसावीबोआंशीं बोलण्यांत गुंतले असतां खंडेराव पडत्या फळाची आज्ञा घेऊन तेथून जो दौडत निघाला तो तिन्हीसांजेच्या वेळेला त्या बालगोसाव्याच्या जवळ येऊन थडकला. तेथें येतांच तो "फत्ते फत्ते ता..." असें ओरडला. त्यावेळीं त्या स्त्रीचा शपथविधि नुकताच संपला होता. बोआंच्याजवळ दुसरी कोणी गोसावीण आहे हें पहातांच खंडेराव दचकला आणि मागें सरला; आणि संशयित मुद्रेनें पाहूं लागला. परंतु तितक्यांत बोआ अत्यंत उत्कंठित आवाजानें त्यास म्हणाला, " काय म्हणालास ? खंडेराव, बोल फत्ते कोणाची ? आपली फत्ते झाली ? हे मंगल शब्द उच्चारल्याबद्दल तुला काय बक्षीस देऊं ? बोल. अरे, तूं हिच्याबद्दल मुळींसुद्धां शंका घेऊं नकोस, ही आमची पक्की शिष्यीण बनली आहे. आतांच शपथाआणा वाहून तिचा आणखी माझा अगदीं एकजीव झाला आहे. सांग, काका कुठें आहेत ? त्यांनीं काय केलें ?"

इतकें सांगितल्यानंतर खंडेराव निःशंकपणें बोलूं लागला. तो म्हणाला, " काका तिकडे गेला असून त्याची व शिवाजीची गांठ पडली. त्यानें शिवाजीस इकडच्या अद्भुत गोष्टी सांगून तेथेंच अडकावून ठेविलें आहे. परंतु त्याच्या अगदीं नाकांतील बाल तो सावजी नाहींसा झाल्यानें तो लवकरच इकडे त्याच्या शोधार्थ निघेल. सावजीस वाघानें मारलें असें मीं शिवाजीस खोटेंच सांगितलें, परंतु तें त्यास पटलें नाहीं. बोआ त्या मुर्दाडास घेऊन उद्यां खात्रीनें इकडे येणार. आपण झटपट केली, तरच..." मध्येंच बालगोसावी म्हणाला, "हो आपण झटपट करणार व आपला बेत पूर्णपणें सिद्धीस जाणार. आपण असा बार उडवून देऊं कीं...' हें सर्व संभाषण त्या नवीन गोसाविणीनें अगदीं कान देऊन ऐकलें. तिची खात्री झाली कीं, गोसावीबोआ हे खरे तपस्वी नाहींत. कपटवेष धारण करून त्यांनीं कांहीं-तरी कारस्थान आरंभिलें आहे. यांत शिवाजीमहाराजांचा काय संबंध ? हें काय

गौडबंगाल आहे? अशा वीचारांत ती असतांना खंडेराव व बालगोसावी यांनीं दूर जाऊन बराच वेळ खलबत केलें. नंतर ते परत आले. ती नवी गोसावीण आपल्याकडे अजागळपणानें पहात आहे हें पाहून ते दोघे आपापसांत हंसूं लागले. पण हीच गोसावीण आपल्या पराक्रमानें व समय-सूचकतेनें आपणांस रडवील याची त्यांना त्यावेळीं अंधुकसुद्धां कल्पना नव्हती. खंडेराव निघून गेल्यावर ती गोसावीण बोआजवळ जाऊन म्हणाली, "मला आपल्याला कांहीं विचारावंसं वाटतं. आपण..." परंतु बोआनें तिला एकदम धुडकावलें, "तें कांहीं नाहीं. तूं कांहीं सुद्धां विचारायचें नाहीं. काय होईल तें मुकाट्यानें पहायचें."

कांहीं वेळानें तो बालगोसावी आपल्या खोपींत गेला. त्यानें त्या बिचाऱ्या शिष्यिणीला 'खोपीच्या दारांतच बसून रहा' म्हणून आज्ञा केली. परंतु अतिशय थकल्यामुळें व दोन चार दिवसांत झोंप न मिळाल्यामुळें तिला बसवेना. जवळच पसरलेल्या गोसावीबोआच्या व्याघ्राजिनावर तिनें आपलें अंग टाकून दिलें, व ती तात्काळ गाढ झोंपी गेली. तिला अशी गाढ झोंप लागली असतां तो बालगोसावी खोपींतून बाहेर येऊन कोणाची तरी मोठ्या आतुरतेनें वाट पहात येरझारा घालूं लागला, तों झाडाच्या बुंध्या-जवळ असलेल्या एका भगदाडांतून कोणी माणूस बाहेर पडला. त्यास पाहतांच बालगोसावी म्हणाला, "तुळाजीराव, तुझी वाट तरी किती पाहायची? केव्हांपासून माझे हेलपाटे सुरू आहेत. बरें, तें असो. पण काय हालहवाल आहे?"

"हालहवाल दुसरी कसली? आमच्याकडून सगळी जय्यत तयारी आहे. आपण आज्ञा करा कीं, ताबडतोब बत्ती लावून भडका उडवून देतों."

"पण काय तयारी आहे ती मला प्रत्यक्ष पाहूं दे. 'चक्षुर्वै सत्यं' केल्याखेरीज मला समाधान होणार नाहीं" असें म्हणून तो गोसावी आपल्या लोकांबरोबर त्या भगदाडांत शिरला. आंतील तयारी पाहून त्याचें चित्त प्रसन्न झालें व आपला बेत यथास्थित सिद्धीस जाणार असा त्याला

भरंवसा वाटूं लागला. वर आल्यावर त्यानें त्या गोसाविणीला व इतर सर्व मंडळींना दूर घालवून दिलें आणि आपण एकटाच बाजूला जाऊन एका वस्त्रांत गुंडाळून ठेविलेली आपल्या वडिलांची तसबीर बाहेर काढून तिच्याकडे तटस्थपणें पहात बसला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. हुंदकेहि त्याला आवरतां येईनात. बराच वेळ गेल्यावर तो आपल्याशींच म्हणाला, " बाबा, तुम्ही बेसावध असतां तुमचा खून केला ? आणि सगळ्या घराण्याची अब्रू घेतली. पण नागाचें बीळ खणून टाकतांना नागाचें एक पिल्लू निसटून गेलें, तें 'तुझ्या' लक्षांत कोठें आहे ? पहा आतां त्याची करामत ! बाबा, तुमच्या खुनाचा सूड घेण्याची वेळ अगदीं जवळ आली आहे. यावेळीं मी स्वतः तो सूड घेणार. मी आपल्या हातानें बत्ती शिलगावून देणार !...आजपर्यंत मीं व काकांनीं किती अडचणी सोसल्या, किती वनवास भोगला ! हेतु हा कीं, हा सोन्याचा दिवस उगवावा ! बाबा, माझा हेतु पूर्ण झाल्यावर मला जगून तरी काय करायचें ? मी तुम्हांला भेटावयास येणार...... "

मन थोडें स्वस्थ झाल्यावर तो बालगोसावी इकडे तिकडे पाहूं लागला, तों ती गोसावीण त्याच्या नजरेस पडली. त्याबरोबर त्याच्या अंगाचा नुसता संताप होऊन तो म्हणाला, " कां, कां तूं येथें आलीस ? माझ्याजवळ येऊं नको म्हणून तुला सांगितलें होतें कीं नाहीं ? हो चालती, नीघ इथून; मला गुरु म्हणतेस आणखी माझी अशी अवज्ञा करतेस ?...बोल, तूं ही तजबीर पाहिलीस कीं नाहीं ? तूं माझें बोलणें ऐकलेंस. तुला आमचें कारस्थान समजलें. तुला चालती हो म्हणून म्हटलें, पण आतां तुला येथून सोडणार कोण ? तूं पुरती बंदींत पडलीस. उद्यां येथें जो महायज्ञ होणार आहे तो पार पडल्याखेरीज आमचे लोक तुला सोडणार नाहींत. गडबड करशील तर तुझ्यासुद्धां जिवाचा ते उद्यां होम करतील...पण तें कशाला ? आपण दोघे मिळून माझ्या बाबांच्या खुनाचा सूड उगवूं. बोल, तूं माझी शिष्यीण ना ? मग गुरूच्या बरोबर प्राण देण्याला तयार झालं पाहिजे, आहेसना तयार ? "

‘ हो अगदीं एका पायावर तयार आहे. पण बैरागी बनल्यानंतर मग खून कसला आणखी सूड कसला ? हा प्रकार आहे काय ? ”

“गुरु म्हटल्यानंतर तो सांगेल तें प्रमाण, अमुक कां आणखी तमुक कसें हा प्रश्न विचारायचा नाहीं. ”

---

## तुझा दुष्मन् तो जगाचा हितकर्ता ! : : १५

नंतर त्या बालगोसाव्यानें आपल्या लोकांस जवळ बोलावलें, व त्यांच्या मुख्यास म्हटलें, “ तुम्हीं सर्व व्यवस्था उत्तम केली आहे. पण आतां शेवटचा बार उडविण्याचें श्रेय मीच घेणार. आजपर्यंत जिवापाड मेहनत घेऊन केलेल्या कामगिरीची पूर्तता माझ्या हातूनच झाली पाहिजे. माझ्या नवीन शिष्यिणीचे या कामीं मला पूर्ण साहाय्य आहे. ती तर संसाराला कंटाळलीच आहे आणि सूड घेण्याची माझी प्रतिज्ञा मींच शेवटास नेली पाहिजे. आपल्याकरितां दुसऱ्याचा जीव धोक्यांत काय म्हणून घालावा ? चला, जा आतां, येथें थांबूं नका. ”

तुळाजीराव आपल्या लमाण लोकांस घेऊन तेथून निघून गेल्यावर बालगोसावी आपल्या शिष्यिणीकडे वळून म्हणाला, “ बस्स, तूं आणखी मी, दोघे मिळून सूड उगवूं, आणि त्याच प्रचंड यज्ञांत आपलीहि आहुति देऊन टाकूं. चल, या विवरांत उतर. आतांच आंतील सर्व व्यवस्था पाहून ठेव, म्हणजे आयत्या वेळीं तूं गोंधळणार नाहींस. ”

हा कांहीं तरी भयंकर प्रकार आहे, व यांत आपल्याकडे कांहींतरी विलक्षण कामगिरी दिली जाणार आहे, हें मनांत येऊन ती अगदीं भांबावून गेली. परंतु आतां बोलण्याची कांहीं सोय नाहीं. हें जाणून तिनें गुरुजींच्या आज्ञेप्रमाणें त्या विवरांत उडी टाकली. तिच्या मागोमाग गोसाव्यानें हातांत एक चूड घेऊन उडी टाकली. आंत उतरल्यावर तिला बाराच्या दारूचीं पोतींच पोतीं दिसलीं. तीं पाहून तिच्या मनाला एकदम चरका बसला. ती

आश्चर्यचकित होऊन स्वब्ध झाली. तें पाहून गोसावी म्हणाला, "हें सर्व पाहून तूं अगदीं चकितशी झालीस? मृत्यूच्या भीतीनं तुझी गाळण उडाली वाटतं? हेंच का तुझें धैर्य? हीच का माझी आज्ञा पाळणार? माझ्या शत्रूचा सूड उगविण्याच्या कामीं तूं माझ्याबरोबर जीव द्यायला तयार आहेसना? बोल, तुझी प्रतिज्ञा कायम आहे कीं नाहीं?"

"महाराज, माझी प्रतिज्ञा अढळ आहे. माझ्या प्रतिज्ञेंत कांहीं एक फरक झाला नाहीं. आपल्या शत्रूचें नांव फक्त कळावें एवढीच इच्छा आहे."

"आणखी त्याचें नांव ऐकल्यावर वाईट वाटलें आणि तुझी प्रतिज्ञा ढळली तर मग? नांवच कळून काय करायचें आहे?"

"करायचें काय? परंतु एकदां कळावें इतकीच फार इच्छा आहे."

तें ऐकून बालगोसावी थोडा थबकला; नंतर हलकेंच म्हणाला, "सांगायला हरकत नाहीं, परंतु सगळं जग त्याला फार उत्तम म्हणतं, देवासारखं मानतं; मला तर तो दैत्यासारखा दिसतो... काय? तुला माझा दुष्मन कोण तें कळायला पाहिजे! पण माझ्या तोंडानें त्याच्या नांवाचा उच्चारसुद्धां करवत नाहीं. तो त्या बेइमानी शहाजीचा कपटी कारटा आहे. बोल, तुला तो अगदीं देवासारखा वाटतो कीं नाहीं?" इतकें म्हणून गोसावी मोठ्यानें हंसला.

परंतु त्या स्त्रीच्या मनावर त्या बोलण्याचा व हंसण्याचा फार निराळा परिणाम झाला. एखाद्या संगमरवरी पुतळीप्रमाणें ती अगदीं तटस्थ उभी राहिली. पुष्कळ वेळ झाला. शेवटीं पुनः गोसावीबोवा तिला म्हणाला, "चल, आतां आपण वर जाऊं, आतां उजाडेल. लवकरच त्या दुष्मानाला घेऊन काका येतील. आणखी एका प्रहरांत त्याचा आपण फडशा पाडूं."

ती स्त्री क्षणमात्र थांबली. तिच्या मनांत कांहीं निश्चय ठरला. नंतर ती संथपणें म्हणाली, "आपण चूड घेऊन वर कसे चढणार? माझ्या हातीं चूड द्या."

तो गोसावी वर चढला मात्र, तोंच त्याच्या कानीं पुढील शब्द पडले:

"तुझा दुष्मन् तो जगाचा हितकर्ता! त्याला वांचविण्यासाठीं तुझे माझे काय, पण आणखी पांचशें लोकांचे प्राण गेले तरी हरकत नाहीं. तो प्रहरानें येणार, पण मी आतांच ही चूड इथें लावून भडका उडवितें."

ते शब्द कानीं पडतांच बालगोसावी नुसता काळा ठिक्कर पडला; त्याला कांहीं सुद्धां समजेना. क्षणमात्र तर त्याचें सर्व चैतन्यच नाहींसें झाल्याप्रमाणें दिसलें. परंतु तो क्षण गेल्याबरोबर चवताळून कर्कशपणें ओरडून त्या स्त्रीला म्हणाला, "काय? मी इतके दिवस केलेल्या माझ्या बेताचें तूं वाटोळें करून मला नरकांत घालणार? माझ्या बापाचा विश्वासघात करून ज्यानें खून केला त्याला तूं वांचवून माझाच उलटा प्राण घेणार? पण तुझ्या प्राणाचें काय होईल?"

"शिवाजीमहाराजांसारख्या पवित्र पुरुषाचे प्राण वांचविण्यांत माझे प्राण गेले तर त्यापेक्षां अधिक उत्तम मृत्यु कोणचा? हाच माझा मोक्ष! याहून मोक्ष तो आणखी काय असतो? पहा, चूड अर्धी अधिक जळत आली. माझ्या मुठीशीं आली कीं, मी क्षणभर थांबायची नाहीं. सगळ्या गोणत्यांतून ठिणग्या पाडीत जाईन. मी आंत पार होईनच. पण तूं आणखी आसपासचे सर्व लोक पार उडून जातील. तुझा प्राण तुला हवा असला तर, आंत ये. आणि माझ्या ताब्यांत रहा. शिवाजीमहाराज येथें येऊन सुरक्षित जाईपर्यंत मी बसवीन तिथें बसलें पाहिजे. आहे कबूल?"

बालगोसाव्याच्या डोक्यांत कांहीं कल्पना येऊन तो म्हणाला, "कबूल. मी आंत येतों, आणखी तूं बसवून ठेवशील तिथें बसून राहतों. मग तर तुझी हरकत नाहीं? कबूल, हा मी आंत आलों."

असें म्हणून त्यानें आंत उडी टाकली; आणि त्या स्त्रीला खालीं पाडण्यासाठीं तिच्या कमरेला विळखा घातला. परंतु ती सावधच होती. तिनें गोसाव्यास दाद दिली नाहीं. ती म्हणाली, "मी आपल्या जिवावर उदार आहें. आतांपर्यंत वर होतास तोंपर्यंत कदाचित् तुझा प्राण वांचण्याचा संभव होता. पण आतां इथें तुझ्या आणि माझ्या प्राणाची एकदम होळी! माझा

प्राण जाईपर्यंत तर या हातांतली चूड दूर होणार नाहीं. येथें भरून ठेवलेल्या दारूखान्याचा भडका उडवून त्या वीरपुरुषाचा मी प्राण वांचविणार. आतां तुझें ऐकत नाहीं. जय अंबाबाई !"

त्या स्त्रीचा निश्चय पाहून; आजपर्यंत आपण रचलेला सगळा व्यूह फसणार, व आपण मात्र हकनाक जिवाला मुकणार, असें त्यास स्पष्ट दिसलें. त्याबरोबर तो एकदम म्हणाला, "तूं जेथें बसायला सांगशील तेथें बसेन; तूं सांगशील तें करीन. हा पहा, मीं कमरेचा विळखा सोडला. पण गोणत्यांच्या दारूला आग लावूं नको."

"छे. छे. ही गोष्ट कालत्रयीं घडायची नाहीं. आतां मी भडका उडवून देणार. ही चूड संपत आली, आतां मी ही पहिल्याच गोणत्यांत खुपसतें, व तुझ्या दुर्बुद्धीचा आणखी प्राणाचा बरोबर नाश करून टाकतें. चल हो दूर." असें म्हणून ती ताडकन् तेथून निघाली, आणि आपल्या हातांतली चूड गोणींत नेऊन खुपसणार तोंच...!

---

## गूढ उकललें : : १९

काय चमत्कार! तिचा हात कोणीं वरच्यावर पकडला, आणि तिला मागें ओढलें. तिचा हात धरणारा तो पुरुष दांडगा होता. त्यानें तिला तो चुडीचा हात नुसता हालवूंसुद्धां न देतां अचानक उचललें, व गोणत्यापासून आडव्या बाजूस एक भुयाराचा फांटा होता त्या बाजूला नेलें. तिनें खूप धडपड केली. परंतु तिचा कांहीं इलाज चालेना. त्यानें तिच्या हातांतून चूड काढून घेऊन, पायाखालीं दडपून चोळून टाकली, आणि पार विझली असें पाहिल्यानंतर तो एकदम तेथून नाहींसा झाला. शेवटीं दुष्टाचा बेत सिद्धीस जाऊन घटकाभरांत तो महापुरुष या जगांतून नाहींसा होऊन सगळ्या महाराष्ट्राची आशा समूळ नाहींशी होणार, असें मनांत येऊन तिचें चित्त अतिशय विव्हळ झालें. बालगोसाव्यासा मोठें समाधान झालें कीं, आपला प्राण अगदीं जाण्याच्या बेतांत आला होता तो वांचला. ताबडतोब

त्या विवरांतून तो बाहेर पडला. ती शिष्यीण तशीच आंत राहिली. तिला आपल्या जिवापेक्षां महाराजांच्या जिवाची विशेष काळजी वाटूं लागली, व त्यांचा जीव कोणत्या तऱ्हेनें वांचवावा याचाच विचार करूं लागली, तिला एक युक्ति सुचली. त्याबरोबर तिनें पायाखालची ओली माती नखांबोटांनींच उकरली. व ती आपल्या पदरांत घेऊन प्रत्येक दारूच्या पोत्याच्या तोंडावर वीत वीत चढेल इतकी घातली. हेतु हा कीं कोणी एकदम आग लावण्यास आला तरी ती आग लागूं नये.

इकडे बालगोसावी वर आला. अंगास भस्मार्जन करून त्यानें नीट जटाभार बांधला. नंतर कौपीन धारण करून त्या धुनीजवळच्या आपल्या आसनावर येऊन ध्यानस्थ बसला. थोरले गोसावीबोआ आपल्या दुष्मनाला इकडे घेऊन केव्हां येतात, त्याचेंच त्याला ध्यान लागलें होतें ! आतां चांगलें फटफटीत उजाडलें. तोंच एका बाजूनें दोन चार मंडळी येत आहेत असें त्यास वाटलें. त्यांच्या बोलण्याचा आवाजहि आला. त्याबरोबर त्याच्या चर्येवर केवढा उल्हास दिसूं लागला ! तितक्यांत कोणी इसम त्याच्यापुढें येऊन 'काम फत्ते. आतां पुढली तजवीज' हे शब्द उद्गारला. ते शब्द ऐकतांच तो बालगोसावी उठून आपल्या खोपींत गेला, व दार लावून आंत बसला.

थोड्याच वेळानें शिवाजीमहाराज आले. त्यांना व बरोबर असलेल्या मंडळींना ते थोरले गोसावीबोआ म्हणाले, "बोआ, आपल्या अंतर्गुंफेंत योगाभ्यास करीत आहेत.मी तपास करून येतों. तोंपर्यंत तुम्ही येथेंच बसा." बोआ खोपींत डोकावून परत आले आणि म्हणाले, "राजा, तुझें भाग्य मोठें आहे. आतां महाराज लवकरच बाहेर येतील, व आपल्या कृपाप्रसादानें तुला पवित्र व धन्य करतील. आपण येथेंच कांहीं वेळ बसूं. राजा तुझा सोबती मेला असला तरी त्याला महाराज आपल्या योगसामर्थ्यानें जिवंत करून तुझ्यापुढें उभा करतील. तूं काळजी करूं नको." असें बोलून बोआ तेथून उठले, व खोपींत शिरून, त्या बालगोसाव्यास म्हणाले, "युक्ति केल्याप्रमाणें सावज तर जाळ्यांत आणून घातलें. आतां पुढील तजवीज

लावूं या. एकवार तूं आधीं बाहेर ये व राजाला, आपल्या दुष्मानाला, मोहपाशांत पकड."

"नाहीं, मी बाहेर येत नाहीं. आतां मीच आंत जाणार, आणि आपल्या हातानें बत्ती लावणार," असें म्हणून बालगोसावी त्या विवरांत उतरला.

थोरल्या गोसाव्याची मुद्रा चमत्कारिक झाली. तो परत येऊन महाराजांस म्हणाला, "राजा, मी थोडा पलीकडून जाऊन येतों. तुला कांहीं चमत्कार दाखविण्यासाठीं कांहीं वनस्पति काढून आणण्याची कामागिरी बोआंनीं मजकडे दिली आहे, तेवढी करून येतों."

महाराजांनीं अनुमोदनार्थी मान हालविली. स्वारीनें तेथून किती वेगानें पळ काढला, तो त्यांचा त्यांसच ठाऊक! त्यांची ती जाण्याची त्वरा पाहून राजांस आश्चर्य वाटलें. त्यांच्या मागोमाग कांहीं एक न विचारतां दुसरींहि माणसें तशींच लगबगीनें गेलीं. तेथें फक्त महाराज व त्यांचा एक इसम काय ते राहिले. त्यांचे कानीं मोठमोठ्यानें भांडण झाल्याप्रमाणें कांहीं शब्द पडले. ते इकडे तिकडे पाहूं लागले, तों थोड्या अंतरावर जमिनींतून दोन माणसें बाहेर पडलीं असून तीं तिसऱ्या कोणास जमिनींतून ओढून काढीत आहेत, असें त्यास दिसलें. तें पाहतांच महाराजांनीं आपल्या बरोबरीच्या इसमास तिकडे पाठविलें. तो त्या विवरापाशीं जातांना त्या दोन माणसांपैकीं एकानें त्यास त्याच्या नांवानें हांक मारून म्हटलें, "अरे, या अवदसेला—या माणसाच्या रूपानें इथें आलेल्या नागिणीला—बिळांतून ओढून काढ. ही जर हातांतून सुटली, तर काय अनर्थ करील त्याचा नेम नाहीं."

हें ऐकतांच त्याहि इसमानें आपली मदत दिली, आणि त्या तिघांनीं मिळून त्या बालगोसाव्याला त्या विवरांतून बाहेर काढले. तीं चारहि माणसें महाराजांच्या पुढें गेलीं. त्यांस पाहतांच महाराज एकदम म्हणाले, "कोण, सावजी? अरे, हें आहे काय? तुला मीं कोणच्या कामगिरीवर पाठविलें, आणखी तूं गेलास कोणीकडे? ही मंडळी कोण?"

"महाराज, ही स्त्री आपल्यावर उपकार करणारी एक साध्वी. हिनें

आपले आज प्राण वांचविले.आणखी ही गोसाव्याच्या सोंगाची बतावणी करणारी हीहि एक स्त्रीच आहे, नव्हे नागीण आहे. हिला आतांच्या आतां जगांतून नाहींशी केली पाहिजे. महाराज, या लोकांची एकंदर कृति आपण जर ऐकली तर आपल्या अंगावर शहारे उठतील. ही गोसाव्याचा वेष धारण करणारी स्त्री त्या दुष्ट चंद्रराव मोऱ्याची मुलगी......"

बालगोसावी मध्येंच त्यास झिटकारून म्हणाला, "नीचा, आतां मी तुझ्या हातांत सांपडलें म्हणून तूं माझ्या देखत माझ्या बापाला–जो मरून गेला, नव्हे ज्याचा तुझ्या या लबाड, विश्वासघातकी मालकानें खून केला त्याला–त्याच्या पश्चात् शिव्या देतोस? आमचा बेत फसला, त्याला इलाज नाहीं; पण जर तो साधता, तर विश्वासघाताशीं विश्वासघात उभा करून असा बार उडवून दिला असता कीं वा! पण काय करावें?"

महाराज म्हणाले, "अरे सावजी, हें एकंदर लचांड आहे तरी काय?"

सावजीनें जावळीच्या रानांत रस्ता कोणीकडून व कसा काढावयाचा हें पाहण्यासाठीं गेल्यापासून तों आतांपर्यंतची सर्व हकीकत महाराजांना विस्तारानें सांगितली. तो शेवटीं त्यांना म्हणाला, "महाराज, या चंद्ररावाच्या मुलीनें आपल्या चुलत्याच्या मसलतीनें आपल्या प्राणास अपाय करावा म्हणून केवढा भयंकर व्यूह रचला होता! आपण बसलां आहांत त्याच्या खालीं सगळें पोकळ भुयार आहे. आपल्याला साधु पुरुषाच्या दर्शनाला चलण्याची विनंति करून या जागीं बसवायचें, आणि मग बत्ती देऊन आपला प्राण घ्यायचा हा त्यांचा व्यूह जर अचानकपणें मी येथें येऊन ही वेळ टळली नसती, तर आज केवढा अनर्थ झाला असता! महाराज, आपले प्राण वांचविण्याचें श्रेय माझ्याहून अधिक ह्या वीरस्त्रीला, ह्या महासाध्वीला दिलें पाहिजे. ही माउली आपल्याकरतां स्वतःच्या जिवाची आहुती देण्यास तयार झाली होती!" हें ऐकत असतां महाराज अत्यंत आदरानें व आश्चर्यानें त्या साध्वी स्त्रीकडे पाहूं लागले.

इतक्यांत बालगोसाव्याचा वेष धारण करणारी चंद्रराव मोऱ्याची मुलगी

मध्येंच म्हणाली, "शिवाजी, ही चांडाळीण मला मोह घालून माझ्याजवळ राहतीना, तर हें काम केव्हांच फत्ते करून आपल्या मनाची शांति करून घेतली असती. हिनें सगळा घात केला. असो. आतां काय त्याचे ? राजा, तुझ्यावर ही मोहित आहे, तर हिचा स्वीकार कर, आणखी मला ठार मार."

महाराजांनीं तिचें तें कठोर भाषण ऐकलें. पण शांतपणें ते तिला म्हणाले, "जिनें माझा जीव राखला ती मला मातेसमान, तेव्हां तिचें पालन मी करीनच. पण तूं आतां माझ्या बहिणीप्रमाणें मजजवळ रहा. तुझ्या बापाच्या ठिकाणीं तुझी जर इतकी भक्ति, तर ज्याला तूं भाऊ म्हणशील त्याच्यावरहि तितकीच असणार यांत शंका नाहीं. मला तूं आपला भाऊ समज." असें बोलत असतां महाराजांच्या भोंवतीं लमाण लोकांचा गराडा पडला.

---

## बेत फसल्यावर : : १७

लमाण लोकांस पाहण्याबरोबर चंद्रराव मोऱ्याच्या मुलीचा चेहरा एकदम प्रफुल्लित झाला. जी गोष्ट मोठ्या कारस्थानांनीं आणि युक्त्यांनीं झाली नाहीं, ती आतां या लोकांच्या साहाय्यानें सहज होऊन जाईल अशा विश्वासानें ती त्या लमाणांस म्हणाली, "अरे एक बेत केला तो फसला. पण आतां निदान अशा तऱ्हेनें तरी सूड उगवा. पाहतां काय ? उडवा त्याचें डोकें. छाटा. त्याचे लोक येथें येण्याच्या आंत त्याला नाहींसा करा."

परंतु काय चमत्कार ? त्या माणसांपैकीं एकहि माणूस महाराजांवर चालून जाण्यास धजेना. असेंच कांहीं अद्वितीय, विलक्षण तेज महाराजांच्या अंगाभोंवतीं फांकलेलें त्यांना दिसलें.

"अरे, तुमची मालकीण सांगते त्याप्रमाणें तुमच्या हातून होत नाहीं हेंच बरोबर आहे. मोंगलांनीं तुम्हां आम्हांला, सगळयांना छळलें आहे. त्यांच्या त्रासांतून सगळयांची सुटका व्हावी याकरितां माझी सारी खटपट. याउपर तुम्हांला जें काय करणें असेल तें करा. या. कोणी इमारती बांधीत

असतो, कोणी त्यांचा विध्वंस करतो. आजमितीला अफ्झलखान येतो आहे. बोला, त्याच्या स्वाधीन हा आपला महाराष्ट्र—हें आपलें स्वराज्य करूं ? बोला..."

महाराजांच्या बोलण्यांत अशी एक रसवंती होती कीं, तिच्या योगानें शत्रूच्या मनावरसुद्धां विलक्षण परिणाम होत असे. आधींच त्यांच्या तेजस्वी-पणामुळें त्या वेषधारी लमाणांपैकीं एकहि पुढें येत नव्हता, त्यांत महा-राजांच्या त्या बोलण्यानें तर ती मंडळी अगदींच गार झाली. आणि त्यांचा मुख्य पुढें होऊन म्हणाला, " महाराज, झाली गोष्ट गेली. आमचा बेत फसला हें सर्व प्रकारें उत्तम झालें. आतां आम्ही तर आपल्या केंसाला सुद्धां हात लावणार नाहीं. आमचं सांगणं इतकंच कीं, आतां आपण आम्हांला आपल्या पदरीं असामी ठेवावं आणखी आमच्या हातून कामगिरी करून घ्यावी. "

महाराज म्हणाले,"ठीक. परमेश्वराच्या मनांत माझ्या हातून स्वराज्याची स्थापना पक्केपणीं व्हावी असेंच खास आहे. म्हणून माझ्यावर कितीहि संकटें आलीं तरी तीं दूर होतात, आणखी शत्रूंनाहि माझ्याशीं मित्रत्व करायची इच्छा होते. ठीक आहे. आतां आपण मागील गोष्टी विसरूं आणि पुढच्या उद्योगाला लागूं. लमाणांचा वेषच तुम्ही कायम ठेवा. अफ्झलखान इकडे येणार आहे. त्याला वाईपासून तेथपर्यंत सुखरूपपणें येण्यासाठीं फार सुरेख अशी वाट पाहिजे आहे. ही वाट तुम्ही करून द्या. तुम्हांला या रानाची चांगली माहिती आहे. अफ्झलखानाच्या मनांत दगा करायचा असला तर आपण जशास तसें वागलेंच पाहिजे. एवढ्याकरितां त्याचें सैन्य तळ देईल,तेथून कांहीं अंतरावर,पण त्याच्या सैन्यापैकीं कोणां चिटपांख-रास सुद्धां न कळतां आपलें सैन्य राहील अशी झाडी सांपडेल, अशा बेतानें मार्ग काढा. तुम्ही कामगिरी सांगा म्हणालांत, ही कामगिरी घ्या. " त्यांच्यापुढें लमाणांचा नाईक लोटांगण घालून सद्गदित कंठानें म्हणाला, " शिवाजीराजा, तुला शिवाचा अवतार म्हणतात तें खोटं नाहीं. आजपासून

आम्ही तुझे दास झालों. तूं स्वस्थ ऐस. आतां आमच्याबद्दल अगदीं शंका बाळगूं नकोस. तूं सोंपविलेली कामगिरी आम्ही छान पार पाडतों. तुझा विजय असो!"

लमाणांच्या नायकाचें तें भाषण ऐकल्याबरोबर चंद्रराव मोऱ्याची कन्या नखशिखांत तांबडीलाल झाली, आणि एकदम म्हणाली, "काय? पुरुषांचे निश्चय आणि पुरुषांच्या प्रतिज्ञा, या अशाच असतात काय? आम्हां बाय-कांना चंचल म्हणून नांवें ठेवणारे तुम्हीच पुरुष! का पुरुषांचीं उगीच सोंगें आणलीं आहेत तुम्हीं? आमचे काका, तर हें संकट पाहतांच 'आतां येतों' म्हणून निघून गेले! हा खंड्या, याला तर आतां तोंड नाहीं. पण तो गप्प तरी आहे. आणखी तुम्हीं? तुम्हीं तर माझ्याशीं आणाभाका केलेल्या विसरून आतां या चांडाळाचे दास बनलों म्हणून म्हणतां! वा! मला वाटतं देवानं आतां खरे पुरुष बनवायचंच सोडून दिलं. तसें नसतें तर तुम्हीं असे आपले शब्द वारंवार फिरवले नसते. मरणाच्या भयानें वाटेल त्याचे पाय धरले नसते...बाबा, आतां तुमच्या खुनाचा सूड उगविण्याचें पवित्र काम माझ्या हातून होत नाहीं. माझी मीं पराकाष्ठा केली. आतां कांहीं करणं मला शक्य नाहीं" येथपर्यंत ती बहुतेक सुसंगत असेंच बोलत होती. परंतु पुढें तिची चर्या विलक्षण झाली आणि ती एकदम कांहीं वेडें-वांकडें बोलूं लागली विकट हास्य हंसूं लागली. तिचें डोकें बिघडलें. आणि 'बाबा, बाबा? आलें म्हणतें ना?' असें ओरडत तेथून पळत सुटली. महाराज एकदम म्हणाले, "अरे, कोणी तरी धांवा. तिला धरून ठेवा. ती कदाचित् आत्महत्या करावयाची." एक माणूस तेव्हांच तेथून तिच्या पाठोपाठ निघून गेला. परंतु महाराजांना लागलीच आणखी अनेक गोष्टींची व्यवस्था करावयाची होती, म्हणून तो परत येईपर्यंत त्यांना तेथें थांबतां आलें नाहीं. सावजी व ती संतीण यांना बरोबर घेऊन, व त्या लोकांस 'तुम्हीं पत्करलेली कामगिरी सुरू करा' असें सांगून महाराज निघाले. बोलत बोलत आपल्या मंडळीसह पुनः ते प्रतापगडास परत आले.

प्रतापगडास आल्यावर महाराजांनीं बरोबर आणलेल्या त्या मराठ्या वीरपत्नीस आईसाहेबांकडे पाठवून देऊन थोड्या वेळानें ते स्वतः त्यांच्या दर्शनास गेले. महाराजांवर केवढा थोरला अनर्थ गुदरत होता, परंतु परमेश्वर-कृपेनें ते त्यांतून सुरक्षितपणें पार पाडले, ही हकीकत आईसाहेबांच्या कानीं गेल्यापासून आपल्या पुत्रास आपण केव्हां पाहूं असें त्यांस झालें होतें; त्यांनीं आपल्या पुत्रास जेव्हां प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां त्यांच्या आनंदास सीमा राहिली नाहीं. आपल्या पुण्यप्रतापी पुत्राचा पुनर्जन्म झालेला पाहून त्या थोर मातेला जो निरतिशय आनंद झाला त्याचें शब्दांनीं वर्णन करणें केवळ अशक्य होय ! महाराजांनीं आपले प्राण वांचविण्याला मुख्यतः ती मराठा वीरपत्नी कशी कारणीभूत झाली हें जेव्हां सांगितलें, तेव्हां जिजाबाई-साहेबांस त्या स्त्रीचें विलक्षण कौतुक वाटलें. त्या कौतुकाच्या भरांत अगदीं भान न राहून त्या आंत धांवत गेल्या, व त्यांनीं त्या स्त्रीस कडकडून मिठी मारली; इतकेंच नव्हे तर "बाई, मीं माझ्या शिवबाला जन्म दिला, पण तूं आज त्याला जीवदान दिलेंस. तूं आज माझ्या ओटींत त्याला घातलेंस. तूंच त्याची खरी आई..." वगैरे अनेक शब्दांनीं त्यांनीं त्या स्त्रीचा गौरव केला. नंतर महाराजांनीं आईसाहेबांना चंद्रावाच्या मुलीची सर्व हकीकत सांगितली. तेव्हां त्या म्हणाल्या "शिवबा, तिचं डोकं बिघडून ती जर कोठें गेली असली तर काय अनर्थ होईल याचा नेम नाहीं. कांहीं झालं तरी स्त्रीहत्येचं पातक तुझ्या माथीं यायला नको. चोहोंकडे माणसें पाठवून तिला शोधून येथें आण. मी तिची शुश्रूषा करीन. मग तिला बरं वाटेल" आपली मातुःश्री किती दयाळू, किती कनवाळू ! जिनें आपल्या जिवावर प्रसंग आणला, तिच्याहि जीवाची तिला केवढी काळजी वाटते ! हें मनांत येऊन त्यांना फार कौतुक वाटलें, आणि अशा मातुःश्रीच्या पोटीं आपला जन्म झाला याबद्दल त्यांना फार धन्यता वाटली. नंतर त्यांनीं पांच चार माणसें बोलावून आणून त्या स्त्रीच्या शोधासाठीं रवाना केलीं आणि ते स्वतः मातुःश्रीचा निरोप घेऊन आपल्या उद्योगाला निघून गेले.

अफ़झलखानानें 'भेटीस येतों' असें सांगितल्यापासून महाराजांस एक प्रकारची चिंता जडल्याप्रमाणें झालें होतें. ते त्याच्या भेटीसाठीं सर्व तयारी करीत होते, परंतु अफ़झलखानाचा खरा खरा रोंख काय आहे याचा त्यांस अंदाज लागेना. जर आपल्याला कैद करून नेण्याचीच युक्ति करावयाची असा त्याचा मनोदय असला तर आपण त्याचे दांत सपशेल त्याच्या घशांत घातले पाहिजेत. त्याला मात्र आपलें कारस्थान कळूं देतां उपयोगी नाहीं. जर लबाडी न करितां, केवळ आपल्याशीं तो कांहीं करारमदार करून आपलें स्वराज्य उपभोगूं देणार असला, तर त्याला आल्या वाटेनें सुखरूप जाऊं द्यावें असेंहि त्यांनीं आपल्या मनांत योजिलें. परंतु अफ़झलखानाचा मनोदय काय आहे हें समजण्याला मार्ग काय? याबद्दल महाराज आपल्याशींच विचार करीत असतां त्यांच्या नेहमींच्या हुजऱ्यानें खानाकडून कांहीं निरोप घेऊन त्याचा हेजीब आला आहे अशी वर्दी दिली. महाराजांनीं त्यास आंत आणून सोडण्यास सांगितलें. आंत येतांच तो म्हणाला, "महाराज, मी आपला शत्रु नाहीं, किंवा शत्रूकडून आलोंहि नाहीं. मी तुमचा भक्त आहें आणि त्या भक्तीमुळेंच कांहीं साहस करून महत्त्वाची बातमी काढून ती आपणांस कळविण्यास आलों आहें. महाराज ती बातमी अगदीं षट्कर्णी होतां कामा नये. आपल्या एकट्याजवळच ती, मला सांगतां येईल." महाराजांनीं जवळच्या मंडळींना तेथून 'जा' म्हणून सांगितलें, व त्या हेजिबाला म्हटलें, "सांग. आतां तुझें म्हणणें काय आहे तें इमानेंइतबारें सांग. तें ऐकायला आसपास चिटपांखरूं सुद्धां नाहीं. पण आधीं तूं कोण तें मला सांग."

"महाराज, तेवढी गोष्ट वगळून आपण वाटेल तें मला विचारा. मी कोणी कां असेना पण मी आपला एकनिष्ठ भक्त आहें. आपल्या जिवाचें संरक्षण होण्यासाठीं जरी माझा प्राण खर्चीं घालण्याचा प्रसंग आला तरी तो खर्चीं घालण्याला मी तयार आहें. आणखी त्या निश्चयानें मी भयंकर

साहस करून अफ़झलखानाच्या गोटांत शिरून त्याचा काय बेत आहे हें काढण्याचा यत्न केला. आपण त्याला बोलाविलें आहे. आपल्याला तो वाटेल त्या थापा मारतो आहे. परंतु त्याचा अंतस्थ कावा फार निराळा आहे. आपला प्राण धोक्यांत आहे असें आपण समजा."

"कशावरून? तूं म्हणतोस हें कशावरून?"

"प्रत्यक्ष जें ऐकलें त्याच्यावरून. आपल्याला वाटेल तशा गोड गोड थापा मारून फसवावयाचें, असा त्याचा बेत आहे."

"होय. तूं म्हणतोस तसें असेल. पण त्या म्हणण्यावर विश्वास ठेवायला कांहीं तरी प्रत्यक्ष प्रमाण पाहिजेना?"

"प्रत्यक्ष प्रमाण? प्रत्यक्ष प्रमाण तें काय देऊं? मी कोण आहें, त्याच्या जवळ जाण्याला मला संधि कशी सांपडली, या गोष्टी आपल्याला सांगितल्या तर आपण आणखी दुसरें प्रत्यक्ष प्रमाण माझ्याजवळ मागणार नाहीं. पण आजच मी आपल्याला आपलें नांव–गांव सगळें सांगेन, तर माझा हेतु साधणार नाहीं. अजून मला त्याच्या गोटांत राहून शेवटपर्यंत काय काय रंग होतात ते शोधून काढायचे आहेत. परंतु जर कां मी आपल्याकडे येत जात असतों असें त्याच्या गोटांत कळलें, तर सर्वच प्रकार भलता होईल. महाराज, मी आपल्याला एवढेंच सांगून ठेवतों कीं मला ज्या बातम्या लागतील त्या अगदीं अंतस्थ, ज्या अफ़झलखानाला आणखी मलाच माहीत. त्याच्याबद्दल मुळींच शंका धरूं नका, आणखी त्या बातम्यांमुळें जीं संकटें आपल्याला समजतील त्यांचा प्रतिकार करा. हा खान विजापुराहून असा विडा उचलून आला आहे कीं, आपल्याला जिवें मारीन किंवा जिवंत धरून तरी बादशहाच्या समोर नेऊन उभें करीन. त्याचीं तहाचीं बोलणीं, त्याचीं आश्वासनें अगदीं खोटीं, त्याच्यावर यत्किंचित्‌हि विश्वास ठेवूं नका. तो लुच्चा आहे, दगा करण्याची मसलत करीत आहे. आपण आपल्या वकिलाबरोबर पाठविलेल्या निरोपांत भ्याल्यासारखें दाखविलें आहे, तें ठीक आहे. आपण फार भ्याला आहां, अगदीं शरण आलां आहां,

अशी त्याची पक्की समजूत झाली आहे. परंतु शरणागताला मरण द्यावयाचें नाहीं, असा थोरपणाचा हेतु त्याच्या मनांत बिलकूल नाहीं. त्याचा खरा अंतस्थ बेत असा कीं, सुमारें १५०० स्वार घेऊन इकडे यावयाचें, व आपणांस पकडून कैद करावयाचें. हा त्याचा बेत अद्याप कोणासहि ठाऊक नाहीं."

"मग तो तुला कसा कळला!"

"महाराज, आपल्याकडे अफ़्झल्खान येण्यापूर्वी पुनः एकवार मी आपल्याला भेटेन. त्यावेळीं याच्याहीपेक्षां अधिक बातमी येऊन सांगेन, आणि मग त्याच वेळीं माझी सगळी हकीकत आपल्याला निवेदन करीन; तोंपर्यंत मी सांगतों या गोष्टीवर आपण पूर्ण भरंवसा ठेवून चालावें."

हेजिबाचें हें बोलणें चाललें असतांना महाराजांचें लक्ष त्याच्या चर्येकडे होतें. चर्येवरून मनुष्याचें अंतःकरण ओळखण्यांत महाराजांचा अगदीं हातखंडा असे. त्यांच्या मनाची अगदीं पक्की खात्री झाली कीं, हा माणूस, खरोखर आपल्याबद्दल याच्या मनांत फार भक्ति व पूज्यबुद्धि असल्यामुळेंच आपल्याकडे आला आहे. महाराज त्यास म्हणाले, "अरे, तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यानें आमचें कांहीं एक नुकसान नाहीं. उलट आम्ही जागृतच राहूं; तूं आमच्या पक्षाचा म्हणतोस तर आतां पुढें काय करतोस तें पाहूं. बाबारे, माझी सेवा म्हणजे शिवाजीची सेवा नव्हे—स्वराज्याची आणखी स्वधर्माची सेवा आहे. तूं ती जितक्या इमानानें करशील जितकी थोडीच आहे. तूं आतां खुशाल परत जा."

---

## हेजीब व बालगोसावी : : १९

हेजिबानें प्रतापगडावर जाऊन महाराजांची एकांतांत गांठ घेतली व त्यांना अफ़्झल्खानाचा अंतस्थ हेतु दगा करण्याचा कसा आहे, याची बित्तंबातमी दिली. नंतर महाराजांचा निरोप घेऊन तो तेथून निघाला. घोड्यावर बसून तो एकटाच आपली वाट चालूं लागला. परत जाण्याची

त्याला विशेष गर्दी दिसली नाहीं. तो कांहीं तरी चिंतामय विचारांत अगदीं गर्क झाला आहे असें त्याच्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें. तो आपल्या विचारांत गढून गेल्यामुळें घोडा जिकडे नेईल तिकडे चालला होता. घोडा रस्ता सोडून भयंकर रानांत शिरला तरी त्याचें त्याला भान नव्हतें. परंतु एकाएकीं 'हर ओम् हर ओम्' नारायण, नारायण!' असें शब्द त्याच्या कानावर पडले, त्याबरोबर तो दचकून इकडे तिकडे पाहूं लागला. तेव्हां थोड्या अंतरावर त्याला एक लहान वयाचा बैरागी एका झाडाखालीं बसून देवाच्या नांवाचा गजर करीत आहे असें त्याला दिसलें. आजपर्यंत त्यानें इतका लहान व तेजस्वी गोसावी कधीं पाहिला नव्हता. त्याचा आशीर्वाद घ्यावा म्हणून तो लागलीच घोड्यावरून खालीं उतरला. तो बोआच्या जवळ जाऊन त्याला साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, "महाराज, मी फार आर्त आहें. माझ्यावर कृपा करावी. आपल्या प्रसादानें मला आपल्या स्वीकृत कार्यांत खचित यश मिळेल. माझ्या जन्माचें सार्थक होईल."

"बेटा, तूं इतका आर्त कशानें झालास? तूं दुःखी होऊं नकोस. तुझीं सगळीं दुःखें आजपासून लयाला गेलीं. बोल. तूं कोण? कुठला? काय कारणानें या रानांत आलास? मनांत संकोच धरूं नकोस. सर्व कांहीं सांग. माझ्यासारख्याशीं प्रतारणा केलीस तर कधींहि तुझें हित होणार नाहीं." अत्यंत नम्रपणानें व भक्तिभावानें तो हेजीब म्हणाला, "महाराज, आपल्या-सारख्यांशीं प्रतारणा करणें म्हणजे स्वतःलाच फसवून स्वतःचें अहित करणें होय, हें मी जाणून आहें. मी आपल्याला माझी सर्व हकीकत सांगतों: 'मी मूळचा विजापूरचा रहाणारा. माझें नांव जाधवराव. आमचें घराणें विजा-पूरकरांचे पिढीजात नौकर. आमच्या घराण्यावर बादशहाची फार मर्जी, परंतु सध्यांच्या पातशाहींत सगळाच प्रकार निराळा. आमच्या घराण्याचीच काय, पण सर्वच मराठे मंडळींची फार मानहानि चालली आहे व त्यांचा अनेक प्रकारें छळ सुरू झाला आहे. तेव्हां अशा स्थितींत विजापुरास राहाणें अगदीं गैर होय, असें वाटूं लागलें. शेवटीं, इकडच्या प्रांतांत शिवाजी-

राजांच्या मदतीस यावें, व त्यांची–म्हणजे स्वराज्याची–सेवा करावी म्हणजे कांहीं तरी पुरुषार्थ केला असें होईल, असा निश्चय करून मी व माझा नातलग–मित्र निरोजी आपली बायकामंडळी घेऊन इकडे येण्याला निघालों. वाटेंत एका ठिकाणीं दुपारीं रानांत उतरलों असतां आमच्यावर अकस्मात् एका सशस्त्र पठाणांच्या टोळीनें हल्ला केला. आम्हीं आमची शिकस्त केली. परंतु आम्हीं पडलों फार थोडे, त्यामुळें आमचें कांहीं चालेना. माझा मित्र निरोजी पडला! त्याची पत्नी सती गेली! माझी बायको घोड्या-वर बसून चकमकींत भाग घेऊं लागणार, तोंच तिचा घोडा एकदम बिचकला आणि तिला कोठें घेऊन गेला कोणास ठाऊक? तिच्या मागें एक पठाण लागला. मी त्याच्या मागोमाग तिच्या साहाय्यार्थ धांवून जाणार तोंच माझ्या वर पांचसहा पठाणांनीं एकदम हल्ला करून मला जखमी केलें. मी बेशुद्ध होऊन खालीं पडलों. त्यांना वाटलें मी मेलों, म्हणूनच मी बचावलों. पण महाराज, मी असा जगून काय उपयोग? माझ्या पत्नीला पठाणांनीं गांठलें असेल, आणि तिनें खास आपला प्राण दिला असेल. ती माझी शूर, महा-साध्वी पत्नी–तिची आतां कसली गांठ पडते!'

"बाबारे, प्राण देणें जर इतकें सोपें असतें, तर आज जगांत एकसुद्धां विधवा राहिली नसती· एकसुद्धां पुत्रशोकानें होरपळलेली आई राहिली नसती! तुझ्या बायकोनें प्राण कांहीं दिला नसेल. प्राण दिला असला पाहिजे अशी नुसती कल्पना करून कां चालतोस?"

बालगोसाव्याचें तें भाषण ऐकून त्या मराठ्या शिपाईगड्यास फार वाईट वाटलें. थोडासा रागहि आला; परंतु तो अधिक कांहीं बोलला नाहीं. तेव्हां गोसावी पुनः त्यास म्हणाला, "अरे, तूं माझ्या बोलण्यानें अगदीं गप्पसा बसलास? तुझी बायको प्राण देणाऱ्यांपैकीं नसावी म्हटलं म्हणून? बरं, तिनं प्राण दिला असं धरलं, तरी काय झालं? तुला ती योग्यच शिक्षा नाहीं का झाली! आज पिढ्यान्‌पिढ्या ज्या विजापुरकरांचं अन्न तुम्ही खात आलांत त्यांच्याशीं तूं निमकहरामी करतोस? मग तुझा घात झाला, तर

त्यांत नवल काय? त्याबद्दल तुला एवढं वाईट काय वाटतं? बरं, आपल्या अन्नदात्याशीं निमकहरामी केलीस ती केलीस, आणि ती कशाकरितां? तर इकडे या चोराला येऊन मिळण्याकरितां! वा! खून जिरवणारा, दरवडे घालणारा असा माणूस, गो–ब्राह्मण–प्रतिपालक म्हणून लोकांत त्याचा डांगोरा होतो, आणि तुमच्यासारखे सरदार त्याची चाकरी करण्यास जातात! काय दुनिया वेडी आहे पहा! तिला फूस लावणारा, झुलवणारा मात्र पाहिजे म्हणजे सर्व कांहीं जुळतें."

या बोलण्यानें तो मराठा सरदार विशेष बुचकळ्यांत पडला व म्हणाला, "काय म्हणतां? शिवाजीराजा फसवणारा आहे? दुनियेला झुलवणारा आहे? महाराज, हें आपण म्हणतां तरी काय?"

"दुनियेला आवडणारें नाहीं, परंतु अक्षरशः खरें असेंच मी बोलतों आहें, दुसरें काय? कोणाला तें आवडो अगर न आवडो, आम्ही खरें तेंच निःस्पृह-पणें सांगणार. तुझं तुला जर ज्ञान असतं तर तूं त्या शिवाजीचे इतके गोडवे गाइले नसतेस..."

"कां? कां?' तो मराठा हेजीब मोठ्या आतुरतेनें विचारूं लागला.

"मग तूं त्याच्या मदतीकरितां असा धांव मारीत येतासना."

"पण कां" हेजिबानें अधिक उतावळेपणानें विचारलें. तरीहि त्याच्या प्रश्नाकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं.

"उलट तूं शिवाजीचें जितकें कांहीं आपल्या हातून अहित होईल तितकें करायचें म्हणून उठतास"

"छे! छे!' हेजीब फार आवेशानें म्हणाला, "अशी गोष्ट कालत्रयींहि घडणार नाहीं. अहाहा! तो पुरुष काय थोर! किती उदार! केवढा मुत्सद्दी! आजपर्यंत मला त्याचें प्रत्यक्ष दर्शन कधींच झालें नव्हतें. आज आतांच त्याचें प्रत्यक्ष दर्शन घेऊनच नव्हे, तर त्याच्याशीं एकांतांत बोलून आलों. आहे. अहाहा! देवा, अशा पुरुषाला शंभर तर काय, परंतु हजारों वर्षें आयुष्य दे. त्या आयुष्याचें खरें खरें सार्थक होईल."

त्याचें बोलणें ऐकून बालगोसाव्याचा तिरस्कार अतिरेकास गेला; परंतु बाह्यतः केवळ स्मित करून त्यानें विचारलें, "त्या एकांतांतील संभाषणाच्या जागीं आणखी नाहीं का कोणाचें दर्शन झालें ?"

"आणखी कोणाचें दर्शन होणार ? तेथें शिवाजीराजा आणखी मी असे दोघेच होतों. आणखी कोण असणार ?"

"नाहीं म्हटलें, तुझी मृत्युवार्ता ऐकून प्राण देईल अशी तुझी पत्नी तेथें दिसली नाहीं का ?"

तो प्रश्न ऐकतांच तांबड्या लाल झालेल्या निखाऱ्यावर एकदम पाणी पडलें म्हणजे ते जसे काळे होतात, त्याप्रमाणेंच त्या हेजिबाची स्थिति झाली. जणूं काय त्याचे कान बधिर झाले. कांहीं सुद्धां समजेना कीं, कांहीं सुचेना. सर्पदंश झाला म्हणजे माणूस शून्य होऊन पडतो, तशीच त्याची स्थिति झाली. बालगोसाव्याच्या चर्येवर मात्र फार समाधान दिसलें. सैतानाच्या मनाजोगें एखादें कृत्य झालें म्हणजे त्याचें जसें समाधान असतें तसेंच तें समाधान होतें !

तो हेजीब हळू हळू शुद्धीवर आल्यावर त्यास म्हणाला, "आपण म्हणालां पण माझी स्त्री शिवाजीराजाच्या घरीं असण्याचा संभव काय ?"

"संभव काय वगैरे आम्ही कांहीं सांगत नाहीं. पण आहे कीं नाहीं, हें प्रत्यक्ष पाहून ये. नुसते प्रश्न कसले विचारतोस ?"

"मला हें शक्यच वाटत नाहीं. तेव्हां मी पुन्हां पाहूं कशाला ? माझी बायको जिवंत राहिली असेल हें संभवतच नाहीं."

"तुझ्या बायकोची सुद्धां अशीच समजूत कीं, तूं जगला असशील हें संभवत नाहीं. आणखी म्हणून तिनें वाटेल तसें......"

"पण माझी बायको तेथें आहे, हें आपल्याला काय ठाऊक ? ती तेथें जाण्याचें कारण काय ? आपण माझी बायको पाहिली काय ? सांगा. उगीच मला संशयांत ठेवूं नका."

"संशयांत ठेवतो कोण ? आम्ही तर तुझ्या संशयाचा पूर्ण उच्छेद

करण्याच्या हेतूनें बोलतों आहों. आणखी उलट आम्हांलाच तूं संशयांत ठेवूं नको म्हणून म्हणतोस ? अरे बाबा, तुझी बायको इथें माझ्याजवळ होती. जसा तूं चुकून आलास तशीच तीहि चुकून आली होती. जशी तूं मला आपली हकीकत सांगितलीस, तशीच तिनेंहि सांगितली. दोन हकीकती ज्याच्या कानीं पडल्या, त्याला तूं तिचा नवरा आणि ती तुझी बायको, हें आणखी कोणी येऊन स्पष्टपणें सांगायला पाहिजे वाटतं ? तुझ्या त्या शिवाजीच्या इथें ती आतां आहे. तिथें जा आणि आपल्या पत्नीचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन ये. तुम्ही दोघें जिवंत असून परस्पर मेल्याच्या संशयावरून विनाकारण एकमेकांपासून दूर राहतां याचा अर्थ काय?... कर, शिवाजीची अगदीं मनोभावानें सेवा कर. त्याच्या सेवेचा मोबदला हा असाच तुला मिळणार !"

गोसाव्याच्या या भाषणानें त्या मराठ्या सरदाराच्या मनांत संशयपिशाचिकेचा अनिरुद्ध संचार सुरू झाला. कांहीं केल्या त्याचा जोर ओसरेना. शिवाजीमहाराजांबद्दल त्या मराठ्या सरदाराचें मन पूर्वी जें अगदीं भक्तिपूर्ण होतें, तें आतां द्वेषपूर्ण झालें. आणि तें तसें झालेलें पाहतांच गोसावीबोआस मोठा संतोष झाला. पुनः तो म्हणाला, "तुझ्यासारख्याशींच अशा प्रकारानें शिवाजी वागला असें समजूं नको. या इकडल्या प्रांतांत ज्याला म्हणून विचारशील, तो तुला असंच सांगेल कीं, शिवाजीनें हें एवढं राज्य उभारलं तें केवळ विश्वासघात करून ! या जावळी प्रांताचा राजा चंद्रराव मोरे त्याला, केवळ विश्वासघातानें मारून त्याचं यानं राज्य घेतलं. अरे, आपण सर्वजण मिळून त्या दुष्टाला चांगलें प्रायश्चित्त......"

बोलतां बोलतां बोआस अंगांत आल्याप्रमाणें झालें. त्याचे डोळे वटारल्यासारखे दिसूं लागले, सर्वांग-विशेषतः मान-थरथर कापूं लागलें. तो एखाद्या भयंकर श्वापदाप्रमाणें किंचाळूं लागला; नंतर एकदम खालीं निपचित पडला. त्याचें शरीर अस्ताव्यस्त झालें, आणि त्या स्थितींत कांहीं चिन्हें त्या मराठ्या सरदाराच्या दृष्टीस पडलीं. त्यावरून तो फारच चकित झाला व

बोआचें प्रथम दर्शन झालें तेव्हांच त्यास जी शंका आली होती, ती खरी ठरली.

थोड्याच वेळांत गोसाव्याची मूर्च्छा उतरली, त्याचे डोळे उघडले. परंतु लागलीच देहभान विसरून तो रानटी जनावराप्रमाणें किंकाळी फोडून पळत सुटला. हा सर्व प्रकार पाहून बालगोसावी म्हणजे कोणी खरा तपस्वी नसून गोसाव्याचा वेष घेतलेली एक वेडी स्त्री आहे अशी त्याची खात्री झाली. त्याबरोबर त्याच्या मनांतील संशयपिशाच्चिकेचा जोर एकदम कमी झाला, आणि इतका वेळ आपण एका वेडीच्या नादीं लागून शिवाजीमहाराजां-सारख्या थोर, पवित्र पुरुषाबद्दल भलभलते तर्क केले याबद्दल त्यास अत्यंत वाईट वाटलें. त्याचें चित्त बदललें, आणि आपल्या पहिल्या बेताप्रमाणें आपण त्यांस साहाय्य करावें असा त्यानें निश्चय केला. लागलीच तो घोड्यावर स्वार होऊन रानांतून बाहेर पडला. अफ़ुझलखानाच्या छावणींत जाऊन त्यानें त्याची मुलाखत घेतली. त्यावेळीं खान व खंडेराव यांचें खलबत चाललें होतें, त्यावरून त्या सरदाराला त्यांचें अंतरंग चागलेंच कळून आलें.

---

## गोसावीणबाई : : २०

दुसऱ्याच्या घरीं राहाण्याचें दूषण फार कठीण असतें. त्यांतहि स्त्रियांना तर हें फारच दुःसह होतें. ज्याच्या घरीं आपण राहिलों आहों तो प्रत्यक्ष विष्णूप्रमाणें पूज्य व शुद्ध असला, तरी आपण त्याच्या घरीं किती दिवस रहावें, हा विचार आमच्या गोसावीणबाईच्या मनांत आल्याखेरीज राहीना. शिवाजीमहाराज शुद्धांतःकरणाचे केवळ प्रत्यक्ष अवतार. जिजा-बाईसाहेब म्हणजे प्रत्यक्ष मातेपेक्षांहि अधिक प्रेम करणाऱ्या, परंतु आपण अनाथ म्हणून आपल्याला त्यांच्याजवळ राहून दिवस काढावे लागत आहेत, हा विचारच तिला फार जाच करूं लागला. अशा स्थितींत राहण्यापेक्षां कोठें तरी तीर्थाचे ठिकाणीं जाऊन तेथें परमेश्वराच्या आराधनेंत आपण दिवस काढावे, असा विचार तिच्या मनांत घोळूं लागला. अशा विचारांत

सुमारें पंधरा दिवस लोटल्यावर इतःपर असेंच येथें राहणें गैर, आपण येथून तात्काळ तीर्थयात्रेला निघून जावें, असा तिनें आपल्या मनाशीं पक्का निश्चय केला. आपला बेत जिजाबाईसाहेबांच्या कानावर घातला असतां त्या आपल्याला कधींहि अनुमोदन देणार नाहींत, उलट आपला निषेधच करतील हें तिला स्पष्ट दिसत होतें. परंतु जी माऊली आपल्यावर मुलीपेक्षां जास्त प्रेम करते, तिला कळविल्याखेरीज तेथून निघून जाणें अत्यंत अयोग्य हेंहि तिला दिसत होतें. शेवटीं हो ना करितां करितां तिनें एके दिवशीं आईसाहेबांच्याजवळ तीर्थयात्रेला जाण्याची गोष्ट काढली. त्याबरोबर त्या म्हणाल्या, "अग, हा काय तुझा वेड्यासारखा विचार? तूं केवढी, दिवस हे कोण्या प्रकारचे, आणखी तूं तीर्थयात्रा करीत हिंडणार? तीर्थयात्रा करावयाला अजून पुष्कळ अवकाश आहे. खरोखर, माझ्या आशीर्वादानें तुझी आणि तुझ्या नवऱ्याची भेट खचित होईल. तूं काळजी करूं नकोस. तुझी जाण्याची गोष्ट निघाली कीं, मला कसंसंच होतं. तेव्हां तूं आपला विचार सोड, व पुनः कधींहि असली गोष्ट मजजवळ काढूं नकोस."

जिजाबाईसाहेबांच्या बोलण्यानें ती अगदीं स्तब्ध झाली, आणि कांहीं न बोलतां मुकाट्यानें बसली. परंतु तिचा निश्चय मात्र अढळ होता. आजच्या विचारण्याचा आईसाहेबांना थोडा विसर पडला म्हणजे आपण येथून चालतें व्हावें असें तिनें ठरविलें. आईसाहेबांचें म्हणणें ठीक, पण 'परगृहवास' तरी किती दिवस करायचा? ज्या परमेश्वरानें आपणांस आजपर्यंत अनेक संकटांतून सोडविलें व आपली अब्रू रक्षण केली, तोच पुढेंहि आपलें रक्षण करील, असा विचार करून तीनचार दिवस गेल्यावर एके दिवशीं भल्या पहांटे एक पांघरण्याचें वस्त्र घेऊन ती धीटपणानें गड उतरूं लागली. प्रतापगडावरील पहारेकऱ्यांच्या मनांत 'ही स्त्री एवढ्या पहांटे कोठें बरें जात असावी?' असा प्रश्न उभा राहूनहि तिच्याविषयींच्या विलक्षण आदरबुद्धीमुळें एकाचाहि हिय्या, तिला आडवें होऊन विचारावें, इतका झाला नाहीं. ती सरळ गेली, आणि त्यांनीं स्तब्धपणें तिला जाऊं दिलें.

प्रतापगड सोडून पुढें आल्यावर तिनें विचार केला कीं, वाई हें फार उत्तम क्षेत्र आहे; त्या ठिकाणीं कांहीं दिवस राहून मग कोठें जावयाचें तें ठरवावें. त्याप्रमाणें ती वाईच्या मार्गाला लागली. मध्यान्हीच्या सुमारास तिनें कृष्णाबाईच्या जलांत स्नान केलें. आणि त्या वेळीं सुधा शमवायला कांहीं नाहीं म्हणून ती एक दोन ओंजळी पाणी प्याली व पुनः आपली वाट चालूं लागली. वाटेंत तिला एक खेडें लागलें. अत्यंत थकल्यामुळें तिनें प्रथम ज्या घरांत पाऊल घातलें तेथेंच ती मटकन् बसली. तेथें फक्त तीन बायका होत्या. त्यांस तिनें आपल्याला कोणी कांहीं खायला दिलें तर आपल्यावर मोठे उपकार होतील, असें कसें तरी म्हटलें. आमच्या गोसावीण-बाईची चर्याच अशी होती कीं, तिला पाहिल्याबरोबर तिच्याविषयीं आदर व भक्ति उत्पन्न व्हावी. त्याप्रमाणें तिला पाहिल्याबरोबर त्या घरांतील मंडळींच्या मनांत एकदम आदर उत्पन्न झाला. आपल्या घरीं अशी गोसावीण-बाई आली याबद्दल त्या घरच्या मंडळींना आनंद झाला; त्या मंडळींनीं तिच्याकरितां लवकर थोडेंसें अन्न तयार केलें, आणि तें तिला मोठ्या प्रेमानें खाऊं घातलें. तिचें जेवण झाल्यावर त्यांनीं तिला एके बाजूस स्वस्थपणें पडण्यासाठीं जागा करून दिली, आणि नम्रपणानें असेंहि विनविलें कीं, "आपणास जितके दिवस रहावेंसें वाटेल तितके दिवस येथें रहावें, बिलकूल संकोच करूं नये; आम्हांला जी मीठभाकर अनुकूल आहे, ती आपल्याला आम्ही घालूं आणि आपली सेवा करूं."

"तुम्हीं मला आसरा दिलात, मला अन्न दिलेंत, तुमचे माझ्यावर फार उपकार झाले. देव तुमचं कल्याण करील, तुमच्या कुटुंबाचं नांव होईल, असा माझा तुम्हांला आशिर्वाद आहे. आजकाल शिवाजीमहाराज गो-ब्राह्मणांचा छळ दूर व्हावा, आणखी स्वराज्य व्हावं म्हणून केवढा तरी खटाटोप करीत आहेत. तुमच्या घरांत कोणी लढाईवर जाण्यासारखा पुरुष असला तर त्याला महाराजांकडे पाठवा. ते त्याचा चांगला परामर्ष घेतील."

तें बोलणें ऐकून त्या तीन स्त्रियांपैकीं जी म्हातारी होती तिनें एक दीर्घ उसासा टाकला. तो उसासा ऐकण्याबरोबर आमची गोसावीणबाई थोडी चपापली. आपल्या बोलण्यामुळें या बायांना फार वाईट वाटलें आहे हें पाहून ती म्हणाली, "बाई, आपण कांहींच उत्तर न देतां मोठा सुस्कारा टाकून स्वस्थ बसलांत ? आपल्या घराण्यांतील कोणा शूर पुरुषावर कांहीं संकट आलें होतें काय ? आलें असल्यास मी त्याहीबद्दल परमेश्वराची करुणा भाकून तें निवारण करीन. तुम्हांला अगदीं काळजी नको."

थोड्या वेळानें ती वृद्ध स्त्री म्हणाली, "गोसावीणबाई, मी आपल्याला काय सांगूं ? आमच्या घराण्यावर जो डोंगर कोसळला आहे, तो कांहीं तोंडानें सांगतां येत नाहीं. माझा सोन्यासारखा मुलगा..." तिला पुढें शब्द काढवेना. तिचा कंठ अगदीं दाटून गेला. शेवटीं बराच वेळ गेल्यावर ती म्हणाली, "बाई, माझा मुलगा शिवाजीमहाराजांच्या सेवेंत होता. परंतु त्याच्यावर त्यांची एकाएकीं नाराजी होऊन त्यांनीं त्याला आपल्यापासून दूर केलें, आणि त्यामुळें त्याला फार वाईट वाटून तो कोणीकडे निघून गेला त्याचा पत्ता नाहीं. माझ्या पोराला महाराजांनीं अगदीं लहानपणापासून आपल्याजवळ बाळगलं; आणखी त्याला चांगल्या पदवीला चढवलं, पण त्यांची कदर फार. काय म्हणे त्यांनीं त्याला अमुक ठिकाणीं जायला सांगितलं होतं, आणखी तो तिकडे न जातां दुसरीकडे गेला. तिथें कोणा एका थोर कुलीन मराठ्या बाईचा एका पठाणानें पाठलाग केल्याकारणानं तिला सोडवावयाची त्यानं खटपट केली. त्यांत त्याला बऱ्याच जखमा झाल्या. त्या जखमांनीं तो अगदीं जायबंदी झाला. पुढें त्याला कुठल्या गांवीं नेलं, आणखी तिथें थोडे दिवस त्याला त्या लोकांनीं ठेवून घेऊन तो बरा झाल्यावर इकडे रवाना केलं. महाराजांच्या समोर तो गेला मात्र, त्यांनीं पहिला प्रश्न त्याला विचारला तो 'तुला मीं जायला सांगितलं होतं तिकडे जायचं सोडून तूं दुसऱ्या मार्गाला गेलासच कां? त्यानं भीत भीत कसेंबसें उत्तर दिलें. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. 'तूं त्या स्त्रीला सोडविलीस

त्याच्याबद्दल मी तुला बक्षीस देईन, पण सांगितलेलें काम एका बाजूला ठेवून दुसऱ्या रस्त्याला गेल्याबद्दल तुला मी शिक्षाच करीन.' असें म्हणून त्यांनीं त्याला हुकूम केला कीं, 'तूं पुनः मी बोलावीपर्यंत मला तोंड दाखवावयाला येऊं नको.' बाई, या हुकुमामुळें माझ्या सावळ्याला बघा मेल्यापेक्षां मेल्यासारखें झालं. त्यानें वाटेल ती दुसरी शिक्षा आनंदानें भोगली असती. आपला हात कलम करून ठेवायला सांगितला असता तरी त्यानें ठेविला असता, पण बाई, महाराजांचं दर्शन अंतरल्यामुळें त्याला पाण्यावीण जसा मासा तळमळतो तसं झालं आणि तो कोणीकडे गेला त्याचा पत्ता नाहीं. बाई, महाराजांनीं तरी एवढ्याशा चुकीबद्दल केवढी जबर शिक्षा केली? माझा मुलगा मला नाहींसा झाला. मला कांहीं सुचत नाहीं. बाई मी अगदीं वेडी झाली आहें."

तें बोलणें ऐकून गोसावीणबाई फारच विचारांत पडली. एकंदर हकीकत आपल्या हकीकतीशीं अगदीं तंतोतंत जुळते आहे, व ज्या वीरपुरुषानें आपल्याला पठाणाच्या तडाक्यांतून सोडविलें तो या बाईचाच मुलगा होय अशी तिची खात्री झाली. ज्यानें आपल्याकरितां आपल्या स्वामीची आज्ञा मोडली, व आपला जीव आणि अब्रू वांचविण्यासाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घातला, त्याच्यावरचें संकट टाळण्याचा प्रयत्न आपण केला नाहीं तर आपल्यासारखे कृतघ्न आपणच. आपण आल्या वाटेनें परत जाऊन आईसाहेबांजवळ मागणें मागावें, आणि त्या तरुण वीरावर पुनः महाराजांची पूर्वीप्रमाणें कृपादृष्टि होईल असें करावें; उपकाराची फेड करण्याचा, कर्तव्य बजावण्याचा, हाच उत्तम मार्ग होय असें तिनें आपल्या मनाशीं ठरविलें. आपण परत गडावर गेलों म्हणजे आईसाहेब कांहीं केल्या आपणांस तीर्थयात्रेला सोडणार नाहींत, अखंड आपल्यापाशींच ठेवून घेतील, ही भीति तिला होती. परंतु या भीतीला तिनें आपल्या मनांत फार वेळ थारा दिला नाहीं. आपलें कर्तव्य करण्याचा पहिला निश्चय तिनें कायम केला.

आतां रात्र झाली होती. मनाचा निश्चय झाल्यानें तिचें मन स्वस्थ झालें.

तिला थोडी झोंपहि आली. पहांट होतांच ती जागीं होऊन परमेश्वराला आळवणाऱ्या भूपाळया वगैरे गाणीं म्हणूं लागली. तिचा मंजुळ स्वर ऐकून ती म्हातारी उठून तिच्याजवळ आली, आणि म्हणाली, "गोसावीणबाई, मला असं स्वप्न पडलं कीं माझा सावळया मोठ्या विहिरींत पडला आहे, आणखी तुम्ही त्या विहिरीच्या कांठावर उभ्या असून त्याला मोठा थोरला दोर टाकून वर यायला सांगतां आहां; आणखी तो दोराला धरून वर येऊं लागला आहे! तें पाहून मला मोठा हर्ष झाला, आणखी त्या हर्षाच्या भरांतच मी जागीं झालें. याचा अर्थ तुमच्या हातून तो या संकटांतून निघणार आहे. गोसावीणबाई, म्हणा, तुमच्या गोड भूपाळया म्हणा. म्हणजे गजेंद्राला संकटांतून सोडवणारा श्रीविष्णु माझ्याहि मुलाला सोडवायला येईल. बाई, तुम्हीं कांहीं म्हणा, तुमच्यावर माझा विश्वास आहे. तुम्ही कराल तर आमचं काम होईल. महाराज माझ्या सावळयाला पुनः जवळ करतील. माझा मुलगा मला मिळेल. माझं स्वप्न कधीं खोटं व्हायचं नाहीं."

तेव्हां गोसावीण म्हणाली, "बाई, तुला स्वप्न पडलें, त्यांतील कदाचित् कांहीं खरें होणार असेल. माझी आणखी जिजाबाईसाहेबांची ओळख आहे. मी आलें ही त्यांच्याकडूनच आलें, परंतु तुमच्याकरितां पुनः जातें आणखी काय त्यांना सांगून होईल तें पाहतें. तुम्हीं काळजी करूं नका. तुमच्या स्वप्नाप्रमाणें कदाचित् माझ्या हातून खरोखरीच तुम्हांला साहाय्य होईल. महाराजांचा जर त्यानं फार मोठा अपराध केला नसला, तर महाराज त्याला क्षमा करतील. नाहीं करणार असं मला वाटत नाहीं. प्रयत्न माझा. नशीब त्याचं आणि तुमचं. यापेक्षां मी जास्त काय सांगणार?" इतकें बोलून ती त्या बायांचा निरोप घेऊन तेथून निघाली.

कारण कौतुकतेनें तिच्या मनांत नानाप्रकारचे विचार येत होते. पण ते सर्व स्वतः-संबंधानें नसून रानांत घडलेल्या गोष्टींबद्दल होते. त्यामुळें तिला चंद्रराव मोऱ्याच्या मुलीची आठवण झाली. तिच्यासारखीं गाढ विकाराचीं व दृढनिश्चयाचीं माणसें ज्या बाजूला वळतील त्या बाजूला, अगदीं निष्ठेनें आपल्या स्वतःस वाहून घेतील. एकदां कां तीं परमेश्वराच्या भक्तीला लागलीं म्हणजे मग त्यांना दुसरा कांहींसुद्धां विषय सुचावयाचा नाहीं. तेव्हां आपण रानांत जाऊन तिला भेटावें व तिचें मन वळवून आपल्याबरोबर तिला तीर्थयात्रा करण्यासाठीं घ्यावें, हा विचार मनांत येऊन ती एकदम त्या रानाकडे वळली. ती पूर्वीच्या ठिकाणीं आली तों तेथें तिला कांहींसुद्धां दिसेना. ही कोठें गेली ? 'वेड लागून कोठें तरी रानांत बहकून हिंडते आहे' असें तिनें गडावर असतांना ऐकलें होतें. तेव्हां आपण सबंध रानभर जर हिंडलों, तर आपल्याला ती भेटल्याखेरीज रहावयाची नाहीं, असें वाटून ती तिचा चोहोंकडे शोध करूं लागली. शोध करितां करितां एका झाडांच्या राईतून कांहीं आवाज येत आहेत असें वाटून ती थबकली. त्यांपैकीं एक आवाज ऐकण्याबरोबर तर ती दचकून सभोंवतालीं पाहूं लागली.

आपण ऐकतों हें स्वप्नांत ऐकतों आहोंत कीं जागेपणीं ! याचीच तिला यावेळीं भ्रांति पडली. कोण बोलतें आहे हें जाणण्याची तिला अनिवार उत्कंठा लागून ती त्या आवाजाच्या बाजूनें पुढें जाऊं लागली. त्या झाडांच्या राईजवळ जातांच पुनः एकदां तोच आवाज, ज्या आवाजानें तिला अगदीं भ्रमिष्टासारखें बनविलें, तो आवाज, तिच्या कानीं पडला. त्याबरोबर ती पुनः थबकली. तिनें आपले डोळे मिटले. "देवा, मला किती वेळ तूं या स्वप्नांत ठेवणार ? का एकदम जागी करून पहिल्यासारखी दुःखसागरांत लोटणार ? असा मीं तुझा अपराध तरी काय केला ! ... छे ! आवाजासारखे आवाज पुष्कळ असतात, पण आवाजांत इतका सारखेपणा ? मुळींच नसेल. कोणी भाऊ असता तर एक वेळ शंका घ्यायला कारण होतें. तेव्हां

तेच असतील. पण छे! माझं इतकं चांगलं नशीब कुठलं? देवा, माझ्या दुःखाचा अगदीं कडेलोट व्हावा, म्हणूनच कीं काय माझ्या आशेची तूं अशी निराशा करणार ?" अशा स्थितींत ती उभी असतां तोच आवाज फारच स्पष्टपणें पुनः कानीं पडला. त्याबरोबर आपली आशा एकदां सफल होते कीं काय हें पहावें, नाहींपेक्षां तिची पूर्णपणें निराशा तरी करून घ्यावी असा मनाचा निर्धार करून ती राईच्या अगदीं जवळ गेली, तोंच पुढील शब्द स्पष्टपणें तिच्या कानीं पडले: "काय, अजून ती तिथेंच आहे? आणखी मी मेलों, मला त्या पठाणांनीं ठार मारलें, असें पक्कें कळलें असून ती त्यांच्याजवळ राहिली आहे? तूं मला सांगतोस तरी काय ?"

"जें खरें आहे तेंच; आणखी काय सांगणार ? अरे मूर्खा, चांगली वस्तु कोणाच्याहि हातीं सांपडली तर तो ती सोडून द्यायला तयार नसतों; अशी प्रत्यक्ष अप्सरा ताब्यांत आल्यावर तिला कोण सोडील? त्यांतून तो म्हणजे दरोडेखोरांचा नाईक !"

"मी एकदां पूर्वीं तुला भेटलों, तेव्हां तूं माझ्या मनांत हीच गोष्ट भरवून देत होतीस आणि वेड्यासारखा मी तुझ्यावर थोडाबहुत विश्वास ठेविला. मी तुला कोणी तरी महासाधु समजत होतों, परंतु आतां मला तुझा एकंदर इतिहास कळला आहे. तेव्हां तूं कोण, आणखी शिवाजीमहाराजांची निंदा कां करितेस, हें मला सर्व समजलें आहे. तो फार पुण्यवान् पुरुष. त्यानें तुझ्या बापाचा खून करवला नसेल. त्याला नकळत त्याच्या लोकांनीं तो केला असेल. आणखी यदाकदाचित् त्याला कळून झाला असला, तरी काय हरकत होती? स्वराज्य स्थापन करतेवेळीं जे जे शत्रू उत्पन्न होतील त्यांचा त्यांचा समाचार घेतल्याखेरीज इष्ट कार्य साध्य होणार कसें? तें कांहीं नाहीं. आतां मी तुझें कांहींसुद्धां ऐकणार नाहीं."

"अहाहा, काय पण दिवस आले आहेत ? कोणी कोणाची बायको चांगलीशी पाहून घेतली, आणखी तें प्रत्यक्ष नवऱ्याला कळलें तरी तो तिकडे कानाडोळा करतो! अरे मूर्खा, तुझी बायको त्या..."

परंतु पुढले शब्द तिच्या तोंडून पुरतेपणीं निघण्यापूर्वींच आमची संतीण पुढें होऊन ओरडून म्हणाली, " अग अवदसे, तूं हें कोणाबद्दल बोलते आहेस, ह्याच्याबद्दल तुला कांहीं तरी लाज ? तुझ्या जिभेचे शतशः तुकडे कां नाहीं झाले ? "

"माझ्या बापाचा खून झाला, म्हणून मी त्याचा खून करणाऱ्यावर सूड उगवण्याचा घाट घातला. परंतु त्यावेळीं चांडाळणी तूं आड येऊन माझा सगळा व्यूह ढांसळून टाकलास. त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून तुझ्यावर सूड उगवण्याचा यत्न करूं लागलें, तर तूंच प्रत्यक्ष येऊन तोहि बेत फसवून टाकलास. परंतु तेवढ्यानें काय होणार ? पहा आतां ! "

असें बोलून ती पळण्याची तयारी करूं लागली. संतीण तिला धरायला म्हणून पुढें होऊन तिच्या अंगाला हात लावणार, तों ती एखाद्या हिंस्र व चवताळलेल्या पशूप्रमाणें किंकाळून, एखाद्या चपळ हरिणीप्रमाणें कोणी-कडच्या कोणीकडे निघून गेली. तिच्या पाठोपाठ धांवणें अगदीं अशक्य होतें. ती येथून निघून गेल्यानंतर मात्र थोडा वेळ संतीण खालीं मान घालून उभी राहिली. तिच्याकडे तिचा पति—त्या वेडीशीं बोलत असलेला इसम तिचा पतीच होता—कांहीं लज्जा, कांहीं आनंद यांनीं युक्त अशा दृष्टीनें पहात होता. शेवटीं तो पत्नीस म्हणाला, "ही विभूति लावून तूं संतिणीचा वेष काय म्हणून घेतलास ? "

तिची दृष्टि अगदीं अश्रुपूर्ण झाली होती आणि तिचा कंठ तर इतका दाटून गेला होता कीं तिला किती वेळपर्यंत एक शब्दहि बोलवेना. शेवटीं ती अडखळत म्हणाली, "प्राण निघून गेल्यानंतर शरीराची रक्षाच होणार, नाहीं तर दुसरें काय होणार ? त्या चकमकींत जी बाकीच्यांची वाट झाली, तीच इकडचीहि झाली अशी मनाला खात्री वाटूं लागली. मग शरीराचें सार्थक करण्याला तीर्थयात्रा करण्याखेरीज मार्ग राहिला नाहीं असा निर्धार करून मी निघालें. "

" या वेडीनें माझें डोकें अगदीं वेडें करून सोडलें होतें. तिच्या बोलण्यावर

मीं भरंवसा तरी कसा ठेविला याचा मलाच अचंबा वाटतो. आपले दोनहि माणसांविषयीं...छे ! छे ! पण आतां ते विचार सुद्धां नको. आतां तुला तीर्थयात्रेला जाण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं. पण गडावर होतीस तेथून तूं कां निघालीस ?"

"दुसऱ्याच्या घरीं किती दिवस राहणार ? असें वाटून तीर्थयात्रेला जाण्याचा मीं निश्चय केला. जिजाबाईसाहेबांनीं येथून जाऊं नको म्हणून परोपरीनें विनविलें, परंतु मीं कांहीं त्यांचें ऐकलें नाहीं. मीं गडावरून खालीं उतरलें आणि क्षेत्राची वाट चालूं लागलें. परंतु मध्यें कांहीं अडचण आल्यामुळें मी पुनः आईसाहेबांकडे चाललें होतें, तों वाटेंत या चांडाळणीचें हें बोलणें ऐकलें. पुढची हकीकत आपल्याला विदित आहेच."

तें ऐकल्यावर तो म्हणाला, "माझी हकीकत कांहीं विशेष नाहीं. मी बेशुद्ध असा पडलों असतां तिकडून आणखी कोणी प्रवासी आले. त्यांनीं मला पाणी वगैरे पाजून औषध देऊन शुद्धीवर आणलें. नंतर ते मला आपल्याबरोबर दक्षिणेंत कर्नाटकाकडे घेऊन जाऊं लागले. तेव्हां कांहीं वेळपर्यंत मी त्यांजबरोबर गेलों, परंतु मला थोडीशी ताकद येतांच मीं परत येण्याची व्यवस्था केली. आपल्या मंडळींपैकीं कोणकोण जिवंत राहिले याचा शोध केला. तेव्हां असें कळलें कीं कोणीच राहिलें नाहीं. मग अगदीं हताश होऊन आपल्या पहिल्या बेताप्रमाणें महाराजांकडे जाण्याला सिद्ध झालों. त्याप्रमाणें चाललों असतां वाटेंत अफझलखानाची व माझी भेट झाली. त्याचा एकंदर काय कावा आहे तेंहि मला कळलें, तेव्हां लागलीच महाराजांकडे जाऊन ती बातमी मी त्यांना सांगितली. महाराजांनींहि ती शांतपणें ऐकून घेतली. आणखी पुनः जास्त माहिती मिळवायला म्हणून मी तेथून निघालों, तों वाटेंत ही मला दिसली. पाहिल्या प्रथम हिच्याबद्दल माझ्या मनांत फार पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. ती स्त्री असेल असा पहिल्यानें माझा तर्क झाला नाहीं. परंतु पुढें तें मला समजलें. तिनें भलतें भलतें बोलून माझें मन फार गोंधळून सोडलें. एक प्रकारचा वैतागहि आला मला. मनांत महा-

राजांच्यासंबंधानें पूर्वी जी भक्ति होती, ती पार नाहींशी झाली. आणखी महाराजांचा घात होईल, तर साधूं असा मनाचा निर्धार करून मी तेथून अफ़झल्खानाकडे जाण्यास निघालों. परंतु कांहीं वेळानें संशयपिशाच्चिकेचा झटका ओसरला. मग मीं असा विचार केला कीं, पुनः या रानांत येऊन त्या बैरागिणीपासून अधिक माहिती घेऊन खरा प्रकार काय आहे त्याची चौकशी करावी. तेव्हां अफ़झल्खानापाशीं कांहीं तरी सांगून पुनः या रानांत आलों. पुढची हकीकत तुला माहीतच आहे. आतां मला जास्ती बोलवत नाहीं. आपण दोघेंहि आतां बरोबर महाराजांकडे जाऊं आणि पहिल्या निश्चयाप्रमाणें त्यांची आणि स्वराज्याची सेवा करूं. झाल्या गोष्टी दोघेहि विसरून जाऊं."

नंतर तीं दोघें किल्ल्यावर महाराजांच्याकडे गेलीं. संतिणीस मुळींच मज्जाव नव्हता; उलट जिला शोधण्यासाठीं आईसाहेबांनीं माणसांवर माणसें पाठविलीं होतीं, ती संतीण आलेली पाहतांच सर्वांस आनंद झाला.

---

## दोघांचा विचार : : २२

महाराजांच्या आज्ञेप्रमाणें त्या वेषधारी लमाण लोकांनीं जावळीच्या रानांतून मधून मधून अर्धा अर्धा मैल दुतर्फा दाट गर्द झाडी राखून रस्ता साफ करीत आणला. त्या कामीं त्यांनीं यत्किंचितहि कसूर केली नाहीं. ते आतां महाराजांचे अगदीं एकनिष्ठ सेवक बनले होते. महाराजांस अफ़झल्खानाकरतां रस्ता तयार करणें व त्याच्या सुखसोईकरितां इतर अनेक प्रकारांनीं अट्टाहास करणें हें आवडत होतें असें थोडेंच आहे? उलट त्यांना ह्या गोष्टीचें अतोनात वाईट वाटत होतें. परंतु शत्रूच्या प्रचंड सैन्याशीं तोंड देणें आजच आपल्याला शक्य नाहीं, तेव्हां आपली तयारी पुरी होईपर्यंत 'सुसरीबाई तुझीच पाठ मऊ' असें म्हणून पडती घेतली पाहिजे, असा त्यांनीं विचार केला होता. महाराजांच्या निःसीम भक्तांना मात्र असें वाटत होतें कीं, महाराजांनीं आतां पडतें घेऊं नये, आपलें

सगळें सैन्य जमा करून तडाखा उडवावा. अफ़झलखान इकडे येण्याला निघाला कीं एखाद्या खिंडारांत अगर वाटेवरील एखाद्या गर्द झाडींत त्याला गांठून त्याचें चंदन उडवावें. त्याला विश्वास मात्र असा दाखवावा, कीं आपण अगदीं शरणागत आहों. परंतु महाराजांना अविचाराचें साहस करावयाचें नव्हतें, किंवा शत्रू सरळ असला तर त्याला कपटी विश्वासघातानें फसवावयाचेंहि पण नव्हतें.

इकडे अफ़झलखान मात्र अहंतेनें अगदीं वेडावून गेला होता. शिवाजीनें आपल्यासाठीं जावळीच्या रानांतून अगदीं नवीन रस्ता केला आहे, व ठिकठिकाणीं सरबराईच्या उत्कृष्ट तजविजी चालविल्या आहेत, हें कळल्या-पासून तर त्याला स्वर्ग दोन बोटेंसुद्धां उरला नव्हता. शिवाजी अगदीं घाबरला आहे, आपण त्याला गिरफदार करून नेणार, असें तो ज्याच्या-त्याच्याशीं बेभानपणें बोलूं लागला. एके दिवशीं तो आपल्या वकिलाला म्हणाला, "पंत, शिवाजी अगदीं घाबरून गेला आहे. तुम्हीं पाहिलेंतना, तो आमची कशी पायधरणी करतो आहे? आतां आपण जें कर म्हणून सांगूं तें तो करील. नाहीं म्हणण्याची त्याची काय छाती आहे? पंत, कांहींहि करून मी आपली प्रतिज्ञा सिद्धीस नेणार. मी त्याला जिवंत सांपडला तर जिवंत, मारावा लागला तर मारून, पण तख्तापुढें नेऊन उभा करणार. त्याशिवाय मी येथून हलणार नाहीं."

"खाविंद, आज आपण म्हणाल त्या अटी तो कबूल करील. आपण सांगाल त्याच्या बाहेर नाहीं अशी तो आणभाकहि करील. परंतु आपण त्याला जर आपल्याबरोबर विजापुरास चल म्हणून म्हणाल, तर मात्र तो येईल असें मला वाटत नाहीं. त्याप्रमाणें तो आपल्या छावणींत मुलाखतीला येणार नाहीं. बाकी सर्व अटी तो मान्य करील. खाविंद, शिवाजी आपणांस शरण आला आहे. जो आपला शत्रू म्हणून आजपर्यंत दांडगाई करीत होता, तो आपला बंदा नौकर म्हणून जर कबूल झाला, तर आपल्या प्रतिज्ञेचा भंग झाला असें कोण म्हणेल? त्याला प्रत्यक्ष पकडून नेण्यांतच कांहीं

प्रतिज्ञा खरी होणार, आणि शरण आल्यानें होणार नाहीं, ही समजूत बरोबर नाहीं. मी स्पष्ट बोलतों आहे. क्षमा करावी."

"पंत, आजपर्यंत तुम्हीं शिवाजीच्या लबाडीच्या किती तरी गोष्टी ऐकल्या आहेत. तो आतां तोंडावर एक बोलेल, पुनः तोंड फिरलें कीं, काय वाटेल तें तो करील. असें असून तुम्ही म्हणतां कीं आपल्याला शरण आलेल्या माणसास गिरफदार काय करायचा? आपला बंदा म्हणवतो आणखी काय पाहिजे? अहो, बंदा आतां म्हणवील पण माझें पाय विजापुरला लागतात न लागतात तों इकडून बातम्या येतील कीं अमुक मुलुखांत त्यानें लुटालूट केली. हें सगळें टाळायला मार्ग एक—त्याला नाहींसा तरी करावयाचा, किंवा विजापुरला नेऊन कैदेंत तरी टाकायचा; यापेक्षां दुसरी तोड नाहीं. तो बंदा झाला म्हणजे इमानानें वागेल हें आपल्याला तर कांहीं शक्य दिसत नाहीं."

"मग त्याला स्पष्ट सांगूनच कां हें सर्व करीत नाहीं?"

"नाहीं! नाहीं! तसें आतां करावयाचें नाहीं. त्याच्या गोटांत जाऊन त्याची मुंडी धरून मी त्याला वांकवीन तरच खरा अफझलखान? मी तर ऐकलें आहे कीं, तो उगीच खुजा आहे. तो आमच्या कमरेलाहि लागणार नाहीं. त्याला वांकवायला किती उशीर लागणार? आमचा नुसता हात त्याच्या मानेवर ठेवला म्हणजे झालें!" मनांत कांहीं येऊन खान त्यास पुनः म्हणाला, "पंत, शिवाजी मोठा भोळा दिसतो. जो कोणी त्याच्याकडे जाऊन मी आपली सेवा करण्याला आलों असें म्हणेल त्याला आश्रय देतो, तो काय बोलेल तें त्याला खरें वाटतें. परवांपासून दोन असामी याप्रमाणें त्याला फसवून आले, पण त्याची त्याला दादच नाहीं."

"खाविंद, आपण समजतां तसा शिवाजी भोळा नाहीं. तो फसणारा खचित नाहीं. कोणी माणूस 'मी आपल्या सेवेसाठीं आलों आहें' असें म्हणाला म्हणजे एवढ्यावर तो त्याला आश्रय देऊन आपल्या अंतस्थ विचारांत घेईल हें संभवत नाहीं. शिवाजीला फसवून आलों म्हणून जे

आपल्याला सांगत येतील, आणखी तिकडच्या बातम्या म्हणून सांगतील, त्यांवर विश्वास ठेवूं नका. आपले म्हणून गेलेले लोकसुद्धां आपल्या उलट करण्याची कला त्या शिवाजीला उत्कृष्ट अवगत आहे. त्याच्या बोलण्यांत जी मिठास आहे म्हणतात ती कांहीं अजब आहे!... खाविंद, त्याचा एकंदर झोंक एवढाच दिसतो आहे कीं, आपण विजापूरच्या तख्ताचे पिढीजाद नोकर आहों, आणखी आपण तसेंच राहूं. परंतु विजापुरला कांहीं येणार नाहीं, आणखी खानसाहेबांच्या छावणीवरहि येणार नाहीं. तह, करारनामा, जें काय पाहिजे तें करून देण्याला आपण तयार आहोंत. पण जें काय व्हायचें तें इथें आपल्या गोटांत झालें पाहिजे. आणखी तेवढ्यामुळें तर तो आपल्याला तिकडे बोलावतो आहे."

"पंत, तुम्हीं मला कितीदां तरी हें सांगितलें आहे. आणखी ती त्याची अट आम्हीं तुमच्या आग्रहावरून मान्यहि केली आहे; आणि ती मान्य करण्यांत माझा हेतु त्याच्या गोटांत जाऊन त्याला गिरफदार करून आणावें असा आहे. पण पंत, शिवाजी आमच्या एवढ्या मोठ्या सैन्याला आपल्या गोटांत बोलावतो याचें मला नवल वाटतें. हें लष्कर काय दंगा माजवील याची कांहीं तरी त्याला शंका? काय वेडा आहे?"

"खाविंद, आपलें लष्कर मोठें आहे खरें; परंतु एवढें सगळें आपण कसें नेणार आणि कुठें ठेवणार? निवडक लोकांनिशीं जाऊन त्याच्याशीं काय बोलायचें तें बोलून यावें. जर त्यानें आपलें ऐकलें नाहीं, तर लष्कर नेण्याच्या भानगडींत पडावें. आपलें एवढें थोरलें लष्कर तेथें आहे असें पाहिलें, म्हणजे तो मुळींच भेटायला येणार नाहीं; आणि सर्वच कांहीं बिघडून जाईल. परवांच्या आमच्या बोलण्यांत ही गोष्ट निघाली होती. बऱ्याच वादविवादानंतर त्यानें एवढें मान्य केलें "कांहीं हरकत नाहीं. खानसाहेबांना आपलें लष्कर घेऊन येऊं द्या. त्याला कोण नको म्हणत आहे? पण आमच्यापासून निदान पांच कोस तरी तें लांब असलें पाहिजे. नाहीं तर 'आम्हांला कांहीं तुमचा विश्वास यायचा नाहीं.' आपण आतां त्याच्याही-

पेक्षां अधिक अटी घालूं लागलां, किंवा भेटीच्या जागेपर्यंत आपली शिबंदी नेतों म्हणालां, तर त्याच्या पोटांत संशय उत्पन्न झाल्याखेरीज कधीं राहाणार नाहीं. आणखी एकदां संशय आला, म्हणजे मग तो आपल्या थाऱ्यास उभासुद्धां राहणार नाहीं. तो सगळया देशभर धुमाकूळ घालीत हिंडेल. आज इकडे हूल दाखवील, उद्यां पन्नास कोसांवर कुठें तरी निघाल्याची बातमी येईल. आपला बेत फसेल, निदान साधण्यास अनंत प्रयास पडतील. म्हणून खाविंद, माझें आपणांस निक्षून सांगणें आहे कीं, एकदां थोडे कां होईना, निवडक लोक घेऊन चला. त्याची भेट घ्या. वाटल्यास अलीकडे कांहीं अंतरावर आपलें बरेंचसें लष्कर ठेवा. पण त्याला बिथरूं देऊं नका. हीच युक्ति आपण लढवा म्हणजे आपण फसणार नाहीं. तो मात्र आपल्या जाळयांत सांपडेल. याउपर खाविंदांची मर्जी."

या बोलण्याचा खानाच्या मनावर परिणाम झाला. आपण सरळ मार्गानें गेलों तर आपला हेतु साध्य होणार नाहीं. शिवाजीस त्याच्या म्हणण्याप्रमाणें आपण सर्व गोष्टी कबूल कराव्या, म्हणजे तो गाफील होईल. आणखी तशा गाफील स्थितींत आपण त्यास गांठून पकडलें कीं, आपला कार्यभाग झालाच. जों जों हे विचार त्याच्या मनांत येऊं लागले, तों तों त्याच बेतानें आपली प्रतिज्ञा सिद्धीस जाईल, आपण त्याला चांगला जाळयांत धरून कैद करूं, आणि पिंजऱ्यांत कोंडलेल्या वाघाप्रमाणें त्यास विजापुरास नेऊं अशी त्याला खात्री वाटूं लागली. मग काय कावा करावा हें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें.

बाह्यात्कारीं त्यानें आपण पंताच्या बोलण्याप्रमाणें वागणार असें दर्शविलें; इतकेंच नव्हे, तर वरील बोलणें झाल्यानंतर तिसरे दिवशीं सकाळींच पंतांस आपल्याकडे बोलावून घेऊन सांगितलें, "मी आज दोन दिवस येथेंच मुद्दाम मुक्काम थांबवून तुमच्या भाषणाचा विचार केला. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणेंच करावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. तुमचा विचार जास्त पोक्तपणाचा. माझा तर विचार आतां असा झाला आहे कीं, त्याच्याशीं

अगदीं सरळपणानें वागावें. तो हरकामी, हुशार, उमदा माणूस आहे, तेव्हां त्याला नाहींसा करण्यापेक्षां आपलासा करण्यांतच जास्ती फायदा आहे. त्यानें 'आमची भेटीची तयारी आहे, आपण या' असा निरोप पाठविला कीं, मग आम्ही तो म्हणेल तितकेच लोक घेऊन जाऊं. तो म्हणत असेल त्याच्या बाहेर एक रेंसभरसुद्धां जाणार नाहीं. पण आमच्या दोन अटी मात्र त्यानें कबूल केल्या पाहिजेत."

"दोन अटी कोणच्या?" पंतांनीं हळूंच विचारलें.

"एक ही कीं, त्यानें आमच्याबरोबर विजापुरास आलें पाहिजे आणि दुसरी ही कीं,त्यानें तख्ताचा नौकर म्हणून इकडच्या प्रांताची वहिवाट केली पाहिजे. पाहिजे तर त्याला आम्ही इकडल्या प्रांताची सुभेदारी देऊं."

खान हें बोलत असतां पंतांची दृष्टि मधून मधून त्याच्या तोंडाकडे जरा सूक्ष्मपणानें लागे. तीन दिवसांपूर्वीं जो आपल्याला अगदीं शब्द काढूं देत नव्हता, तोच आज पाहिला तर अगदीं त्याच्या उलट बोलतो आहे! याचा अर्थ काय? आज एवढा सौम्यपणा आला कोठून? त्याच्या मनांत लबाडी करायची आहे आणि तो कांहीं तरी कावा रचतो आहे अशी त्यांना जबर शंका आली. त्यांनीं खानाला पुष्कळ खोंचून प्रश्न विचारले. शेवटीं खानानें हांसून उत्तर दिलें, "शिवाजीनें आमच्याबरोबर विजापुरास येऊन हजरतीपुढें विजापुरच्या तख्ताचे बंदे नौकर म्हणून शपथ घ्यावी.आणखी इकडच्या प्रांताच्या सनदा घेऊन परत येऊन सुभेदारी करावी. एवढी गोष्ट कबूल करून तो आमच्याबरोबर आला, म्हणजे सर्व कांहीं त्यांत आलें. मग त्यानें मला एकटयाला भेटीला बोलाविलें तरी सुद्धां मी कबूल होईन. अगदीं एकटा हातांत कांहीं एक शस्त्र न घेतां येईन. एकदां जी गोष्ट ठरली ती ठरली, तिच्याबद्दल मग आंत बाहेर कशासाठीं? तुम्ही जाऊन हें आमचें म्हणणें त्याला कळवा. त्याचा होकार असला, तर पुढें काय ती तजवीज करायची. नसला तर आम्ही आमचा विचार करूं, त्याचा त्यानें करावा. मग पुनः कोणत्याहि प्रकारचीं तहाचीं वगैरे बोलणीं मी ऐकून

घेणार नाहीं. हा पक्का विचार मनांत करून त्यानें काय तें उत्तर द्यावें. हें माझें शेवटलें बोलणें म्हणून त्याला पक्कें समजावून सांगा."

इतकें बोलून त्यानें पंतांस तुम्ही जा, असें सुचविलें. पंतहि समजले आणि तेथून उठून चालते झाले. खानाचा कांहीं कपटहेतु आहे याबद्दल पंतांना फारशी शंका नव्हती. परंतु त्याचा अमुक कावा आहे हें त्यांना पूर्णपणें समजेना. खानाचा निरोप कळविण्यासाठीं ते प्रतापगडावर गेले. शिवाजी-महाराजांच्या वकिलांशीं त्यांनीं सर्व गोष्टींचा खुलासा केला. दोघेहि अगदीं मन मोकळें करून बोलले. नंतर पंतांनीं महाराजांची गांठ घेतली व त्यांना सर्व हकीकत निवेदन केली. महाराजांनीं आईसाहेबांचा विचार घेतला. त्या म्हणाल्या: "शिवबा, विजापूरला जाण्याचा तूं विचारसुद्धां मनांत आणूं नकोस. आणखी त्या खानाचा विश्वास तर मुळींच धरूं नकोस. एकदां का विजापुराला गेलास, कीं तुझ्या जिवाचें ते काय करतील आणखी काय नाहीं याचा नेम नाहीं. आपलें ठिकाण न सोडतां त्याचं म्हणणं कबूल करणं शक्य असेल तेवढं कर."नंतर महाराजांना देवी अंबाबाईचाहि दिव्य संदेश मिळाला. तो असा होता: "हें संकट तुम्ही कशास मोजितां ? त्याचे पोटीं पक्का कावा आहे. त्या काव्याशीं कावाच लाविला पाहिजे. भेटीला येऊं द्यावें. म्हणेल तें सध्यां कबूल केलें तर तो भेटीस येईल. नाहींपेक्षां येणार नाहीं. तरी हो म्हणून येऊं द्यावा. येतांच त्याचा कावा काय तें सहज समजेल. कावा समजला कीं, पारिपत्य करण्याला कोण असमर्थ आहे ? काळजी नको. माझें साह्य आहे. सिद्ध होणार."

महाराज म्हणाले, "पंत, खानास आमचा असा निरोप कळवा. 'विश्वासानें विश्वास वाढतो. आपली आमची भेट झाली म्हणजे मग सर्व उलगडा होईल. तोंपर्यंत होकार घेतला काय आणि न घेतला काय ? आम्ही भेटीसाठीं उत्सुक आहों हें व्यवस्थेवरून दिसतेंच आहे. कोणचेहि प्रकारें संशय यावा असें वर्तन इकडून झालें नाहीं. आपण येथें भेटीला यावें. दिलखुलासा होईल. मग कोणचेंहि काय ठरवावयाचें तें समक्षच ठरेल. त्याच्या बाहेर

आम्हीं नाहीं. आपले भेटीची तयारी आतां झाली आहे. मात्र आपण भेटीस म्हणून येतांना आम्हीं घाबरून जावें असा लवाजमा आणल्यास आमचा बचाव होणार नाहीं, हें प्रारंभींच कळविलें आहे.' असें आपण खानास कळवून निघाल्याचे वेळींच आम्हांस सर्व प्रकारची सूचना पाठवावी आणि पंत, तुम्हांला जास्त कांहीं सांगणें नको. तुम्हीं स्वधर्माचे कैवारी आहांतच. पूर्वीं तुम्हीं दिलेलें आश्वासन पाळालच.' खानाचा कांहीं विशेष कावा तुम्हांला कळला, तर तशी सूचना इकडे तुम्हीं कराल यांत तिळमात्र संदेह नाहीं."

---

## महाराजांचा खानास निरोप : : २३

महाराजांची अगदीं विश्वासांतली मंडळी आणखी महाराज स्वतः अगदीं एकांतांत बसून कांहीं मनसुबा करीत होती. ही विश्वासांतली मंडळी म्हणजे मातुःश्री जिजाबाईसाहेब, बालमित्र तानाजी, चिटणिस बाळाजी आवजी, मोरो त्रिमल व आणखी एक दोन जण असे होते. या मंडळीशिवाय त्यावेळीं महाराजांचा खानाकडे जाणारा येणारा वकील कृष्णाजी भास्कर हाहि होता. बराच वेळ बोलणीं झाल्यावर तो वकील म्हणाला, "महाराज, कसेंहि जरी असलें तरी आतां दिनावधीवर टाकण्यांत अर्थ नाहीं. खान फार उतावळा झाला आहे. आपल्याला केव्हां एकदां पकडून विजापुरास हजरतींपुढें उभें करीन असें त्याला होऊन गेलें आहे. परवां त्यानें असेंहि बोलून दाखविलें कीं आतां आठ चार दिवसांत जर भेटीचा दिवस आपल्याकडून मुक्रर झाला नाहीं, तर याच्यापुढें बिलकूल वाट न पाहतां प्रतापगडाला वेढा द्यावयाचा आणखी किल्ला स्वाधीन करून घेऊन सगळ्यांनाच गिरफदार करावयाचें."

"दे म्हणावं प्रतापगडाला वेढा. तुझ्या बेचाळीस पिढ्या किल्ल्यावर मारा करायला खालीं आल्या, तरी सुद्धां तो कांहीं दाद देणार नाहीं. महाराज, आपल्या मनानं काय घेतलं आहे कोणाला ठाऊक. त्याचं लष्कर प्रचंड

असलें, तरी माझी पक्की समजूत आहे कीं, आम्हीं त्याला आपल्या निवडक लोकांनिशीं जमीनदोस्त करून टाकूं. माझ्या दृष्टीनं त्याच्याशीं हिकमती करून त्याला पाडायला नको. सरळ तोंडाला तोंड दिलं तर काम होऊन जाणार आहे. आपली आज्ञा मात्र व्हावी. मी त्याची मंडळी काय जोमाची आहे हा सगळा अजमास काढून आणला आहे. इतके दिवस भलतेंच नांव घेऊन त्या मूर्खाबरोबर रानांत हिंडलों तो उगीच का!" यावर वकील मध्येंच म्हणाला, "त्या मूर्खाची ती एक बहारच आहे! तो येण्याबरोबर महाराजांनीं एकदम त्याला जवळ केलें, तें ऐकून खानाला असें वाटलें कीं, महाराजांच्याइतका भोळा माणूस सगळ्या दुनियेंत दुसरा कोणी नसेल; शत्रूकडून कांहीं तरी बातमी आणली आहे, त्या बातमीपासून हित होणार आहे, इतकं जो कोणी तोंडानें सांगेल त्याच्यावर आपला भरंवसा बसतो."

"वा!" महाराज म्हणाले, "तर मग आमच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं जुळून आलें म्हणावयाचें. मी मुद्दाम त्याच्याकडून आलों म्हणून सांगणाऱ्या प्रत्येक माणसाची गांठ घेतों, आणखी त्यानें सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीवर आपला भरंवसा बसला असें दाखवितों. हेतु हा कीं, लोकांनीं परत जाऊन त्याला आमचा असा अगदीं पोकळ कारभार आहे म्हणून सांगावें. त्याच्या त्या खंड्याला असें वाटतें कीं, आपल्या नुसत्या बोलण्यानें मी सर्वस्वीं त्याच्या मुठींत गेलों. पण आपला सर्व हेतु फसला हें दिसतांच तो आपोआप नाहींसा झाला. मी अगदींच भोळसर आहे अशी जर त्याची समजूत झाली असली, तर फारच मौज झाली..."

वकील मध्येंच म्हणाला, "होय महाराज. खानाची अगदीं अशीच पक्की समजूत झाली आहे, आणि म्हणूनच आपणांस कपटाच्या जाळ्यांत पकडून एका घटकेंत आपला नायनाट करणार अशी त्यास खात्री वाटूं लागली आहे व तशी तो बडबडहि करूं लागला आहे. तो आपली मुलाखत घेण्यासाठीं अगदीं उतावीळ झाला आहे. आज उद्यां इतक्यांत आपल्याला निरोप येईल पहा, कीं आतां यापुढें आम्हीं दिरंगाई चालूं देणार नाहीं. भेटीचा

कोणचा तो दिवस लवकर ठरवून टाका. नाहीं तर आम्हांला वाटेल तें आम्ही करूं-" आईसाहेब एकदम म्हणाल्या, "तो जर उतावळा झाला आहे, तर आपल्याला तरी दिरंगाई करण्याची काय जरूर आहे?"

याप्रमाणें बोलणीं चाललीं असतां खानाकडील वकील महाराजांचे भेटीस आले आहेत अशी वर्दी आली. महाराजांनीं त्यांची रात्रीं एकांतांत गांठ घेतली. इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर महाराज शेवटीं म्हणाले, "पंत, तुम्ही ब्राह्मण. आपल्या धर्माचा अभिमान जसा आम्हांस तसाच किंबहुना अधिक तुम्हांला. तेव्हां खानाचा अगदीं खरा खरा काय रोख आहे तो आम्हांला सांगा. म्हणजे आम्ही त्याप्रमाणें आपली तयारी ठेवूं. तो नष्टाई करणार नसला तर आम्ही त्याच्याशीं कपट करणार नाहीं. पण जर का त्याचा दगा करण्याचा बेत असला, तर त्याला आम्ही खाल्लुच्या-खेरीज रहाणार नाहीं. खान बाहेरून अगदीं सरळपणा दाखवीत आहे, पण त्याच्या पोटांत फार वाईट भाव आहे. आमच्या बातमीदारांनीं ज्या बातम्या आणल्या आहेत त्या जरी एका बाजूला ठेविल्या, तरीसुद्धां त्याच्याकडून मला फसवायला म्हणून जे लोक आले त्यांच्याच वर्तनावरून माझी खात्री झाली आहे कीं; त्याचा हेतु शुद्ध नाहीं; पण मला आपल्याकडून त्यानें काय तयारी चालविली आहे याची सविस्तर माहिती पाहिजे आहे."

"आपण अगदीं निरपेक्ष बुद्धीनें स्वधर्म व स्वराज्य याकरितां सगळा खटाटोप करतां आहां, हें पक्कें जाणूनच मीं आपल्याला पहिल्या भेटीला वचन दिलें कीं खानाची नष्टाई आपणांस समजावून देऊन साहाय्य करीन; खानाच्या मनांत कपटभाव तर आहेच आहे. पण तो कसें कपट करणार हें कांहीं बरोबर सांगतां येत नाहीं. त्याच्या मनानें असें घेतलें आहे कीं, आपण सर्वस्वीं फसतां आहां यामुळें तोहि विशेष कांहीं कपटाची तयारी करीत नाहीं. सहजगत्या हस्तगत करूं असा त्याला अभिमान वाटत आहे. कपटाला कपट लढविण्याची आपण तयारी ठेवावी. बरोबर हजार पंधराशें लष्कर आणून किल्ल्यावर हल्ला करण्याचा त्याचा विचार दिसतो. मुलाखतींत

आपल्याला पकडावें आणि किल्ला काबीज करावा ही इच्छा दिसते आहे तेव्हां तेंहि एक लक्षांत धरून आपली तयारी चालवावी. मला त्यानें पुनः एवढ्याकरितांच पाठविलें आहे कीं, 'आपण तुमच्या चाळवण्या ऐकणार नाहीं. भेटीबद्दल काय काय आपल्या अटी असतील त्या सगळ्या आम्हांला कबूल, परंतु एकवार भेट होऊन काय बोलणीं बोलायचीं त्याचा निकाल लावावा,' असें निक्षून मीं आपणांस सांगावें."

महाराज म्हणाले, "पंत, खानास आमचा असा निरोप कळवा. 'आम्ही भेट घेण्यास तयार आहों. आपण भेटीस येतांना फार लवाजमा आणला म्हणजे आम्हांला भय वाटेल. आपल्या मनांत कांहीं कपटभाव नसला तरी भय वाटेल. करितां लवाजमा बिलकूल आणूं नये. एक खासा स्वारी आणि फार झालें तर आपले कोणी तरी दोन लोक इतकाच लवाजमा असावा. आमच्याकडूनहि त्या अटी पाळल्या जातील. आमचे बरोबरहि दोनच लोक आणूं.' शिवाजी भोळा आहे, त्याला कोण वाटेल तो फसवूं शकतो ही त्याची समजूत पथ्यावर आहे. तो आपलें कपट एकदम उघड करील. आम्ही आपलें कसें होतें तें पाहून घेऊं."

पंत थोडा वेळ तेथेंच घुटमळले. त्यांच्या चित्तवृत्तींत चलबिचल झाली. परंतु अधिक कांहीं न बोलतां महाराजांना मुजरा करून तेथून निघून गेले.

पंतांच्या चित्तवृत्तींत झालेली चलबिचल महाराजांच्या नजरेस आली. तेव्हां हा वकील कदाचित् आपल्याला याच्यापुढें अधिक गुप्त गोष्टी येऊन सांगणार नाहीं. सबब आपण आपले हेर पाठवून खान येथें आपल्या मुलाखतीला येईपर्यंत त्याच्या पाठीवर पाळत राखली पाहिजे, असा विचार करून महाराज आपल्या मंडळींत येऊन म्हणाले, "खानाच्या गोटांत कोणीतरी जाऊन तो येथें मजलसीच्या सदरेला यायला निघेपर्यंत काय काय होतें याची बित्तंबातमी काढली पाहिजे. जाधव, सर्जा व नानासाहेब यांच्यावर आपण हें काम सोंपवूं." लागलीच दोघां तिघांनीं जाऊन जाधव, सर्जा व नानासाहेब यांना बोलावून आणलें. ते तिघे महाराजांचे

चरणांपाशीं येऊन मोठ्या अदबीनें व भक्तीनें मुजरा करून काय आज्ञा आहे म्हणून विचारूं लागले. त्यांच्याकडे व जवळील इतर मंडळींकडे पाहून महाराजांना फार अभिमान वाटला. इतके लोक आज केवळ आपल्या जिवास जीव देण्यास अगदीं तयार आहेत, यांची देशभक्ति व आपल्या ठिकाणची राजनिष्ठा एक नव्हे, दोन नव्हे, शेंकडों प्रसंगांनीं आपण तावून सुलाखून पाहिली आहे. अशा या आपल्या कट्टया अनुयायांवरच अवलंबून आपण तरी आपला स्वराज्याचा व्यूह रचिला. असे मित्र, असे स्वामिभक्त, असे देशभक्त, आणखी धर्मरक्षणाकरितां व दुबळयांना गांजणुकींतून सोडविण्याकरितां आपल्या प्राणावर बेतली तरी न डगमगणारे लोक आपल्या साहाय्याला उभे असेपर्यंत आपल्याला कसली काळजी? विजापूरच्या दरबारीं जाधव म्हणजे केवढे सरदार, परंतु त्या सर्व सरदारींवर तिळांजलि सोडून हा मला साहाय्य करण्याकरितां सहकुटुंब सहपरिवार आला. ह्याच्या कुटुंबानें तर माझा जीव बचावला. नानासाहेबानें आपल्या बापाच्या संतापालासुद्धां जुमानलें नाहीं. एखादा संसाराला विटलेला मनुष्य अगदीं त्रासून संसार सोडून जसा पळतो तसा तो आपल्या किल्ल्यांतून पळून आपल्याकडे आला. सावळ्या पोऱ्या ज्यास महाराजांनीं स्वतःच सर्जेराव हें नांव दिलें होतें, त्याच्या निष्ठेबद्दल तर त्यांना नेहमीं फार कौतुक वाटत असे. त्याच्यावर मध्यंतरीं त्यांची इतराजी झाली होती, परंतु ती इतराजी केवळ गोडीची होती. त्याबद्दल त्याला शिक्षाहि झाली होती. त्याच्यावरचा महाराजांचा राग आतां पार नाहींसा झाला होता. शिवाय जाधवरावांच्या पत्नीनें आईसाहेबांकडून त्यांना सांवळ्याला जवळ करण्याबद्दल विनविलें होतेंच. खरोखर त्याच्यावर महाराजांची अत्यंत प्रीति व महाराजांच्यावर त्याची अत्यंत भक्ति. महाराज त्या तिघांना म्हणाले, "तुम्ही इकडले आहां याचा कोणाला गंधसुद्धां लागूं न देतां मोठ्या शिताफीनें खानाच्या गोटांत जा, आणि अफझलखानाचें खरें हृद्गत काय आहे तें काढून मला कळवा."

शेक्सपिअरचें एक सुंदर वाक्य आहे कीं, ज्याच्या मस्तकावर मुकुट त्याला स्वास्थ्याचें नांवसुद्धां नसावयाचें. परंतु शिवाजीमहाराजांच्या इतका धिमा पुरुष अत्यंत विरळा. कितीहि काळजीचे आणि संकटाचे प्रसंग गुदरोत, त्यांनीं झोंप घेण्याचें मनांत आणलें कीं त्यांना एका अर्ध्या क्षणांत गाढ झोंप लागावयाची, आणि तीहि जितका वेळ घ्यावयाची असा त्यांचा संकल्प असेल तितकीच वेळ ती घ्यायची. आपण जर अफ़झल्खानाच्या तडाख्यांतून सुटलों नाहीं तर स्वराज्य बुडालेंच; या वेळीं आपल्या हातून त्याचें पारिपत्य झालें तरच स्वराज्य भक्कम होणार; अशा प्रकारचे विचार महाराजांच्या मनांत घोळत असतां त्यांना सदरेवर बसले होते, तेथेंच झोंप लागली. या झोंपेंत त्यांस स्वप्न पडलें. तें स्वप्न असें:—
"एक महा अरण्य. त्या अरण्यांत एक मोठें तपोवन. तपोवन फारच सुंदर. तें पाहिल्याबरोबर कोणासहि अत्यंत आनंद व्हावयाचा. आपण त्या तपोवनांत शिरलों आहों आणि तेथील रमणीय देखावे पहात पहात एका लहानशा टेकडीकडे चाललों आहों. या तपोवनांत लहान लहान अशा अनेक पर्णकुटी असून त्या पर्णकुटींच्या सभोंवतीं हरिणबालकें मौजेनें खेळत आहेत. इतक्यांत एकाएकीं एक प्रचंड व अतिशय क्रूर असा पट्या वाघ दुरून मोठमोठाल्या झांपा टाकीत आणि दर झांपेस एकादें हरिण अगर गाय मारीत येतो आहे असें पहातांच महाराजांस अत्यंत संताप आला, विलक्षण त्वेष चढला. त्यांचेजवळ त्यांची तलवार व भाला इतकींच काय तीं शस्त्रें होतीं. तीं घेऊन ते क्षणाचाहि विलंब न करितां एकदम त्या वाघाच्या अंगावर धांवले. वाघ फार चपळ आणि क्रूर. त्यानें त्यांच्या भाल्याची पहिली फेंक चुकविली. अगदीं समोरून जर आपण याच्यावर हल्ला केला, तर हा मरेलच असें महाराजांना वाटेना. म्हणून लागलीच समोरची हूल दाखवून ते मागल्या बाजूस गेले, आणि केव्हांच मर्मस्थानीं भाला मारून त्याचा त्यांनीं प्राण घेतला. वाघ मरून पडला, त्याबरोबर जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसूं

लागला. हरणें, गाई वगैरे जीं जनावरें मरून पडलीं होतीं तीं पुनः आपोआप उठलीं, आणि आपल्याजवळ येऊन आपले उपकार मानीत आहेत असें महाराजांस वाटलें. नंतर पुनः त्यांस वाटलें कीं आपण देवळांत गेलों आहोंत. त्या देवळांत अगदीं अंतर्गृहांत देदीप्यमान तेज तळपत असून त्या तेजाच्या मध्यभागीं जगदंबा भवानी उभी आहे. तिचा एक हात वर देण्यासाठीं उचललेला आहे. तिच्या मुखकमलावर फारच सुंदर व पाहणाऱ्याच्या मनास धीर यावा अशा प्रकारचें स्मित दिसत आहे. तें पाहतांच महाराजांच्या मनांत भक्तीचें भरतें आलें आणि त्यांनीं एकदम तिच्यापुढें लोटांगण घातलें. त्यांचा लय लागला आणि त्यांना असा भास झाला कीं भवानी माता आपल्या मस्तकावर हात ठेऊन असें म्हणत आहे कीं, 'वत्सा, माझ्या या तपोवनांतल्या निरपराधी गरीब अशा प्राण्यांना तूं आज या दुष्टाच्या हातांतून सोडवलेंस, तेव्हां तुझ्यावर माझी पूर्ण कृपा आहे. तुझ्या कामांत तुला खात्रीनें यश मिळणार.' इतकें बोलून भवानीनें मस्तकावर पुनः हात ठेवला."

तो हात गार लागला आणि महाराज पाहातात तों कपाळावर आपल्या मातुःश्रींचा हात होता. शिवबास बसल्या ठिकाणींच सदरेवर झोंप लागली. त्यानें आपल्या महालांत जाऊन स्वस्थ निजावें म्हणून त्याला उठविण्यासाठीं या वेळीं आईसाहेब तेथें आल्या होत्या. त्यांस पाहतांच महाराजांना आनंद झाला आणि त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें आपलें स्वप्न अगदीं सविस्तरपणें आपल्या जननीस निवेदन केलें. तें ऐकतांच जिजाबाईसाहेब आनंदानें म्हणाल्या, "शिवबा, जोपर्यंत तुझी सारी खटपट स्वधर्म व स्वराज्य यांकरितां आहे; गोरगरिबांना व दीन रयतेला छळापासून सोडविण्याकरितां आहे, तोंपर्यंत तुला कधीं सुद्धां अपयश यायचें नाहीं. तुझ्या हातून जगदंबा दुष्टांचें शासन करणार यांत मला काडीमात्र शंका वाटत नाहीं."

असें मायलेकरांचें भाषण चाललें असतां पहांट झाली. खानाकडील खरा प्रकार काय आहे ती बातमी काढून आणण्यास महाराजांनीं सर्जेराव, जाधवराव व नानासाहेब यांची रवानगी केली होती. त्यांनीं आपल्या

चातुर्याची व धाडसाची अगदीं शर्थ केली. त्यांना खानाचा 'महाराजांना दगा करून पकडावयाचें अगर ठार मारावयाचें' असा अंतस्थ कावा आहे हें स्पष्टपणें कळून चुकलें. त्यांनीं लागलीच महाराजांना त्याप्रमाणें बातमी दिली.

महाराजांना ही बातमी कळतांच त्यांचा निश्चय अगदीं कायम झाला. मार्गशीर्ष शुद्ध ६ हा दिवस त्यांनीं खानाच्या मुलाखतीसाठीं मुक्रर केला. त्याप्रमाणें खानाकडे आपल्याला अमुक दिवस पसंत आहे तो आपणहि पसंत करावा, अशा अर्थाचा निरोप पाठविला.

---

## तयारी झाली : : २५

खानाकडे निरोप पाठविल्यानंतर महाराज आपल्या तयारीला लागले. प्रतापगडाकडे येण्याच्या मार्गांत अगदीं गर्द अशीं अरण्यें होतीं. त्या अरण्यांत ठिकठिकाणीं त्यांनीं आपल्या मावळे लोकांच्या लहान लहान तुकड्या ठेविल्या. मुलाखतीच्या वेळीं खानाचें कपट बाहेर पडलें म्हणजे त्याचें पारिपत्य कसें करावयाचें, आणि मग किल्ल्यावरून भांड्यांचा आवाज करून ठिकठिकाणीं ठेवलेल्या आपल्या सैन्याला आतां खानाच्या फौजेवर तुटून पडा म्हणून इषारा द्यावयाचा, हा त्यांचा हेतु होता. खान खरोखर अगदीं शुद्ध अंतःकरणानें येतों आहे, अशी जर त्यांच्या मनाची खात्री झाली असती, तर महाराजांनीं त्याचा प्रतिकार करण्यास ही योजना केली नसती.

नंतर खानाच्या मुलाखतीस मुद्दाम जो मंडप घातला होता, त्याची व्यवस्था पहाण्यास महाराज गेले असतां खानाकडील वकील त्यांस भेटण्यास आले. महाराज त्यांना म्हणाले, "ही पहा बोआ तुमची तयारी. तुमचे मालक खूष होतील अशी आहे कीं नाहीं तें तुम्ही नीट पाहून घ्या; जर कांहीं अधिक उणं असेल तर लागलीच सांगून टाका. करण्याजोगी असली तर ताबडतोब दुरुस्ती करूं. पण कायहो पंत, आपण सांगितल्याप्रमाणें सर्व

व्यवस्था आहेना ? नाहीं तर आम्हीं आपल्या विश्वासावर बसावं, आणखी त्यानें यथास्थित काय वाटेल तें कपट करून आमचा निकाल करावा ! असं होऊं नये म्हणून विचारतों. दुसरं कांहीं नाहीं."

खानाचा वकील हंसून म्हणाला, "आपण स्वस्थपणानं नुसता आमच्यावर विश्वास टाकून बसतां तर आजपर्यंत हा स्वराज्याचा विस्तार झाला आहे हा कधीं तरी होता काय ? खान कपट करणार असें मनांत धरून आपण ज्या तजविजी केल्या आहेत, त्या अगदीं यथायोग्य आहेत."

अगदीं गप्प अशा स्थितींत बराच वेळ गेल्यानंतर महाराज वकीलास म्हणाले, "खान एकापेक्षां अधिक माणूस घेऊन सदरेस येईल तर मी त्याची मुलाखत मुळींच घेणार नाहीं. सर्व अटी कबूल करूनहि आयत्या वेळीं तो कांहीं दगाफटका करील अशीसुद्धां मला शंका आहे, पण आमचा सारा भरंवसा भवानीमातेच्या ठिकाणीं आहे."

एवढें बोलणें होऊन वकील गेल्यानंतर महाराजांनीं आपली मंडपाची पहाणी संपविली. नंतर त्यांनीं आपल्या अंतरंगांतल्या माणसांस बोलावून त्यांना सर्व हकीकत सांगितली. शेवटीं मुलाखतीच्या वेळीं हुजऱ्याचें सोंग घेऊन तानाजीनें आपल्याबरोबर यावें असें त्यांनीं ठरविलें.

मार्गशीर्ष शुद्ध पंचमीचा दिवस. त्या दिवशीं जेथें खानाची मुलाखत घ्यावयाची तेथील मंडप तयार झाला. आतां दुसरे दिवशीं आपण त्याची मुलाखत घेणार आणि जो काय सोक्षमोक्ष व्हावयाचा तो होणार म्हणून महाराजांनीं पुढें काय करावयाचें तें नजिकच्या मंडळीस समजून सांगितलें; व त्यांना सावध रहा म्हणून बजावलें. त्यांनीं जिजाबाईसाहेब व संभाजीराजे यांस किल्ल्यावर सुरनीस व चिटणीस यांस दिमतीस देऊन ठेविलें, आणि सुरनीस व वाकनीस यांस म्हटलें, "ज्या कार्यास हात घातला आहे त्यांत कदाचित् कांहीं वांकडेंहि घडल्यास तुम्हीं घाबरें न होतां बेत केला त्याप्रमाणें गर्दी करून शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें."

महाराजांचें हें बोलणें अगदीं त्रोटक. परंतु त्यांत किती अर्थ होता ! त्यांत त्यांचें अंतःकरण कशा प्रकारें प्रतिबिंबित झालें होतें ! 'कदाचित्

वांकडेंहि घडेल,' या शब्दांनीं सर्वांच्या अंगावर शहारे उभे राहिल्याप्रमाणें झाले. ते म्हणाले "महाराज, आपल्या पुण्यप्रतापानें सर्व कांहीं सुरळीत होणार. कांहींसुद्धां वांकडें घडणार नाहीं. भवानीमातेची आपल्यावर कृपादृष्टि आहे. आपण अगदीं सुद्धां चिंता बाळगूं नये. आपल्याकरितां आम्ही सर्व जण आपल्या प्राणांच्या आहुति देण्यास तयार आहों." सर्वांचें हें दिलदिलाशाचें भाषण ऐकून महाराजांस परम संतोष झाला, व ते पुनः त्यांस म्हणाले, "तुम्हीं सारे शूर पराक्रमी आहां, तुम्हीं मला आजपर्यंत मदत केली म्हणून तर स्वराज्याची उभारणी येथवर झाली. नाहीं तर माझ्या एकट्याच्यानें काय होणार होतें? माझी सर्व मदार तुमच्यावर! तुमच्यापुढें या शत्रूचा काय पाड!"

याप्रमाणें सर्वांचा मनःपूर्वक गौरव करून स्वारींनीं सर्वांस रजा दिली आणि आपण भवानीच्या मंदिरांत जाऊन स्वस्थ मनानें तिचें ध्यान केलें.

इकडे अफ़झलखानासाठीं जेथें डेरे दिले होते, तेथें तो येऊन पोंचला होता. मुलाखतीची जागा पहाण्यास खानानें आपला खासा हुजऱ्या सय्यद बंडा यास पाठविलें. त्यानें जाऊन मंडप पाहिला आणि परत येऊन त्यानें आपल्या मालकाला सांगितलें कीं, "भेटीची जागा बहुत उत्तम प्रकारें शृंगारली आहे. तेव्हां शिवाजी मनांत कांपत असेल याबद्दल आपणांला बिलकुल संशय नको." तें ऐकतांच खान त्यास म्हणाला, "ठीक. असें जर असलें, आणि त्याच्या मनीं कपट नसलें तर फारच चांगली गोष्ट झाली. आपलें कपट चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल. असली शिकार बेसावध असतांनाच पकडली तर सांपडावयाची, नाहीं तर केव्हांच सुळकन् पळून जावयाची. आतां तो शिवाजी नजरेस मात्र पडावा. नुसता वेंघेंत धरून दाबला कीं तो 'क्यां' करून प्राण सोडील असा तो काडीजवान आहे."

सय्यद बंडानें आपल्या धन्याच्या बोलण्यास मान तुकविली कीं आपण म्हणतां ती गोष्ट अक्षरशः खरी. आणखी कांहीं बोलणें झाल्यावर शेवटीं खानानें मुलाखतीस जातांना सय्यद बंडास आपल्याबरोबर घेण्याचें ठरविलें.

इकडे महाराजांनीं सर्व निरवानिरव केली. नंतर ते रात्रीं आपल्या महालांत निजण्यास गेले. आपल्या मातुःश्री अद्याप जाग्या आहेत, त्यांना झोंप येत नाहीं, हें कळतांच ते उठून त्यांच्या समीप गेले व म्हणाले, " आईसाहेब, आपल्याला झोंप कां येत नाहीं ? "

" शिवबा, मी आपल्या मनाला पुष्कळ आळा घालतें आहें. आई जगदंबा कांहींसुद्धां वांकडं घडूं देणार नाहीं, असं माझ्या मनाला पक्कं वाटतं आहे. पण बाबारे, आईचें मन तें, तें का राहतं ! याच अफझलखानानं माझ्या संभाजीला कसं विश्वासघातानं मारलं तें मनांत येतं. आणखी उद्यां त्याबद्दल सूड घेतला जाईल, का भलतंच दुसरं कांहीं होईल ! असा विचार मनांत येऊन जिवाचा थरकांप होतो. दुसरं कांहीं नाहीं. "

संभाजीला विश्वासघातानें मारल्याचें आईच्या तोंडून ऐकतांच महाराजांना फारच त्वेष आला, आणि ते एकदम म्हणाले, " आईसाहेब, आपल्याला ती अगदीं चिंता नको. खानाचा हेतु दगा करण्याचा आहे, पण मी त्याचा चांगलाच समाचार घेतों पहा. "

"बाळ शिवबा, जगदंबेच्या कृपेनें सर्व कांहीं ठीक होईल. पण तूं आतां माझ्या मांडीवरच डोकें ठेवून नीज, म्हणजे मला फार समाधान वाटेल." महाराजांनीं मातुःश्रीच्या मांडीवर डोकें ठेविलें, आणि थोड्याच वेळांत त्यांस शांत झोंप लागली.

जिजाबाईसाहेबांच्या मनास आपल्या मुलावर नजीक येऊन ठेपलेल्या संकटाबद्दल फार भय वाटत होतें. परंतु आपल्या मनांतल्या भयाचा उच्चार करून त्यास भिववावें हें वीरमातेचें ब्रीद नव्हे; जें संकट आलें त्यास तोंड देऊन शूराप्रमाणें लढावें हाच मार्ग उत्तम; हें जाणूनच त्यांनीं शब्दांनीं किंवा चर्येनेंहि आपलें अंतस्थ भय आपल्या मुलास बिलकूल समजूं दिलें नाहीं. त्या वेळीं त्या मायलेकरांस कोणी पाहता तर त्यास वीरपुत्र आणि वीरजननी म्हणजे कशीं असतात आणि कसलेंहि संकट आलें असलें तरी धीर, प्रशांत

नरवीरास त्याच्या मातुःश्रींच्या अंकावर ऐन संकटकाळीं कशी शांत निद्रा येते हें दिसलें असतें !

अरुणोदय झाला. सूर्याचे आरक्त किरण प्रतापगडच्या गगनचुंबित मस्तकावर देदीप्यमान् सुवर्णरसाप्रमाणें पसरले. महाराज जागे झाले आणि जागे होऊन ते इकडे तिकडे पाहूं लागले, तोंच श्रीधरस्वामी त्यांचेपुढें येऊन उच्च आवाजांत व हास्यवदन करून म्हणाले:—

समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे।
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥

जय जय रघुवीर समर्थ !

अगदीं ऐन आणीबाणीच्या दिवशीं सुप्रभातींच समर्थांची वाणी त्यांच्या आवडत्या शिष्याच्या तोंडून कानीं पडावी यासारखें शुभचिन्ह कोणतेंच नाहीं असें महाराज व आईसाहेब यांस वाटलें. श्रीधरस्वामींनीं म्हटलेल्या श्लोकांत किती अर्थ भरलेला आहे हें मनांत येऊन त्यांना परमानंद झाला. महाराजांनीं श्रीधरस्वामींस आदरानें बसण्यास सांगितलें. मग श्रीधरस्वामी म्हणाले, "राजा, समर्थांनीं तुला माझ्या मुखीं आशीर्वाद पाठविला आहे. तुला आज पूर्ण यश मिळणार असें त्यांनीं वारंवार मला सांगितलें आहे आणि तुझ्याकरितां कांहीं ओव्या करून तुला आज प्रातःकाळीं देण्यासाठीं मजजवळ दिल्या आहेत. या तूं वाच, आणि आपल्या पुढच्या कार्यास लाग." असें म्हणून त्यांनीं त्यांच्या हातीं एक लखोटा दिला. महाराजांनीं तो हातीं घेतला, त्याला वंदन केलें, नंतर त्यांनीं तो उघडून वाचला. विशेषतः पुढील ओव्यांचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला:—

श्रीराम

...अति सर्वत्र वर्जावें। प्रसंग पाहोन चालावें ॥
हटनिग्रहीं न पडावें। विवेकी पुरुषें ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी। विशेष तुळजा भवानी ॥
परंतु विचार पाहोनी। कार्य करणें ॥

अखंडचि सावधाना । बहुत काये करावी सूचना ॥
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥
समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ॥
निश्चळ करूनिया मन । लोक असती ॥
सकळ कर्ता तो ईश्वरूं । तेणें केला अंगिकारू ॥
तया पुरुषाचा विचारू । विरुळा जाणें ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार ॥
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥
माहा येत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें ॥
अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥
येश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ॥
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥
देव ब्राह्मण आचार विचार । कित्येक जनांसी आधार ॥
सदा घडो परोपकार । देणें ईश्वराचें ॥
देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहाणें ॥
बहु जनांसी पाळणें । देणें ईश्वराचें ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ॥
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥

---

## निकाल झाला : : २७

त्या अर्थपूर्ण व श्रीगुरूंनीं संकटकाळ जाणून ऐन प्रसंगीं पाठविलेल्या ओंव्या वाचून पहातांच शिवाजीमहाराजांस विलक्षण गहिंवर आला. आपल्याला ज्यांनीं लहान वयापासून या क्षात्रिय मार्गांत पराक्रम करण्याविषयीं एकसारखें उत्तेजन दिलें, त्यांचें हें अत्यंत कळकळीनें भरलेलें उपदेशपत्र पाहण्याबरोबर त्यांना विलक्षण स्फुरणाहि चढलें. त्यांनीं लागलीच आपल्या लोकांना बोलावून म्हटलें, "आई भवानीनें दृष्टांत

देऊन जें मला सांगितलें तें मीं आपल्याला मागेंच सांगितलें आहे. आज आणखी एक आनंदाची गोष्ट आपल्याला सांगावयाची आहे कीं, श्रीसमर्थ रामदासस्वामींनीहि प्रसादपत्र पाठविलें आहे. तेव्हां आजच्या आपल्या कार्यांत आपल्याला शुभप्राप्तीच होणार. अमंगल कांहीं होणार नाहीं. आतां तुम्हीं आपापल्या कामांत अत्यंत दक्ष राहिलें पाहिजे. तरी पण अशुभहि होणार नाहींच, असें आपण धरून बसतां कामा नये. जर कांहीं अनिष्ट झालें, तर ज्या हेतूनें मीं हा सगळा अफाट स्वराज्याचा व्यूह रचला आहे, तो अगदीं अबाधित चालेल अशी तजवीज करा. तुम्हीं या स्वराज्याचे राजे. बाळ संभाजी, फार लहान, त्याला हातीं धरा आणखी 'स्वराज्य' राखा. दुसरं माझं कांहीं सांगणें नाहीं. स्वराज्य बळावत चाललं आहे इतकं परलोकीं दिसलं, म्हणजे मी तिथें सुद्धां आनंदांतच राहीन. मी सुरक्षित निसटलों तर ठीकच आहे. नाहीं निसटलों तर थोरल्या महाराजांना कळवा कीं मीं रजपूत योद्ध्याला योग्य अशा प्रकारानेंच शत्रूला तोंड देऊन पडलों, मीं जें काय केलें तें योग्यच केलें."

असें बोलून महाराजांनीं सर्वांस पुन्हां कोणीं काय व केव्हां करावयाचें तें सांगितलें आणि रजा दिली. नंतर आपल्या अंतर्गृहांत जाऊन त्यांनीं स्नान वगैरे केलें. त्यांचें भवानीभक्तीसंबंधाचें कांहीं नित्यकर्म असे तें त्यांनीं उरकलें. ते दिवशीं त्यांनीं उपोषण करण्याचें ठरविलें होतें. यामुळें त्यांचा खाण्यापिण्याचा विचारच नव्हता.

महाराजांनीं तानाजीस बोलावून त्यास अमुक एक प्रकारें पोषाख करून ये म्हणून सांगितलें. महाराज स्वतः पोशाख करूं लागले; प्रथम त्यांनीं सुरवारी इजार घातली, नंतर अंगावर सांखळीचें चिलखत चढविलें. त्यावर अगदीं साधा असा एक सदरा आणि सदऱ्यावर एक नेहमीं घालण्याचा झगा चढविला. मस्तकावर शिरस्त्राण घातलें आणि तें बिलकूल समजण्यांत येऊं नये अशा बेतानें त्याजवर पागोटें चढविलें. उजव्या हाताच्या अस्तनींत एक बिचवा लपवून धरला आणि डाव्या हाताच्या

पंजांत वाघनख चढविलें. इतकी सगळी तयारी झाल्यावर स्वारी भवानीच्या दर्शनास गेली. देवघरांत जिजाबाईसाहेब बाल संभाजीस घेऊन देवीची प्रार्थना करीत बसल्या होत्या. मातुःश्री व तें आपलें बालक यांना पाहून शिवाजीमहाराजांस फार गहिंवर आला. त्यांनीं जगदंबेला नमस्कार घातला, आपल्या मातेच्या चरणावर मस्तक ठेविलें, आणि संभाजीच्या हनुवटीला हात लावून त्याजकडे प्रेमाश्रुपूर्ण दृष्टीनें पाहिलें. नंतर ते मातेस म्हणाले, "आईसाहेब, मी आतां येतों. परत आलों तर ठीकच; नाहीं तर हा संभाजी आपल्याला माझ्या ठिकाणीं आहेच."

जिजाबाईसाहेबांच्या डोळ्यावाटें एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. परंतु त्यांनीं ते अश्रु तसेंच पुसून महाराजांस सद्गदित कंठानें म्हटलें, "शिवबा, तूं नेहमींप्रमाणें समरांगणांत अंगाशीं अंग भिडवून लढायला उभा राहिलेल्या शत्रूशीं भिडायला जात असतास, तर माझ्या डोळ्यांतून मुळीं-सुद्धां पाणी आलं नसतं. पण हा दगलबाज शत्रु काय करील याचा नेम सांगतां येत नाहीं. त्यामुळं मन फार भितं. बाकी जगदंबेनं दृष्टांत दिला आहे. समर्थांचा प्रसाद आला आहे. तेव्हां सगळं मंगलच होईल. पण खान भारी मोठा गडी. आणखी तूं एकटा त्याच्यापुढें जाणार. बरं...पण बरोबर कोणाला घेतो आहेस ? एक घ्यायचा तो तानाजी घे. तोच..."

"होय आईसाहेब, माझ्या त्या बाळमित्राखेरीज अशा वेळीं मी दुसऱ्या कोणाला घेणार ? त्यालाच घेतला आहे."

महाराजांचें हें बोलणें चाललें आहे तों तिकडे मुलाखतीच्या मांडवा-कडून वर्दी आली कीं, खान, त्याचा दुजऱ्या सय्यद बंडा, व पंत अशी मंडळी मंडपांत केव्हांच येऊन दाखल झाली आहेत, आणखी आपली वाट पहात आहेत. आपल्याबरोबर लष्कर आणूं नये असा ठराव असूनहि खानानें आपल्याबरोबर १५०० लष्कर घेतलें होतें. त्याचा हेतु असा कीं, शिवाजीला गफलत करून मारलें म्हणजे गडावर चढाव करून जाऊन लष्कराच्या जोरावर गड हस्तगत करावा. महाराज निघण्याची तयारी करूं लागले,

इतक्यांत तानाजी तेथें आला. त्यानें हुजऱ्याच्या पेशाचा वेष केला होता. मांडीच्या खालीं गुडघ्यापर्यंत येईल इतका एक चोळणा, वर एक कमरेच्या खालपर्यंतचा अंगरखा, कमरेला कंबरबंद असून त्याला दोन तरवारी लटकाविल्या होत्या. डोकीला एक लहानसें कंदी पागोटें होतें.

खान सदरेंत येऊन बसल्याबद्दल निरोपावर निरोप येऊं लागले. तेव्हां महाराज व तानाजी यांनीं निघण्यापूर्वी आईसाहेबांच्या पायावर डोकें ठेविलें. आईसाहेब म्हणाल्या, "बाळांनो, खुशाल जा. भवानी आईचा वरदहस्त आपल्यावर आहे. तेव्हां कांहीं सुद्धां अशुभ व्हावयाचं नाहीं. हा यशाचा माझ्या हातचा विडा घ्या, आणखी माझ्या बाळ संभाजीला त्यानें कसें मारलें तें मनांत आणून त्याचा समाचार घ्या. जा. भवानीआईला एकदां नमस्कार करा, आणखी जा."

तानाजीस बरोबर घेऊन महाराज मंडपाकडे चालले. महाराज आले असें कळतांच गोपीनाथपंत व कृष्णाजी भास्कर हे दोघेहि त्यांना सामोरे गेले. महाराजांनीं त्यांस नमस्कार केला. खानहि उठून चार पावलें पुढें आला. तानाजी सय्यद बंडापासून थोड्या अंतरावर उभा राहिला. खान व शिवाजी यांची जुन्या रीतीप्रमाणें भेट झाली. झाला तर या भेटीच्या वेळीं सुद्धां दगा होईल असें महाराज जाणून होते. यामुळें ते सावधच होते. खान उंच व लठ्ठ; महाराज ठेंगणे व किरकोळ. खानानें भेटीकरितां हात पुढें करून महाराज त्याचे वेंघेंत येतांच त्यानें त्यांची मान मोठ्या शिताफीनें खालीं आणून दाबली, व दुसऱ्या हातानें आपली समशेर उपसून महाराजांच्या मस्तकावर घाव मारला. परंतु महाराजांनीं शिरस्त्राण चढविलें असल्यामुळें त्यावर घाव मारला तो खणखण असा वाजला. त्याचा आघात झाला नाहीं. इतकें सर्व होण्यास एक क्षण लागला असेल नसेल. दुसऱ्याच क्षणीं खान चीं चीं करीत "या अल्ला, दगा! दगा!" असें ओरडत पडला. खानानें मान दाबण्याबरोबर महाराजांनीं, आपल्या उजव्या हातांतील वाघनख त्याच्या पोटांत खुपसून त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं. खान खालीं पडतांच त्याचे हातची तरवार

घेऊन महाराज मंडपाचे बाहेर पडले. तानाजीनें सय्यद बंडयास 'तूं शरण ये व आपलें शस्त्र खालीं ठेव' म्हणून सांगितलें, परंतु त्यानें तें ऐकलें नाहीं. तो तानाजीशीं लढून मरण पावला.

अफझलखानाचा दगा करण्याचा बेत फसून उलट तोच मारला गेला असें आजूबाजूस ठेवलेल्या सरदारांस कळण्याकरितां ठरलेली खूण म्हणजे किल्ल्यावरील पांच तोफांची सरबत्ती झाली, आणि ती होतांच झाडींतून लपून बसलेले नेताजी पालकर वगैरे मंडळींनीं एकदम बाहेर येऊन अफझलखानाच्या लष्करावर हल्ला केला. अफझलखानाचा जय होऊन तो खालीं येईल तेव्हां आपण किल्ल्यावर चढाव करून जायचें असें ठरलेलें असल्यामुळें, आणि दुसरें कांहीं भलतेंच होईल ही शंकाहि त्यास नसल्या-मुळें अफझलखानाचा रिसाला अगदीं बिनघोर होता. त्याजवर एकाएकीं हल्ला होतांच त्याची मोठी त्रेधा-तिरपीट उडाली. तशांत अफझलखानाच्या येण्यासाठीं झाडी तोडून साफ केली होती, तींच झाडें रस्त्यावर आतां आडवीं टाकून दिलीं असल्यामुळें त्या रिसाल्यास माघारी जाणेंहि केवळ अशक्य झालें. मग काय विचारतां? मावळ्यांनीं त्या रिसाल्यास अनर्थापात झोडलें. त्यांचा "जय भवानी !" आणि "हरहर महादेव !" असा आनंदशब्द आकाशांत दणदणून राहिला.

---

## आनंद : : २८

महाराजांवरलें भयंकर संकट टळलें. खानाचा बेत सर्वस्वीं फसला; इतकेंच नव्हे, तर महाराजांनींच त्याला उत्तम प्रकारें शासन केलें, असें जिकडे तिकडे कळतांच सर्वांना आनंद झाला. ही आनंदवार्ता सांगण्याला महाराज स्वतः जेव्हां मातुश्रींच्याकडे गेले, तेव्हां त्यांनीं तर महाराजांस नुसतें प्रेमाश्रूंनीं न्हाणिलें. त्यांचे बरोबर तानाजी होता. त्यासहि आईसाहेब आपल्याजवळ घेऊन म्हणाल्या, "बाळा तानाजी ! रामलक्ष्मण रावणाला मारून आल्यावर त्यांना पाहून कौसल्या मातेला कसा आनंद झाला असेल

तो आज मला चांगला कळतो आहे. आई जगदंबेनें संकट निवारण केलं. गुरुमहाराज समर्थांनीं कृपा केली, तेव्हां सगळं नीट झालं. ”

“आईसाहेब, देवीच्या कृपेनं, समर्थांच्या आशीर्वादानं, तुमच्या पुण्याईनं आणि तानाजीसारख्या एकनिष्ठ, जिवलग मित्राच्या मदतीनं सगळं कांहीं यथास्थित झालं... आतां आपण आपला उपास सोडण्याच्या विचाराला लागा. चला. आम्हीसुद्धां स्नान करण्याला जातों. ”

इतक्यांत कोणी हुजऱ्या त्यांच्यापुढें येऊन लवून मुजरा करून म्हणाला, “महाराज, त्या खानाची मुंडी कापून गडाच्या दरवाज्यावर लाविली...... ”

परंतु महाराज त्यास पुढें बोलूं देईनात. “कोणीं? कोणीं हें कृत्य केलं? शत्रु मरून पडल्यानंतर त्याच्या शवाची अप्रतिष्ठा करण्याचं काम शूरांचं नव्हे. तानाजी, जा, आणखी आतांच्या आतां तें मुंडकें दारावर कोठें लावलें आहे तें काढवून त्याच्या शवाजवळ ठेव. त्याच्या शवाला आतांच्या आतां मूठमाती मिळाल्याखेरीज मी आपला उपास सोडणार नाहीं. ”

महाराजांच्या आज्ञेप्रमाणें तानाजीनें जाऊन तें अफ्झलखानाचें शिर त्याच्या शवाजवळ ठेविलें. जावळीहून कोणी मुल्ला आणवून त्याचे हातून खानास मूठमाती देवविली. हा सर्व प्रेतसंस्कार नीट झाल्यानंतर महाराज वर गेले व स्नान करून त्यांनीं आपलें उपोषण सोडलें.

भोजनोत्तर महाराज पुनः आपल्या मातुःश्रीजवळ कांहीं वेळ गोष्टी सांगत बसले. आणि नंतर आई जगदंबेच्या चरणावर मस्तक ठेवून व अनन्यभावानें तिला शरण जाऊन ते स्वस्थ निद्रा घेण्यास गेले. त्या रात्रीं त्यांस किती तरी सुखाची झोंप लागली! प्रातःकाळीं महाराज उठले, तेव्हां त्यांनीं बाळाजी आवजीस बोलावून आणून हुकूम केला कीं आज तिसऱ्या प्रहरीं दरबार भरावयाचा आहे. तेव्हां सर्व मंडळींना थोरल्या दिवाणखान्यांत त्या वेळेस येऊन बसण्यास सांगा. बाळाजी आवजींनीं लागलीच त्याप्रमाणें केलें. परंतु थोड्या वेळांत पुनः परत येऊन महाराजांस त्यांनीं विनंति केली, “सरकार आपण त्या वेडीचा शोध करावयाची आज्ञा केली होती, त्याप्रमाणें शोध

करितां ती एका डोहांत बुडलेली सांपडली, आणखी तिच्या प्रेताला पाण्यांतून बाहेर काढण्यासाठीं धडपड करीत असलेला खंडूजीहि सांपडला."

महाराज कांहीं वेळ स्तब्ध बसून म्हणाले, "जा. त्या प्रेताला कोणाकडून तरी नीट अग्नि देववा. आणि त्या खंडूजीला माझ्यापुढें आणा." खंडूजीला पुढें आणतांच महाराज म्हणाले, "खंडूजी, तुला तोफेच्या तोंडीं द्यावा किंवा हत्तीच्या पायीं द्यावा इतक्या नीचपणानें तूं माझ्याशीं वागलास. पण काल माझ्या व माझ्या लोकांच्या हातून हत्त्या झाली ती बस्स झाली. त्या हत्येंत आतां मी भर घालूं इच्छित नाहीं. शिवाय, तूं त्या चंद्रराव मोऱ्याच्या मुलीचें प्रेत पाण्यांतून बाहेर काढण्यासाठीं धडपड करीत होतास, तेव्हां तुझ्या अंगांत माणुसकी उरली आहे असें दिसतें. म्हणून मी तुला आज देहांत शिक्षा देत नाहीं, फक्त हद्दपारीची शिक्षा देतों." असें म्हणून महाराजांनीं दोन माणसांस बोलावून 'याला स्वराज्याच्या हद्दीबाहेर घालवून द्या,' असा हुकूम केला व ते स्वतः दरबारास गेले.

महाराजांनीं दरबारांत रीतीप्रमाणें सर्वांस त्यांच्या त्यांच्या कामगिरी-प्रमाणें शाबासकी देऊन शेवटीं एक लहानसें भाषण केलें:—"स्वराज्य माझें असें समजूं नका. स्वराज्य तुमचें. तें सध्यां परकीयांनीं तुमच्या हातून घेतलें आहे. तें तुमचें तुमच्या हातीं पुनः द्यावें म्हणून केवळ मी निमित्त होतों आहें. आज जें झालें एवढ्यानें संपलें असें समजूं नका. सूर्योदय झाला म्हणजे दिवसाला प्रारंभ होतो. पण तेवढ्यानें सगळें कांहीं संपलें नाहीं. सूर्य माथ्यावर येऊन तळपूं लागण्याला मध्यंतरीं केव्हां केव्हां किती तरी अडचणी येतात. केव्हां त्याच्या आड ढग येतात, तर केव्हां ग्रहणें लागतात. तीं सगळीं निवारण झालीं पाहिजेत. आणखी तीं निवारण करण्याचें काम तुमचें आहे. अफ़्झलखान मेला एवढ्यानें संपलें नाहीं. आतां विजापुरास अधिकच गडबड उडेल, आतां अधिकच संकटें उपस्थित होतील. विजापूरचा आम्हीं पाडाव करतों आहोंत हें औरंगजेबाला पाहवणार नाहीं. आम्हांला त्याचाहि खचित त्रास होणार. तें एक आपल्यामागें

ग्रहण आहेच असें समजा. आपण त्यांतून सुटूं तेव्हां आपला स्वराज्यसूर्य तळपायला लागेल. पण हें सारें व्हायचें तुमच्या साहाय्यानें. त्यावांचून कांहींसुद्धां होणार नाहीं, हें लक्ष्यांत घेऊन पुढें वागा. दुसरें कांहीं माझें सांगणें नाहीं."

इतकें बोलून महाराजांनीं दरबार बरखास्त केला आणि ते स्वतः आपल्या मातुःश्री व श्रीधरस्वामी यांच्याशीं गोष्टी बोलत बसले. "गेल्या बारा वर्षांत समर्थांनीं आपणास आपल्या दर्शनास येऊं नये म्हणून निष्ठुर आज्ञा केली होती. ती आपण पूर्णपणें पाळली. 'तुझ्या पेशास योग्य असें कर्म करणें हेंच तुझें कर्तव्य' हा उपदेश जसा भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनास केला, तसाच उपदेश समर्थांनीं आपल्याला करून आपल्याकडून क्षात्रधर्माला उचित अशीं कर्तव्यें करविलीं. तेव्हां हें स्वराज्य स्थापनेचें सर्व श्रेय समर्थांच्याकडे आहे. आपण इतकीं वर्षें त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनावांचून काढलीं; परंतु आतां मात्र त्यांचें दर्शन झालेंच पाहिजे" असें त्यांनीं श्रीधरस्वामींस निक्षून सांगितलें. श्रीधरस्वामींचीहि त्यांस अनुकूलता मिळाली. लागलीच ते दोघें मिळून समर्थांच्या दर्शनास निघाले. श्रीसमर्थ रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांची गांठ पडली. ते हांचा त्या गुरुशिष्यांच्या भेटीचा आनंद शब्दांनीं काय वर्णावा ! महाराजांनीं मोठ्या आनंदानें समर्थांना स्वराज्यसूर्योदयाची सर्व हकीकत निवेदन केली. समर्थांनीं त्यांना आशीर्वाद दिलाः

> यत्र योगेश्वरः कृष्णो, यत्र पार्थो धनुर्धरः ।
> तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

५६३३
IRBK-0105633
IRBK-0105633